MAPOL 2.3M

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - II

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# आंतरराष्ट्रीय संबंध - II

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई



**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

: **डॉ. क्षिप्रा वासुदेव**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. भगवान लोखंडे**
सहायक प्राध्यापक
डी. जी. तटकरे कॉलेज तळा, जिल्हा - रायगड

: **डॉ. श्रीकांत देविदास महादने**
सहायक प्राध्यापक
डॉ. पतंगराव कदम कला व वाणिज्य कॉलेज, पेन - रायगड

: **डॉ. विजयसिंग कर्तारसिंग भाबरदोडे**
सहाय्यक प्राध्यापक
एस आर टी महाविद्यालय, अंबाजोगाई, बीड

: **डॉ. मल्हारी गुरुनाथ शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब ता कळंब
जि. धाराशिव



**फेब्रुवारी २०२५, मुद्रण - १** ISBN 978-93-6728-499-5

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय संबंधाचे दृष्टिकोन-१ | १ |
| २ | आंतरराष्ट्रीय संबंधाचे दृष्टीकोन - २ | १२ |
| ३ | आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यस्था आणि जागतिकीकरण | २० |
| ४ | समकालीन जागतिक समस्या | ३९ |

## एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - II

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

## आंतरराष्ट्रीय संबंध - II

## अभ्यासक्रम (मराठी)

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे:**

१. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संबंधांच्या सिद्धांतांबद्दल जागरूक करणे.

२. विद्यार्थ्यांना जागतिक घडामोडींच्या संकल्पनात्मकीकरण आणि सिद्धांतीकरणासाठी अंतर्दृष्टी प्रदान करणे

**प्रकरण १: आंतरराष्ट्रीय संबंधांचे दृष्टिकोन - I**

अ) उदारमतवाद

ब) वास्तववाद

क) रचनावाद

**प्रकरण २: आंतरराष्ट्रीय संबंधांचे दृष्टिकोन - II**

अ) मार्क्सवादी दृष्टिकोन

ब) टीकात्मक सिद्धांत

क) स्त्रीवादी दृष्टिकोन

**प्रकरण ३: आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था**

अ) ब्रेटन वुड्स संस्था

ब) जागतिकीकरण

क) प्रादेशिकता आणि प्रादेशिक संघटना

**प्रकरण ४: समकालीन समस्या**

अ) मानवी सुरक्षा

ब) हवामान बदल

क) निःशस्त्रीकरण

# SYLLABUS

**International Relations II**
**(4 Credits, 60 Hours)**

**Course Objectives:**
1. To aware students about theories of international relations.
2. To provide insights for conceptualization and theorization of the world affairs in systematic manner.
3. To enhance consciousness of emerging issues

**Module 1: Approaches to IR – I**
a) Liberalism
b) Realism
c) Constructivism

**Module 2: Approaches to IR-II**
a) Marxist Approach
b) Critical Theory
c) Feminist Approach

**Module 3: International Political Economy**
a) Bretton Woods Institutions
b) Globalisation
c) Regionalism and regional organisations

**Module 4: Contemporary Issues**
a) Human Security
b) Climate Change
c) Disarmament

**Course Outcomes:**
On successful completion of this course students will be able to:
1. Analyze and apply various theoretical frameworks to international relations.
2. Demonstrate the ability to think critically
3. Conduct meaningful research in international relations.

# SYLLABUS

**Reading List:**


1. Baylis, J. (2020). *The globalization of world politics: An introduction to international relations*. Oxford university press, USA.
2. Burchill, S., et. al. (2001). *Theories of International Relations*. New York: Palgrave
3. Donnelly, J. (2004). *Realism and International Relations*. Cambridge: Cambridge Uiversity Press.
4. Goldstein, J., & Pevehouse, J. C. (2008). *International Relations*. New York: Pearson – Longman Publishers.
5. Hobson, J. M. (2000). *The State and International Relations*. Cambridge: Cambridge University Press.
6. McClelland, C. A. (1960, Sep.). *The Function of Theory in International Relations*. The Journal of Conflict Resolution, 4(3), 303-336.
7. Ravenhill, J. (2014). *Global Political Economy.* Oxford: Oxford University Press.
8. Roger , S. D. (1996). Political Realism in International Theory. Cambridge: Cambridge University Press.
9. Vasquez, J. A. (2004). *The Power of Power Politics: From Classical Realism to Neotraditionalism*. Cambridge : Cambridge University Press.
10. Waltz, K. N. (1979). *Theory of International Politics*. Addison-Welsley Publishing Company, Inc.
11. Williams, P. D. (2008). *Security Studies: An Introduction.* Oxon & New York: Routledge.
12. **पेंडसे, अरुणा आणि उत्तरा सहस्रबुद्धे *आंतरराष्ट्रीय संबंध: शीतयुद्धोत्तर आणि जागतिकीकरणाचे राजकारण*, (2008, मुंबई, ओरिएंट लाँगमन)**
13. लोखंडे भगवान ,भावरदोडे विजय सिंग, महादाने श्रीकांत ,पाटील निलेश , 'आंतरराष्ट्रीय संबंध 'दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ ,मुंबई .2022 .
14. अग्रवाल रामेश्वर, दयाळू गुप्ता कैलास चंद्र, ' आंतरराष्ट्रीय राजनीति' जयप्रकाश नाथ कंपनी, मेरठ **,1972.**
15. वेदालंकार हरिदत्त,' आंतरराष्ट्रीय संबंध' सरस्वती सदन ,दिल्ली, **1971.**
16. वर्मा दिनानाथ, ' आंतरराष्ट्रीय संबंध' ज्ञानदा प्रकाशन, पाटणा, **1972.**
17. फाडीया बी एल,' आंतरराष्ट्रीय राजनीति के समकालीन राजनीतिक मुद्दे ',साहित्य भवन, पब्लिकेशन आग्रा **2007 .**
18. देवळांणकर शैलेंद्र, 'समकालीन जागतिक राजकारण भारतीय परराष्ट्र आणि संरक्षण धोरणा पुढील आव्हाने '

# १

# आंतरराष्ट्रीय संबंधाचे दृष्टिकोन-१

## (Approaches to International Relations-I)

**घटक रचना:**


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ उदारमतवादी दृष्टीकोन (Liberal Approach)

१.३.१ समाजशास्त्रीय उदारमतवाद (Sociological Liberalism)

१.३.२ परस्परावलंबी उदारमतवाद (Interdependence Liberalism)

१.३.३ संस्थात्मक उदारमतवाद (Institutional Liberalism)

१.३.४ गणराज्य उदारमतवाद (Republican Liberalism)

१.४ वास्तववादी दृष्टीकोन (Realist Approach)

१.४.१ वास्तववादी दृष्टीकोनाचे मुल्यमापन-

१.५ संरचनावादी दृष्टीकोन (Constructivist Approach)

१.५.१ संरचनावादाच्या मर्यादा आणि समीक्षण

१.६ समारोप

१.७ सराव प्रश्न

१.८ संदर्भ


## १.१ उद्दिष्टे

- दृष्टीकोन म्हणजे काय हे समजून घेणे
- उदारमतवादी दृष्टीकोनाची ऐतिहासिक पार्श्वभुमी व प्रमुख प्रवाह समजून घेणे
- वास्तववादी दृष्टीकोनाची गृहीतके अभ्यासणे
- संरचनावादी दृष्टीकोनाची पायाभूत तत्वे समजून घेणे

## १.२ प्रस्तावना

१९१९ मध्ये वेल्स विद्यापीठामध्ये सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी वुड्रो विल्सन अध्यासन केंद्राची स्थापना करण्यात आली. सुरवातीच्या काळात प्रा. अल्फ्रेड झिमर्न, चार्ल्स वेबस्टर, इ. एच कार यांसारख्या अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासास दिशा दिली. या काळात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी राजनयिक

इतिहास (Diplomatic History), आंतरराष्ट्रीय कायदा आणि संघटनांचा अभ्यास, सत्ता संबंधांचा अभ्यास यांचा आधार घेण्यात आला. या सर्व घटकांच्या आंतरराष्ट्रीय संबंधावरील प्रभावामुळे या विषयाचे स्वरूप कसे असावे ? या विषयात कोण-कोणत्या घटकांचा समावेश करण्यात यावा? याविषयी विचारवंतांमध्ये एकमत होत नव्हते. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंध ही संज्ञा वापरण्याऐवजी विविध विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय घडामोडी (International Affairs), जागतिक घडामोडी (World Affairs), जागतिक राजकारण (World Politics) आणि आंतरराष्ट्रीय राजकारण (International Politics) अशा वेगवेगळ्या संज्ञांचा वापर केला आहे. संज्ञांमधील ही भिन्नता आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनासाठी अवलंबलेल्या दृष्टिकोनातील वैविध्यामुळे आढळते.

अभ्यासाच्या सुरवातील सर्वप्रथम दृष्टिकोन (Approach) म्हणजे काय? हे पाहणे अगत्याचे ठरते. प्रमुख राजकिय तत्वचिंतक व्हरनॉन व्हॅन डाईक यांनी आपल्या Political Science: A Philosophical Analysis या ग्रंथात 'दृष्टिकोन' या शब्दाची व्याख्या मांडली आहे. डाईक यांच्या मते "दृष्टीकोनामध्ये निवडीच्या निकषाचा समावेश असतो: विशिष्ट समस्येची अथवा प्रश्नाची निवड करणे आणि या प्रश्नांना सोडविण्यासाठी आवश्यक माहिती निवडून सादर करण्यासाठी अवलंबलेले निकष आणि प्रश्न अथवा माहितीच्या समावेश करण्यासाठी किंवा वगळण्यासाठी अवलंबलेल्या मापदंडांचा समावेश असतो". सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास "दृष्टिकोण म्हणजे विशिष्ट प्रश्न अथवा समस्येकडे बघण्याची आणि त्या प्रश्न सोडवण्याची शास्त्र आधारित दृष्टी".

आधी सांगितल्याप्रमाणे, आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे काय ? आणि आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप नक्की कसे आहे? हे बघण्यासाठी विविध अभ्यासकांनी विविध दृष्टिकोनांचा वापर केला आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाशी निगडीत उदारमतवादी दृष्टीकोन (Liberal Approach), वास्तववादी दृष्टीकोन (Realist Approach) आणि संरचनावाद (Constructivism) या तीन दृष्टिकोनांचा अभ्यास केला आहे.

## १.३ उदारमतवादी दृष्टिकोन (Liberal Approach)

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा उदारमतवादी दृष्टिकोनाची पार्श्वभूमी आधुनिक उदारमतवादी राज्याच्या उगमाशी जोडता येईल. आधुनिक नागरी समाजातील तसेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील मानवी प्रगतीच्या क्षमतेकडे लक्ष वेधत असतांना या प्रगतीतून 'राज्य' आपल्या नागरिकांना व्यक्तिगत स्वातंत्र्याची हमी देऊ शकते असा विचार जॉन लॉकने मांडला. आधुनिकतेतून चांगले जीवन निरंकुश सत्तेपासून मुक्तता आणि भौतिक कल्याणकारी सुविधांचा लाभ घेणे शक्य होते. सतराव्या शतकात आधुनिकीकरणासोबतच वैज्ञानिक क्रांती आणि उदारमतवादी बुद्धीजीवी क्रांती घडून आली. या उदारमतवादी बुद्धिजीवी क्रांतीने मानवी तर्क आणि विवेकवाद यांवर विशेष भर दिला. उदारमतवादी विचारवंत प्रगतीकडे विशेष लक्ष देतात. म्हणुनच, जेरेमी बेंथम याने ‘उदारमतवादी राज्य जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख देणारी राजकीय आणि आर्थिक व्यवस्था निर्माण करू शकते' हा विचार मांडला.

मुख्यत्वे, उदारमतवादी दृष्टिकोण हा प्रामुख्याने तीन पायाभूत तत्वावर आधारलेला आहे.

१. मानवी स्वभावाचे सकारात्मक चित्रण

२. आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप परस्पर संघर्ष ऐवजी परस्पर सहकार्यावर आधारलेले आहे या विचारावर दृढविश्वास

३. प्रगतीवर श्रद्धा

उदारमतवादी दृष्टीकोन हा मानवी स्वभावातील सकारात्मक बाजू अधोरेखित करीत मानवी तर्कास (Reason) महत्व देतो. व्यक्ती हा विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वहिताकडे लक्ष देतो आणि स्पर्धेस महत्त्व देतो. मात्र अनेकदा व्यक्ती - व्यक्तींमध्ये हितसंबंध परस्परांशी वाटून घेतलेले असल्याने व्यक्ती ही सामाजिक जीवनात परस्पर समन्वय साधण्याकडे लक्ष देते. व्यक्तिगत जीवनातील ही तत्वे आंतरराष्ट्रीय स्तरावरही जसेच्या तसे लागू पडतात तेव्हा आंतरराष्ट्रीय संबंधांतही या तर्कसंगत तत्त्वांना अवलंबता येईल असा विचार उदारमतवादी विचारवंत मांडतात. वेगळ्या भाषेत सांगायचे झाल्यास 'संघर्ष' आणि 'युद्ध' ही अनिवार्य नसून जेव्हा राष्ट्रे आपल्या तर्कसंगत विचारास महत्त्व देऊन परस्परांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेऊ लागतात तेव्हा आंतरराष्ट्रीय सीमांवर वाद होणे अशक्य बनते. व्यक्तीमधील मानवी तर्काच्या माध्यमातून मानवी भीती आणि सत्तेच्या तृष्णेवर विजय मिळवता येतो. परस्पर हितसंबंध हा राष्ट्रांना एकत्र आणणारा दुवा असल्याने आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप हे सहकार्याचे (Cooperation) ठरते.

प्रगतीवरील श्रद्धा हे उदारमतवादी दृष्टीकोनाचे दुसरे मूलभूत तत्त्व आहे. मात्र किती प्रगती साधावी? वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती बरोबरच सामाजिक आणि राजकीय प्रगतीचे काय प्रगतीस काही मर्यादा आहेत का? प्रगती कुणासाठी आहे? असे अनेक प्रश्न याठिकाणी उपस्थित केले जातात. पहिल्या महायुद्धानंतर आदर्शवादी उदारमतवादाचा उगम झाला. मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर या उदारमतवादास उतरती कळा लागली. असे असले तरीही शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर उदारमतवादास साम्यवादाच्या पराभवामुळे नवीन गती प्राप्त झाली असेही आपण म्हणू शकतो.

उदारमतवाद्यांच्या मते, प्रगती ही व्यक्तीशी जोडलेली संकल्पना आहे. जॉन लॉकने म्हटल्याप्रमाणे ‘राज्याचे अस्तित्व हेच मुळात राज्यातील नागरिकांच्या स्वातंत्र्याची पाठराखण करण्यासाठी झालेले असून व्यक्तीच्या जीवित आणि स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी राज्याने स्वीकारलेली असते. याउलट, वास्तववादी विचारवंत हे व्यक्तीला प्राधान्य देण्याऐवजी राज्यास प्राधान्य देतात व राज्य ही अंतिम असून सत्ता हे साधन आहे असा युक्तिवाद मांडतात. वास्तववादी विचारवंतांच्या या युक्तिवादावर उदारमतवादी विचारवंतांनी आक्षेप नोंदवला असून राज्य ही 'संविधानात्मक' यंत्रणा असून कायद्याचे अधिराज्य (Rule of Law) निर्माण करीत राज्य नागरिकांच्या जीवित आणि संपत्तीच्या अधिकारांचे रक्षण करते. तेव्हा अशा प्रकारचे 'संविधानात्मक राज्य' आंतरराष्ट्रीय पातळीवर परस्परांच्या मतांचा तसेच हितसंबंधांचा आदर करते. आणि आवश्यकता पडल्यास आपल्या

हितसंबंधांना इतरांच्या हितसंबंधांची इतर राज्यांची जुळवून हा युक्तिवाद अठराव्या शतकातील ब्रिटिश विचारवंत जेरेमी बेंथम यांनी मांडला होता. बेंथमने घेते.

'आंतरराष्ट्रीय कायदा' (International Law) ही संकल्पना मांडली असून त्याच्या मते, 'संविधानात्मक राज्य आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करण्यासाठी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये अनुकूल बदल घडवून आणतात'. जेरेमी बेंथमच्या या विचाराचे जर्मन विचारवंत इमॅन्युअल कांतने समर्थन केले असून 'जग हे अशा संविधानात्मक यंत्रणांपासून बनले असून राज्य (ज्याला कांतने गणराज्य असे संबोधले आहे) ही चिरंतन शांतता प्रस्थापित करू शकतात' असा विचार मांडला.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, उदारमतवादी दृष्टीकोन हा आधुनिक संविधानात्मक राज्याच्या निर्मितीशी जोडलेला आहे. आधुनिकता हा जीवनाच्या प्रगतीचा आधार असल्याने आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आधुनिकतेमुळे राष्ट्रा-राष्ट्रांना परस्पर विकास साधणे शक्य होते. प्रगती ही व्यक्तिच्या जास्तीत जास्त व्यक्तींच्या भल्यासाठी केली जाणारी यंत्रणा गोष्ट असून जेव्हा प्रगतीची संकल्पना जागतिक घडामोडींमध्ये अवलंबली जाते तेव्हा परस्पर सहकार्य हा अंतिम उद्देश्य बनतो.

जोसेफ नाय रॉबर्ट कोहेन आणि झकीर व मॅथ्यू यांनी आपल्या लेखनातून उदारमतवादाचे (१) समाजशास्त्रीय उदारमतवाद (Sociological Liberalism), (२) परस्परावलंबी उदारमतवाद (Interdependence Liberalism), (३) संस्थात्मक उदारमतवाद (Institutional Liberalism) आणि (४) गणराज्य उदारमतवाद (Republican Liberalism) असे चार प्रकार मांडले आहेत. या चार प्रकारांचे थोडक्यात विश्लेषण पुढीलप्रकारे करता येईल.

### १.३.१ समाजशास्त्रीय उदारमतवाद (Sociological Liberalism)

आंतरराष्ट्रीय संबंधात प्रामुख्याने राज्याराज्यांतील सत्तासंघर्षाचा अभ्यास होतो हा वास्तववादी विचार समाजशास्त्रीय उदारमतवादी विचारवंत नाकारतात. समाजशास्त्रीय उदारमतवाद्यांच्या मते हा विचार संकुचित आणि एकेरी असून 'आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे केवळ राज्याराज्यातील संबंध अथवा सत्तासंघर्ष नसून आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये राष्ट्रांतर्गत संबंध जसे की व्यक्ती, समूह, संघटना यांच्यातील संबंधांचाही समावेश होतो. जेम्स रोसेनाऊ यांनी राष्ट्रा- राष्ट्रांतील संबंध ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये विविध देशांच्या शासनातील परस्पर संबंधांना व्यक्ती, गट, समाज यांच्याकडून सहकार्य लाभते असा विचार मांडला. समाजशास्त्रीय उदारमतवादी विचारवंत हे व्यक्ती-व्यक्तींमधील सहकार्य आणि शांततेच्या धारणास विशेष महत्त्व देतात. प्रमुख समाजशास्त्रीय उदारमतवादी विचारवंतांमध्ये रिचर्ड कॉबडेन, कार्ल डॉइश, जॉन बर्टन, जेम्स रोसेनाऊ यांचा समावेश होतो. राष्ट्रा-राष्ट्रांतील संबंधांमुळे विविध देशांतील व्यक्ती एकत्र येऊन मानवी समाजाची आणि पर्यायाने जागतिक समाजाची निर्मिती करतील असा आशावाद समाजशास्त्रीय उदारमतवादींनी मांडला आहे.

### १.३.२ परस्परावलंबी उदारमतवाद (Interdependence Liberalism)

परस्परावलंबी उदारमतवाद हा 'परस्परांवरील अवलंबन' (Mutual Dependence) या संकल्पनेवर आधारित असून 'व्यक्ती आणि जगभरातील विविध शासन यंत्रणा या जगात

इतरत्र होत असलेल्या विविध घटनांमुळे प्रभावित होत असतात' या विचारावर आधारलेला आहे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेस महत्त्व देत असताना राज्या- राज्यांचे परस्परांवरील अवलंबन दिवसेंदिवस वाढत आहे. रिचर्ड रोसेक्रान्स यांनी औद्योगीकरण आणि आधुनिकीकरणामुळे राज्याराज्यांतील वाढत असलेल्या परस्परावलंबन तसेच राज्यांच्या धोरणनिर्मितीवर पडणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला आहे. जगाच्या इतिहासात राज्यांनी सैन्य शक्ती आणि भौगोलिक विस्ताराच्या माध्यमातून आपला विस्तार केलेला दिसतो. मात्र आजच्या आधुनिकीकरणाच्या काळात औद्योगीकरण आणि आर्थिक विकासातून विविध देश विस्तार करीत आहेत. जगातील देश हे आज 'व्यापारी देश' बनले असून आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था ही विकसीत आणि विकसनशील देशांतील श्रम व औद्योगिकरणाच्या दरीमुळे परस्परावलंबी बनली आहे. औद्योगिक दृष्ट्या संपन्न असलेल्या विकसित देशांना श्रमासाठी विकसनशील देशांवर अवलंबून राहावे लागते. औद्योगिकरण, प्रगती आणि परस्परावलंबन या तीन घटकांना जोडून डेव्हिड मित्रानी या विचारवंताने 'एकत्रीकरणाचा सिद्धांत' (Theory of Integration) मांडला असून 'औद्योगिकरण आणि आधुनिकीकरणामुळे व्यापक प्रमाणात परस्परावलंबन वाढत असून त्यामुळे भिन्न भिन्न प्रकारचे देश एकत्रित येऊन शांतता प्रस्थापित होईल' असा विचार मांडला. डेव्हिड मित्रानीप्रमाणेच अर्नेस्ट हास या विचारवंतानेही नवसंरचनावादी सिद्धांत (Neo-structural Theory) मांडत राज्यांच्या एकत्र येण्याच्या विचारास दुजोरा दिला. परस्परावलंबी उदारमतवादामध्ये महत्त्वाचे पाऊल म्हणजे रॉबर्ट कोहेन आणि जोसेफ नाय यांनी मांडलेला 'गुंतागुंतीचा परस्परावलंबी सिद्धांत' (Complex Interdependence Theory). रॉबर्ट कोहेन आणि जोसेफ नाय यांच्या Power and Interdependence या पुस्तकात 'समकालीन जग हे गुंतागुंतीच्या परस्परावलंबनावर चालत असून हे परस्परावलंबन आधीच्या आंतरराष्ट्रीय संबंधांपेक्षा भिन्न आहे. विशेषतः शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर परस्परावलंबन वाढले आहे' असा विचार मांडला आहे. शीतयुद्ध कालखंडात किंवा त्याआधी संघर्ष उद्भवल्यास राष्ट्रांकडून सैन्याचा वापर करणे शक्य होते. मात्र गुंतागुंतीच्या परस्परावलंबनामध्ये असे घडू शकत नाहीत. याची दोन कारणे सांगता येतील. सर्वप्रथम, आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ राष्ट्र प्रमुखांनी घडवून आणलेले संबंध नसून त्यामध्ये इतरही अनेक कारक घटकांचा समावेश असतो. दुसरे असे कि राष्ट्रा- राष्ट्रांतील संबंध हे व्यक्ती, समुदाय, राज्य, अशा अनेक घटकांनी प्रभावित झालेले असतात.

### १.३.३ संस्थात्मक उदारमतवाद (Institutional Liberalism)

संस्थात्मक उदारमतवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संस्थांच्या आवश्यकतेची गरज अधोरेखित करतो. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी मांडलेला 'आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनागोंदीची परिस्थिती (Anarchy) दूर करून शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांची आवश्यकता आहे' हा विचार संस्थात्मक उदारमतवादी विचारवंत पुढे नेतात. आंतरराष्ट्रीय संस्था आणि संघटनांच्या निर्मितीमुळे राज्याराज्यांतील परस्पर सहकार्य सहज शक्य होते. मात्र त्यामुळे शांततेची हमी दिली जाऊ शकत नाही हेही तितकेच खरे. शक्तिशाली राज्ये स्वतःवर सहजासहजी नियंत्रण स्वीकारत नाहीत, त्याचप्रमाणे सार्वभौमत्वाच्या तत्वाला तडजोड करणे कोणत्याही राज्याला सहज शक्य होत नाहीत. अर्थात अशा वेळी आंतरराष्ट्रीय संघटना विशेष महत्त्वाची भूमिका बजावतांना दिसतात. आंतरराष्ट्रीय संघटना या कोणत्याही एका राज्याच्या नियंत्रणात नसून

त्यांचे स्वतंत्र अस्तित्व अस्तित्व असते. संस्थात्मक उदारमतवाद्यांच्या मते, 'आंतरराष्ट्रीय संघटना या राज्याराज्यांमध्ये परस्पर सहकार्य वाढीस लावून त्याद्वारे राज्यातील अविश्वासाची भावना आणि परस्परांविषयी असलेल्या संशय आणि भीतीचे वातावरण निवळण्यास मदत करतात'. आंतरराष्ट्रीय संघटनांची सकारात्मक भूमिका म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटनांद्वारे राज्य- राज्यांमधील सहकार्य हे वाढत जाते.

### १.३.४ गणराज्य उदारमतवाद (Republican Liberalism)

निरंकुश राजकीय व्यवस्थांचा तुलनेने उदारमतवादी लोकशाही व्यवस्था या शांतताप्रिय आणि न्यायाचे पालन करणाऱ्या असतात या युक्तिवादावर 'गणराज्य उदारमतवाद' ही संकल्पना आधारलेली आहे. सर्वप्रथम इमॅन्युएल कांत यांनी गणराज्यांमध्ये संघर्ष होत नाही असा युक्तिवाद मांडला. दॉ बाब्स्ट यांनी हा युक्तिवाद पुढे नेला तर १९८३ मध्ये मायकल डॉईल यांनी 'लोकशाही राष्ट्रांमध्ये संघर्ष होत नाही' असा सिद्धांत मांडला. मायकल डॉईल यांच्या सिद्धांताचे तीन प्रमुख आधार मानले जातात. सर्वप्रथम, लोकशाही राष्ट्रांमधील राजकीय संस्कृती ही संघर्षाची शांततामय मार्गाने सोडवणूक करण्यावर भर देते. लोकशाहीमध्ये आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेने सोडवले जावेत यावर भर दिला जातो. याचे कारण लोकशाही राष्ट्रांतील निर्णय प्रक्रिया ही प्रामुख्याने नागरिकांवर आधारलेली असते. दुसरे असे की, सर्व लोकशाही राष्ट्रांमध्ये समान नैतिक मूल्यांबाबत एकवाक्यता आढळते, यालाच इमॅन्युएल कांत याने 'शांततामय संघटन' (Pacific Union) असे नाव दिले आहे. हे संघटन कोणत्याही औपचारिक शांततामय तहाच्या माध्यमातून होत नसून त्यामध्ये अव्यक्त स्वरूपातील परस्पर सहमती असते. शांततामय मार्गाने प्रश्नांची सोडवणूक करण्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य मुक्तसंवाद यांना महत्त्व दिले जाते. तिसरे असे की, लोकशाही राष्ट्रांमधून शांतता, आर्थिक सहकार्य आणि परस्परावलंबन यामुळे अधिक दृढ होत जाते. पॅसिफिक युनियनद्वारे परस्परांमधील व्यापारी तत्वाला (Spirit of Commerce) महत्त्व प्राप्त होते. गणराज्य उदारमतवादी शांतता आणि परस्पर सहकार्य बाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रस्थापित होईल याबाबत सकारात्मक असतात. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर साम्यवादाचा अंत झाल्याने हा विचार वेगाने पुढे जाऊ लागला. पूर्व युरोप, लॅटीन अमेरिका आणि आफ्रिकेमध्ये लोकशाहीची झपाट्याने वाढ होऊ लागल्यानंतर या विषयाला अधिक बळकटी मिळाली.

## १.४ वास्तववादी दृष्टीकोन (Realist Approach)

उदारमतवाद याप्रमाणेच आंतराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासाचा वास्तववादी दृष्टिकोनाची पार्श्वभूमी मोठी आहे. जॅक्सन आणि सोरेनसन यांनी आंतरराष्ट्रीय संबंधातील वास्तववादी दृष्टिकोनाच्या इतिहासाचे तीन टप्पे मांडले आहेत. यापैकी सुरुवातीचा टप्पा ग्रीक इतिहासकार थ्युसिडाईडस, दुसरा टप्पा पुनरुत्थान काळातील इटालियन अभ्यासकार निकोलो मॅकेव्हली तर तिसरा कालखंड सतराव्या शतकातील ब्रिटिश राजकीय तत्त्वचिंतक थॉमस हॉब्ज यांचा होता. या वर्गातील सर्व वास्तववादी अभ्यासक हे अभिजात वास्तववादी (Classical Realist) विचारपरंपरेत मोडतात. मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात बदललेल्या सत्ता समीकरणांचा नव्याने अन्वयार्थ लावताना अमेरिकन अभ्यासक हान्स मॉर्गेन्था याने वास्तववादी विचारांना पुन्हा प्रकाशझोतात आणले. त्यामुळे

हान्स मॉर्गेन्था हा नवअभिजात वास्तववादी (Neo Classical Realist) विचारवंत मानला जातो. प्रस्तुत प्रकरणांमध्ये हान्स मॉर्गेन्था याने मांडलेल्या वास्तववादी विचारांचाच अभ्यास करण्यात आला आहे. तर त्यानंतर वास्तववादी विचारांमध्ये निर्माण झालेल्या नव्या प्रवाहांचा अभ्यास करण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधातील वास्तववाद आणि आदर्शवाद या दृष्टीकोनांत सैद्धांतिक द्वंद्व राहिले आहे. विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर आदर्शवादी दृष्टीकोनातील मर्यादा लक्षात येऊ लागल्याने वास्तववादी सिद्धांताचे पुनरुज्जीवन झाले. हान्स मॉर्गेन्थॉ हा वास्तववादाचा जनक मानला जातो. वास्तववादी दृष्टीकोनात राष्ट्रीय हित (National Interest) आणि सत्ता (Power) या घटकांना विशेष महत्त्व असल्याने वास्तवादी दृष्टीकोनास सत्तावादी दृष्टीकोन (Power Approach) असेही म्हटले जाते. हान्स मॉर्गेन्थॉ यांनी सत्तेची व्याख्या मांडताना म्हटले आहे की, 'सत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीचे इतर व्यक्तींच्या मन आणि कृतीवर असलेले नियंत्रण होय'. हान्स मॉर्गेन्थॉ आधी इ. एच. कार, जॉर्ज श्वार्झनबर्जर, क्विन्सी राईट, मार्टिन वाईट आणि एरिक कॉफमन यांनी सत्तावादी दृष्टिकोन मांडला होता. एरिक कॉफमन यांनी ‘जागतिक राज्य (World State) ही संकल्पना नाकारून सत्तेच्या विस्ताराला विशेष महत्त्व दिले. हान्स मॉर्गेन्थॉ यांनी आपल्या Politics Among Nation या ग्रंथात मानवी स्वभावाचे वास्तववादी चित्रण केले असून त्याने मानवी स्वभावातील नकारात्मक बाजूस महत्व दिले आहे. याठिकाणी वास्तववादी दृष्टीकोन उदारमतवादी दृष्टीकोनातील मानवी स्वभावाच्या शांतताप्रिय आणि तर्काधिष्ठीत वैशिष्ट्यांना नाकारतो. आपल्या दृष्टीकोनाची मांडणी करतांना हान्स मॉर्गेन्थॉने वास्तववादी दृष्टीकोनाची सहा पायाभूत तत्त्वे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे:

वास्तववादी दृष्टीकोनाचे पहिले तत्त्व म्हणजे 'राजकारण हे मानवी स्वभावातील दडलेल्या वस्तुनिष्ठ नियमांनी नियंत्रित केले जाते. सामाजिक जीवनामध्ये व्यक्ती ज्या नियमांच्या माध्यमातून आपले वर्तन करत असतो त्या नियमांचे स्वरूप सर्वत्र सारखेच असते. हे नियम व्यक्तीच्या नैतिक प्राधान्यापेक्षा श्रेष्ठ असल्याने मानवी कृतींचे विश्लेषण हे वस्तुस्थिती (Facts) आणि कार्यकारणभाव (Reason) यांतून झाले पाहिजे. हे विश्लेषण नैतिकतेच्या माध्यमातून होऊ नये अशी मागणी मॉर्गेन्थॉने केली आहे. त्याचप्रकारे जेव्हा एखाद्या राज्यप्रमुखाच्या कृतींचे विश्लेषण केले जाते तेव्हा प्रत्यक्ष वस्तुस्थिती आणि कार्यकारण भाव यांचा विचार व्हावा नैतिकतेचा नव्हे.

वास्तववादी दृष्टीकोनाचे दुसरे तत्त्व म्हणजे 'राष्ट्रीय हित ही संकल्पना केवळ सत्तेच्या माध्यमातून समजून घेतली जाऊ शकते'. आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यप्रमुख हे केवळ राष्ट्रीय हित आणि सत्ता या घटकांना केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेतात. त्यामुळे अभ्यासकाने आंतरराष्ट्रीय राजकारणात एखाद्या देशाद्वारे काय करणे शक्य आहे? किंवा एखाद्या देशाद्वारे काय करणे आवश्यक आहे? याचा विचार करत नाहीत. थोडक्यात परराष्ट्र धोरणाद्वारे राज्यांनी केवळ आपल्या राजकीय यशाचा विचार झाला पाहिजे.

वास्तववादी दृष्टीकोनाचे तिसरे तत्त्व म्हणजे 'वास्तववादानुसार राष्ट्रीय हितसंबंधाचा कोणताही निश्चित अर्थ असू शकत नाही'. आंतरराष्ट्रीय राजकारण अत्यंत गतिमान असल्याने जगामध्ये गतिमानपणे बदल होत असतात. तेव्हा बदलत्या जागतीक समीकरणांनुसार राष्ट्रीय

हितसंबंधाचे अर्थ वारंवार बदलत असतात. म्हणूनच मॉर्गेन्थॉ यांनी हितसंबंधांना आपल्या नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्याची सत्तेवर पकड असणे गरजेचे आहे असा विचार मांडत बदलत्या परिस्थितीनुसार राज्यांनी सत्ताप्राप्ती आणि विस्तारावर भर दिला.

वास्तववादी दृष्टीकोनाचे चौथे तत्त्व म्हणजे वैश्विक नैतिक नियम हे राज्यांना जसेच्या तसे लागू होत नाहीत. वैश्विक नैतिक नियम हे राज्यांना सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणेच लागू होतात. दूरदृष्टी आणि कूटनिती हे राजकारणातील महत्वाचे नियम असून वैश्विक नैतिक नियमांचे राज्यांनी पालन करतांना राज्यांनी स्थल - कालाप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. नैतिकतेचे पालन करतांना राज्यांनी अमूर्त नियमांना प्रमाण मानण्याऐवजी राष्ट्रीय हितांना आपले लक्ष्य मानावे.

वास्तववादी दृष्टीकोनाचे पाचवे तत्त्व म्हणजे, 'वास्तववाद एखाद्या राष्ट्राच्या नैतिक आकांक्षा आणि जागतिक नैतिक नियमांमध्ये भेद करतो.' वास्तववाद सर्व राज्यांना हितसंबंधांची पुर्तता करणारे राजकिय कारक घटक (Actors) मानतो. तेव्हा राज्यांच्या कृतीचे अवलोकन हे नैतिक आकांक्षांऐवजी राष्ट्रीय हितसंबंधातून होते.

वास्तववादी दृष्टीकोनाचे सहावे तत्त्व म्हणजे, 'वास्तववाद राजकिय क्षेत्राच्या स्वायत्ततेस स्विकारते'. राजकारणातील सत्तेचे स्थान हे अर्थव्यवस्थेतील चलनाच्या स्थानाइतके अटळ आहे. हे दोन्ही घटक अविभाज्य असून याव्यतिरिक्त राजकारणातील कार्यरत अन्य घटक (जसे कि अराज्यीय घटक, दहशतवादी संघटना, अशासकिय संघटना इ.) हे तुलनेने गौण ठरतात.

### १.४.१ वास्तववादी दृष्टीकोनाचे मुल्यमापनः

वास्तववादी दृष्टीकोनाने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात मोलाचे योगदान दिले असले तरीही या दृष्टीकोनात महत्वपुर्ण उणिवा असल्याने समिक्षकांनी त्यावर टिकेची झोड उठवली आहे.

वास्तववादी दृष्टीकोन हा सत्ता आणि राष्ट्रीय हित या घटकांना अवास्तव महत्व देतो सत्तेसाठी संघर्ष (Conflict) अथवा हितसंबंधांसाठी संघर्ष हे आंतरराष्ट्रीय संबंधाचे एकमेव वैशिष्ट्य नाही. अनेकदा राष्ट्रे संघर्षाऐवजी सहकार्य (Cooperation) साधने पसंत करतात. मॉर्गेन्थॉने वास्तववादाची पायाभरणी मानवी स्वभावावर आधारित असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात मॉर्गेन्थॉने केलेले मानवी स्वभावाचे चित्रण हे एकांगी आहे. कारण, सतत संघर्ष, हिंसेस प्राधान्य आणि स्वार्थी वृत्ती हे मानवी स्वभावाचे केवळ एकांगी वर्णन आहे. त्यामुळेच बेनो वेझरमन यांनी मॉर्गेन्थॉने मांडलेल्या वास्तववादास 'सिद्धांत' (Theory) म्हणण्याऐवजी केवळ 'गृहितक' (Hypothesis ) म्हणावे असा युक्तिवाद केला.

मॉर्गेन्थॉने वास्तववाद मांडतांना प्रत्यक्षात काय अस्तित्वात आहे? (What is actually exists?) यावर भर देण्याचा आग्रह करीत आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्तासंघर्ष (Power struggle), अनागोंदी (Anarchy) यांचे विवेचन केले. परंतू मॉर्गेन्थॉने आपला विचार मांडतांना अमेरिकेने या धोरणांचा स्विकार करायला हवा असे सांगत कसे असावे? (What ought to be? ) याची चर्चा केली आहे. त्यामुळे मॉर्गेन्थॉच्या वास्तववादी विचारांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित राहतात.

याशिवाय मॉर्गेन्थॉने सतत संघर्ष (Endless Conflict) ही संकल्पना मांडत असतांना वैश्विक शांततेकडे दुर्लक्ष केले आहे. राष्ट्रीय हितासाठी सतत संघर्ष ही कल्पना राष्ट्रे अधिककाळ स्विकारू शकत नाही. त्यामुळे हा दृष्टीकोन कचखाऊ ठरतो.

## १.५ संरचनावादी दृष्टीकोन (Constructivist Approach)

संरचनावाद हा आंतरराष्ट्रीय संबंधातील नवीन दृष्टिकोन मानला जातो. 1990 च्या दशकामध्ये उदयास आलेल्या संरचनावादी दृष्टीकोनाला सामाजिक संरचनावाद असेही म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्दे तसेच प्रश्नांचे व्यापक सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेतून यथास्थिती अवलोकन करत त्यांच्या निराकरणाचे मार्ग सुचवणे हे संरचनावादी दृष्टीकोनाचे उद्दिष्ट सांगता येईल. महत्वाचे म्हणजे, संरचनावादी दृष्टीकोन हा वर्तमानकाळात राज्य सामाजिक संरचना निर्माण करून यथार्थ संरचना कशाप्रकारे निर्माण करेल याकडेही लक्ष देतो. अलेक्झांडर वेंड हा आंतरराष्ट्रीय संबंधातील प्रथम संरचनावादी विचारवंत आहे वेंडच्या मते, ‘सामाजिक शास्त्रात विविध अस्मिता आणि हितसंबंधांना व्यक्त करणाऱ्या अनेक सामाजिक सिद्धांतांचे अस्तित्व आहे. मात्र माझ्या मते या सिद्धांतांचा भर हा सापेक्ष सामाजिक संरचना निर्माण करण्यावर असावा केवळ तरच अशा सिद्धांतांना रचनावादी सिद्धांत म्हणता येईल'.

अलेक्झांडर वेंड याने मांडल्याप्रमाणे संरचनात्मक दृष्टीकोण हा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील रचनात्मक सिद्धांत असून हा दृष्टिकोन पुढील युक्तिवाद मांडतो

१. राज्य हे आंतरराष्ट्रीय राजकीय सिद्धांतातील विश्लेषणाचे प्रमुख एकक मानता येतील

२. राज्यव्यवस्थेतील प्रमुख रचना या भौतिक नसून आंतरसापेक्ष आहे.

३. राज्याच्या अस्मिता आणि हितसंबंध हे त्यांनी निर्माण केलेल्या सामाजिक रचनेतील महत्त्वपूर्ण घटक आहेत.

अशातऱ्हेने राज्ये ही आसपास असलेल्या जगाविषयी ते कार्य करत असलेल्या रचनेतून आपली मते बनवत असतात. राज्यांनी केलेल्या पुर्वानुमानावर त्यांच्या कृतीची दिशा ठरते.

अलेक्झांडर वेंड यांनी असेही लिहिले आहे की, 'विविध राज्ये ही संरचनेतील इतर घटकांना प्रतिसाद देत असतात हे संरचनात्मक सामाजिक सिद्धांताचे पायाभूत तत्व आहे. राज्यांचा प्रतिसाद हा या घटकांचा राज्याविषयी असलेला दृष्टिकोन कसा आहे यावर ठरतो'.

व्यक्तीप्रमाणे राज्यांनाही विविध अस्मिता असतात. इतर राज्यांच्या कृतीला अनुसरून हे राज्य प्रतिसाद देत असतात आणि इतर राज्ये आपल्या राज्याकडे कशाप्रकारे बघतात यावर राज्यप्रमुख मत बनवत असतात. थोडक्यात ही एक गतिशील प्रक्रिया असून त्यात वेळेनुसार बदल होत जातो. राज्याराज्यांतील आंतरप्रक्रिया, बदलता काळ आणि इतर राज्यांकडून होणाऱ्या आकलन यानुसार यात बदल होत जातो. जसेजसे राज्यांचे एकमेकांविषयी असणारे आकलन बदलत जाईल तसे तसे संबंधाचे स्वरूप बदलत जाईल. संरचनावाद्यांसाठी आंतरराष्ट्रीय संस्था या स्थिर घटक असून राज्याराज्यातील संबंध हे प्रवाही असतात.

आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासक करेन मिंग्स्ट यांच्या मते, संरचनावादी दृष्टीकोन हा राज्याचे स्वरूप, सार्वभौमत्व आणि नागरिकत्व यासारख्या मूलभूत प्रश्नांना हात घालतो. त्यांच्यामते संरचनावादी दृष्टीकोनामुळे समीक्षेचे एक नवे चित्र खुले झाले असून लिंगभाव, वांशिकता यासारख्या घटकांवरही चर्चा करणे यामुळे शक्य झाले आहे

वास्तववादी दृष्टीकोनाप्रमाणे संरचनावादी दृष्टीकोन राज्यास आंतरराष्ट्रीय संबंधातील प्रमुख घटक मानत असला तरीही संरचनावादी दृष्टीकोनाचे अभ्यासक राज्याची आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील इतर घटकांशी होणारी आंतरक्रिया महत्वाची मानतात. त्यामुळे संरचनावादी दृष्टीकोन आंतराष्ट्रीय व्यवस्थेच्या विशिष्ट पर्यावरणातील कारक घटकांचा (Actors) परस्परांवरील प्रभाव आणि बदल यांचे आकलन करतात. राज्याचे वर्तन अनेकविध घटकांनी प्रभावित होत असते. उदाहरणार्थ, राज्याचे वर्तन हे सामाजिक रचनेतून बदलत असते. निर्णयप्रक्रियेत सामील निर्णयनिर्धारकांचे वर्तन हे त्यांच्या श्रद्धा, अभिवृत्ती, सामाजिक नियम आणि अस्मिता यांतून निश्चित होते. या श्रद्धा, अभिवृत्ती, सामाजिक नियम निर्णयप्रक्रियेतील विविध कारक घटकांना फक्त प्रतिसादच देत नाहीत तर त्यांना आवश्यकतेनुसार कृतीमध्ये परिवर्तीत करण्याचाही प्रयत्न करतात. म्हणुनच, संरचनावादी अभ्यासक हे व्यवस्थेकडे एक गतिमान घटक म्हणूनही पाहतात.

उदारमतवादी दृष्टिकोनाप्रमाणे संरचनावादी दृष्टीकोनाचा भर हा राज्यावर असला तरीही संरचनावादी दृष्टीकोन हा राज्यात कार्यरत असलेल्या विश्लेषणाच्या विविध पातळ्यांनाही (Levels of Analysis) हात घालतो. विश्लेषणाच्या एका पातळीवर (जसे की व्यक्ती किंवा सामाजिक विश्लेषणाची पातळी) घडणारे बदल हे थेट राज्याच्या कृतीवर परिणाम करत असतात. जसे कि, राज्यांतर्गत घटकांचे हितसंबंध बदलले कि लगेचच राज्याच्या वर्तनात बदल होतो. त्यामुळेच एखाद्या राज्यव्यवस्थेत सत्ताबदल होऊन नवीन शासक पदावर येताच त्या राज्याचे जगाकडे पाहण्याचे आकलन बदलते. वास्तववादी दृष्टीकोनाप्रमाणे संरचनावादी दृष्टीकोनही सत्तेचे महत्त्व मान्य करतो मात्र संरचनावादी सत्तेची व्याख्या अधिक व्यापक व्यापकपणे करतात. संरचनावादींच्या मते, सत्ता म्हणजे केवळ सैन्य शक्ती किंवा आर्थिक शक्ती नव्हे. त्यांच्या मते, सत्ता ही संकल्पना व्यापक असून मृदू सत्ता (Soft Power) या संकल्पनेचाही अंतर्भाव 'सत्ता' या संकल्पनेत व्हावा.

### १.५.१ संरचनावादाच्या मर्यादा आणि समीक्षण:

संरचनावादावर होणाऱ्या विविध टिकांपैकी सर्वात महत्त्वाचे टिका म्हणजे संरचनावाद हा एक 'सैद्धांतिक प्रारूप' (Theoretical Model) नसून विविध व्यक्तींच्या मतप्रवाह यातून तयार झालेला 'संकल्पनांचा संच' आहे (Set of ideas and concepts). हा 'संकल्पनांचा संच' व्यक्तीच्या आकलनातून बदलत जातो. मुळात संरचनावादाच्या पायाभूत गृहितकापैकी एक दोष म्हणजे या संरचनावादी सिद्धांतात रचनात्मक बदल करणे गरजेचे आहे. अभ्यासक 'संरचनावाद दृष्टीकोन हा गतीशीलतेवर आधारलेला आहे' असे म्हणतात. मात्र या गतीशीलतेचा अभ्यास कशा प्रकारे करावा याबाबत मात्र उत्तर देत नाही. एखाद्या विशिष्ट परिस्थितीची अवलोकन करून त्याचे सर्व व्यापक निष्कर्ष मांडणे कठीण असते. सामान्यतः सिद्धांताचा उद्देश हा स्पष्टीकरण विश्लेषण आणि पूर्वानुमान करणे हे असते मात्र सिद्धांताच्या

या उद्देशाचा विचार करता संरचनावाद हा या तीन घटकांचे अवलोकन करण्यात अपयशी ठरतो

## १.६ समारोप

प्रस्तुत प्रकरणाद्वारे आपण आंतरराष्ट्रीय संबंधाचे आकलन करण्यासाठी अवलंबण्यात येणाऱ्या उदारमतवादी, वास्तववादी आणि संरचनावादी या तीन दृष्टीकोनाचा अभ्यास केला. प्रत्येक दृष्टीकोनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरुप मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत असला तरीही कोणताही दृष्टीकोन परिपुर्ण नाही हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. पुढील प्रकरणात आपण आंतरराष्ट्रीय संबंधाचे उर्वरित प्रमुख दृष्टीकोन अभ्यासणार आहोत

## १.७ सराव प्रश्न

१. दृष्टीकोन म्हणजे काय हे सांगुन आंतरराष्ट्रीय संबंधाच्या उदारमतवादी दृष्टीकोनाचे टीकात्मक विवेचन करा.

२. हान्स मॉर्गन्थॉने मांडलेल्या वास्तववादी दृष्टीकोनाची गृहीतके स्पष्ट करा.

३. दृष्टीकोन म्हणजे काय हे सांगुन आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संरचनावादी दृष्टीकोनाचे टीकात्मक विवेचन करा.

## १.८ संदर्भ

१. International Relations- Jackson and Sorenson Oxford University Press

२. Introduction to International Relations: Theory and Practise - Joyce P. Kaufman Rowman & Littlefield Publishers.

❄❄❄❄❄❄❄

# २

# आंतरराष्ट्रीय संबंधाचे दृष्टीकोन - २

## (Approaches to International Relations-I)

**घटक रचना:**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ मार्क्सवादी दृष्टीकोन (Marxist Approach)

२.४ समिक्षणात्मक दृष्टीकोन (Critical Approach)

२.५ स्त्रीवादी दृष्टीकोन (Feminist Approach)

२.६ समारोप

२.७ सराव प्रश्न

२.८ संदर्भ

## २.१ उद्दिष्टे

- मार्क्सवादी दृष्टीकोनाची मिमांसा करणे.
- समीक्षात्मक दृष्टीकोनाचे अवलोकन करणे.
- स्त्रीवादी दृष्टीकोन समजून घेणे.

## २.२ प्रस्तावना

प्रकरण एक मध्ये आपण उदारमतवाद, वास्तववाद आणि संरचनावाद या तीन दृष्टीकोनांची चर्चा केली. या प्रकरणात आपण मार्क्सवाद, समीक्षात्मक दृष्टीकोन आणि स्त्रीवादी दृष्टीकोन या तीन दृष्टीकोनांची चर्चा करणार आहोत. या दृष्टीकोनांना पर्यायी दृष्टीकोन (Alternative Approaches) असेही म्हटले जाते.

## २.३ मार्क्सवादी दृष्टीकोन (Marxist Approach)

प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स याने आपल्या 'दास कॅपिटल', या ग्रंथामध्ये जगाच्या इतिहासाचे आर्थिक विश्लेषण करीत संभाव्य राजकीय परिणामांची चर्चा केली आहे. द्वंद्व (Dialectic) या माध्यमाचा वापर करतात द्वंद्वात्मक भौतिकवाद (Dialectical Materialism) आणि ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism) या दोन प्रमुख सिद्धांतांची मांडणी केली. कार्ल मार्क्सने समाजातील 'आहे रे' (Haves) आणि 'नाही रे' (Haves not) या दोन वर्गांमध्ये होणाऱ्या संघर्षाचे चिंतन केले आहे. समाजातील 'आहे रे' वर्ग आर्थिक उत्पादनाची सर्व साधने आपल्याकडे बळकावत 'नाही रे' वर्गाचे शोषण करतो.

या शोषणातून वर्गसंघर्ष निर्माण होऊन 'आहे रे' वर्गाकडून 'नाही रे' वर्गाकडे सत्तांतर होते. हाच विचार आंतरराष्ट्रीय संबंधाच्या मार्क्सवादी दृष्टीकोनतही जसाच्या तसा दिसतो. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार, 'देशांतर्गत आर्थिक घटक हे त्या देशाचे परराष्ट्र संबंध निर्धारित करतात. तेव्हा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रश्न हे आंतराष्ट्रीय सिद्धांतामध्ये वादाचे मुद्दे बनतात. विशेषतः भांडवलशाही हा 'नाही रे' वर्गाकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर संघर्ष करण्याचे एक महत्त्वाचा ठरू शकतो. म्हणूनच मार्क्सवादी दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय संबंधाच्या विश्लेषणात अर्थकारणात महत्त्वाचे स्थान देतो. यातूनच समाजवाद आणि साम्यवादाचा विकास, देशांतर्गत परिस्थिती आणि त्याद्वारे भांडवलशाही आणि साम्यवाद यातील होणारा संघर्ष हा चर्चेचा विषय विषय निर्माण झाला. कार्ल मार्क्सने भांडवलशाहीचा विकास मान्य केला असून भांडवलशाही ही राज्याची बंधने तोडून जागतिक स्वरूपावर पोहोचू शकते असा विचार मांडला. त्यामुळे त्याला अतिजागतिक (Hyper-globalist) असेही म्हणतात आपल्या नफेखोर वृत्तीमुळे भांडवलशाही स्वतःच्या नाशाकडे वळत आहे असाही विचार त्याने मांडला

रशियन विचारवंत व्लादिमिर लेनिन यानेही कार्ल मार्क्सच्या विचाराचे समर्थन केले असून 'Imperialism: The Highest Stage of Capitalism', या ग्रंथाद्वारे साम्राज्यवाद हा आर्थिक असल्याचे स्पष्ट केले. देशांतर्गत भांडवलशाही ही जागतिक पातळीवर पोहचली असून विकसित राष्ट्रांच्या नफेखोरीमुळे अविकसीत राष्ट्रांच्या शोषणास सुरवात झाली आहे. यातूनच पहिल्या महायुद्धात जगातील प्रमुख भांडवलशाही राष्ट्रे एकमेकांसमोर येऊन संघर्ष निर्माण झाला.

नंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय संबंध आणि राज्याचे मार्क्सवादी विश्लेषण करणाऱ्या प्रमुख विचारवंतांमध्ये इमॅन्युएल वॉलरस्टिन यांचा प्रामुख्याने समावेश होतो. वॉलरस्टिनच्यामते, 'राज्य आणि राज्यव्यवस्था ही जागतिक भांडवलशाही व्यवस्थेची महत्त्वपूर्ण अंगे आहेत. राज्यव्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्था यांचा एकत्र उगम असून भांडवलशाही आणि आधुनिक राज्यव्यवस्था या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत'.

इमॅन्युएल वॉलरस्टिनप्रमाणे जस्टीन रोसेनबर्ग आणि बेनो टेश्के मार्क्सवादी दृष्टिकोनात महत्वपुर्ण योगदान दिले असून राज्यव्यवस्था आणि भांडवलशाही यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. जस्टीन रोसेनबर्ग आणि बेनो टेश्के या दोघांचे विश्लेषण हे कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांतावर आधारित आहे. रोसेनबर्गने आपल्या 'The Empire of Civil Society', या ग्रंथात विविध ऐतिहासिक राज्यव्यवस्थांनी कशा प्रकारे नवीन उत्पादनाची साधनांद्वारे राजकिय आणि सामाजिक नियंत्रण प्राप्त केले आहे याची चर्चा केली. त्याच्यामते जर आपण संरचनात्मक बदलाबाबत जागरूक असू तर आपण १८ व्या शतकाने नवीन संस्थात्मक रचनेला जन्म देत सार्वभौम राज्य हे आधुनिक राजकीय नियंत्रणाचे विशेषतः भांडवलशाहीचे कसे एक माध्यम बनले हे पाहू शकतो.

बेनो टेश्के याने आपल्या ऐतिहासिक विश्लेषणामध्ये सामंतशाही ते आधुनिक भांडवलशाहीच्या परिवर्तनाचा अभ्यास केला असून 'आधुनिक राज्य आणि राज्यव्यवस्थेत होणारे ऐतिहासिक बदल हे समाजांनी आपल्यात आर्थिक जीवनात कशा प्रकारे बदल केले आहेत' याचे प्रतिबिंब आहेत असा युक्तिवाद केला आहे. विशेषतः आधुनिक राज्य आणि

राज्यव्यवस्थेचे स्वरूप हे संपत्तीची संकल्पना आणि संपत्तीचे वितरण कसे झाले यावर अवलंबून आहे. जस्टीन रोसेनबर्ग आणि बेनो टेश्के यांच्या विचारांत महत्वपुर्ण तफावत असली तरीही 'एखाद्या राज्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतलेला निर्णय हा त्या देशाच्या अंतर्गत भांडवलशाही तर्काचा परिणाम असून या भांडवलशाही तर्काला भू-राजकारणाची जोड असते' या विचारावर त्यांचे एकमत आढळते.

उदारमतवादी आणि वास्तववादी दृष्टिकोनाचे समर्थक मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. त्यांच्यामते, 'आंतरराष्ट्रीय संबंध हे मार्क्सवादाचे मुळात क्षेत्रच नाही. यामध्ये प्रामुख्याने केनेथ वॉल्ट्झ आणि मार्टिन वाईट यांचा समावेश होतो. मात्र हा युक्तिवाद इतका समर्थनीय नाही.

मार्क्सवादी दृष्टिकोन संपत्ती आणि सत्तेच्या विषम वितरणाची संबंधित असल्याने आंतराष्ट्रीय संबंधातील 'परस्परावलंबन सिद्धांता'ला (Dependency Theory) बळकटी मिळाली. यातूनच 'धनिक राष्ट्रे ही गरीब राष्ट्रांच्या शोषण आणि वसाहतीकरणातून बलवान होतात' हा विचार मांडला जाऊन आफ्रिका, लॅटिन अमेरिका, आणि आशिया खंडातील अल्पविकसित राष्ट्रांचे वसाहतीकरण व शोषण झाल्याने त्यांना विकसनशील देशांवर ती विकसित देशावरती कशाप्रकारे अवलंबून राहावे लागते? याची चर्चा सुरु झाली. मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार, 'उत्तर गोलार्धात मोडणाऱ्या विकसित राष्ट्रांनी आपली संपत्ती दक्षिण गोलार्धातील अविकसित राष्ट्रांच्या शोषणातून कमावली असल्याने उत्तर-दक्षिण असा संघर्ष निर्माण झाला आहे; हाच विचार दक्षिणेतील श्रमजीवी आणि कामगार वर्गांना क्रांती करण्यास व आंतरराष्ट्रीय व्यवस्था बदलण्यास कारणीभूत ठरू शकतो'.

मार्क्सवादाने परस्परावलंबन सिद्धांताप्रमाणेच इतर दृष्टिकोनांनाही वैचारिक खाद्य पुरवले. यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे अर्थशास्त्रीय, भांडवलशाहीच्या परिभाषेत सैद्धांतिक विश्लेषण करणे आणि सत्तेच्या वितरणातील परस्पर संबंध स्पष्ट करणे शक्य झाले आहे. यामध्ये 'गाभा - परिघ सिद्धांता'चा (Core Periphery) समावेश होतो. जगाचे विभाजन हे केवळ गरीब आणि श्रीमंत, विकसित आणि अविकसित असे न राहता 'गाभा आणि परीघ' अशा दोन गटात झाले आहे. गाभा राष्ट्रे (Core States) ही बलशाली आणि तुलनेने संघटित राष्ट्रे आहेत, तर परिघ राष्ट्रे (Periphery States) ही एकमेकांवर अवलंबून असलेली, अकुशल आणि श्रम आधारित अर्थव्यवस्था असलेली राष्ट्रे आहेत. याव्यतिरिक्त एक तिसरा गट ज्याला अर्ध-परिघ राष्ट्रे (Semi-periphery States) असेही म्हटले जाते, ज्यामध्ये दोन्ही घटकांचा समावेश आहे.

## २.४ समीक्षात्मक दृष्टीकोन (Critical Approach)

आंतरराष्ट्रीय सिद्धांतातील समीक्षात्मक दृष्टिकोनाला 'फ्रँकफर्ट स्कुल' (Frankfurt School) असेही म्हटले जाते. मार्क्सवादी विचार प्रणालीपासून प्रेरित असलेल्या समीक्षात्मक सिद्धांताची प्रमुख पायाभरणी अंतोनिओ ग्रमस्की याने केली आहे. मात्र कार्ल मार्क्सच्या विचाराने प्रेरित असूनही फ्रँकफर्ट स्कूलमधील समीक्षात्मक विचारवंत हे आधुनिक जगातील दमनाच्या मानसशास्त्रीय, सांस्कृतीक, राजकीय आणि आर्थिक अशा अनेकविविध मार्गांचा अभ्यास करण्यास उत्सुक होते. समीक्षात्मक दृष्टिकोनातील फ्रँकफर्ट विचारवंतांच्या

प्रमुख तीन पिढ्या मानल्या जातात. यातील पहिल्या पिढीच्या विचारवंतांमध्ये थिओडोर अडोर्नो, मॅक्स हॉर्खेमर आणि हर्बर्ट मर्क्युज यांचा समावेश होतो. दुसऱ्या पिढीतील विचारवंतांमध्ये युर्गेन हेबरमास यांचा समावेश होतो तर तिसऱ्या पिढीतील विचारवंतांमध्ये रॉबर्ट कॉक्स आणि अॅनड्यु लिंकलेटर यांचा समावेश होतो.

समीक्षात्मक दृष्टीकोणाने प्रत्यक्षवादी सिद्धांत (Positivism) आणि शास्त्रशुद्ध तर्कवादी (Scientific rationalism) अध्ययनपद्धतीवर सडकून टीका केली आहे. विशेषतः उत्तर प्रबोधन काळात आधुनिकता (Modernity) ही शास्त्रशुद्ध तर्कवादामुळे वसाहतिक झाली होती. या आधुनिकतेतून साध्याच्या (Ends) नैतिक अधिमान्यतेचा विचार होणे अपेक्षित होते मात्र त्याचा भर केवळ साध्यप्राप्तीसाठी किफायतशीर साधने (Means) कोणती असावीत यावर देण्यात आला. या आधुनिकतेतून मानवी जमातीला निसर्ग निसर्गावर नियंत्रण मिळवण्यासाठी मदत करणे अपेक्षित होते परंतू या शास्त्रशुद्ध तर्कवादामुळे मानवी स्वातंत्र्यावर बंधने येऊन माणसांवर वेगवेगळ्या प्रकाराची सामाजिक दमणे भक्कम झाली. फ्रैंकफर्ट स्कूलच्यामते, 'अशावेळी तार्किकतेच्या पर्यायी मार्गांना पुनरुज्जीवित करून नवीन मार्ग दाखवणे ही सामाजिक तत्त्वज्ञानाची सर्वात महत्त्वाची जबाबदारी असते'.

मॅक्स हॉर्खेमर यांनी पारंपारिक सिद्धांताचा आणि समीक्षात्मक सिद्धांत यांत फरक केला असून समीक्षात्मक सिद्धांताचा हेतू केवळ विश्लेषण न करणे नसून परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन बनने आहे असे मत मांडले. पुढे होर्खेमर यांनी कार्ल मार्क्सच्या 'तत्त्वज्ञान हे केवळ जगाचा अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने लावते मात्र परिवर्तन घडवू आणत नाही' या युक्तिवादाला उचलून धरले.

युर्गेन हेबरमास हा फ्रैंकफर्ट स्कूलमधील दुसऱ्या पिढीतील प्रमुख विचारवंत मानला जातो. त्याने समीक्षात्मक दृष्टिकोनास पुढे नेत नवीन विचार मांडण्याचा प्रयत्न केला. राजकारणाचे विश्लेषण हे नेहमी नैतिक दृष्टिकोनातून झाले पाहिजे या भूमिकेवर हेबरमास ठाम होता. त्यामुळे हेबरमासच्या रुपात समीक्षात्मक सिद्धांताने नैतिक आणि आदर्शवादी पैलूचे पुनरुज्जीवन केल्याचे आपल्याला दिसते.

आपल्या सुरुवातीच्या लेखनात हेबरमास याने 'ज्ञान समावेशी हितसंबंध' (Knowledge inclusive interests) हे महत्त्वाचे प्रारूप मांडले. या प्रारुपाद्वारे ज्ञानाची प्राप्ती कशी करावी? आणि ज्ञानाच्या माध्यमातून हितसंबंधांचे निर्मिती कशी करावी? यावर हेबरमासने भर दिला असून लोकांच्या विचार करण्याच्या कृतीला कोणकोणते घटक आकार देतात/ मर्यादा घालतात? याचे आकलन शक्य होते.

हेबरमासच्या या विचारांचा आधार घेत रिचर्ड अँश्ले याने नववास्तववाद आणि नवउदारमतवाद या दोन दृष्टीकोनांचा समाचार घेतला आहे. रिचर्ड अँश्लेच्यामते, 'नववास्तववाद आणि नवउदारमतवादी हे जग कशाप्रकारे कार्यरत आहे? विशेषतः, दमनकारी राज्यांच्या राज्यव्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्था कशा प्रकारे अस्तित्वात आहे? याचे उत्कृष्ट विवेचन करतात. मात्र या दोन दृष्टीकोनांमधील महत्त्वाचा दोष म्हणजे हे दोन दृष्टीकोण दमनाच्या कारणांना नष्ट करून स्वातंत्र्य आणि लोकशाहीला विकसित करू शकतील अशा 'मुक्तीच्या हितसंबंधां'ची (Emancipatory interests) चर्चा करत नाहीत'.

हेबरमास आणि फ्रँकफर्ट स्कूलमुळे समीक्षात्मक दृष्टीकोनाला आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विशेष वलय प्राप्त झाले. नंतरच्या काळात अँन्ड्रयु लिंकलेटर यांनी रिचर्ड अँश्लेच्या 'मुक्तीच्या हितसंबंधांची' उचलून धरत शीतयुद्धोत्तर या संकल्पनेस महत्वाचे मानले. शीतयुद्धोत्तर कालखंडात व्यक्ती (Individuals) स्व (Self) आणि जागतिक अस्मिता (Global identity) पुन्हा नव्याने तयार करू पाहत असल्याने आंतरराष्ट्रीय संबंधात मुक्तीच्या हितसंबंधांची संकल्पना महत्त्वपूर्ण मानतात. अँन्ड्रयु लिंकलेटर याने समीक्षात्मक दृष्टीकोन स्वीकारत असताना वैश्विक मूल्यांचा स्विकार केल्याचे दिसते. लिंकलेटर याने जगभरातील विविध समुदायातील लोकांच्या निष्ठेस प्राधान्य दिले असून लिंकलेटरच्या या दृष्टिकोनाचे महत्त्व म्हणजे शीतयुद्धोत्तर काळात पाश्चात्य विचारपरंपरेत जेव्हा व्यापक प्रमाणात विलगतेची (Exclusion) भूमिका प्रबळ होत आहे तेव्हा लिंकलेटर मुक्तीच्या कल्पनेतून सर्वसमावेशक विचार मांडण्याचा प्रयत्न करतांना दिसतो.

## २.५ स्त्रीवादी दृष्टीकोन (Feminist Approach)

आतापर्यंत अभ्यासलेले आंतराष्ट्रीय संबंधातील पारंपरिक दृष्टिकोन हे सत्ता, हितसंबंध, जागतिक व्यवस्था यासारख्या ठराविक गृहितके आणि विशिष्ट प्रश्नांना केंद्रित ठेवून मांडण्यात आले आहेत. या दृष्टीकोनांच्या अध्ययन पद्धतीत मुलभूत फरक असला तरीही मांडण्यात आलेले निष्कर्ष थोड्याफार फरकाने समान आहेत. याठिकाणी आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील स्त्रीवादी दृष्टीकोन वेगळा ठरतो. आंतरराष्ट्रीय संबंधातील पारंपारिक चर्चा ही लिंगभाव (Gender) आणि स्त्रीवादी दृष्टीकोन (Feminist Approach) यापासून दूर जाणारी आहे. निर्णय प्रक्रियेतील स्त्रियांचे स्थान आणि भूमिका, विश्व- राज्याच्या संकल्पनेतील स्त्रियांचे स्थान आणि आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आकलनात स्त्रियांच्या प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार केल्यास प्राप्त होणारे निष्कर्ष हे वेगळे असतील. त्यामुळे स्त्रीवादी दृष्टिकोनाची नितांत गरज आहे हे वारंवार सिद्ध झाले आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये 'लिंगभाव' या संकल्पनेचा वापर करत असतांना ‘लिंग’ (Gender) या संकल्पनेचा अर्थ 'स्त्रीभाव आणि पुरुषत्व यांतील फरक व्यक्त करणाऱ्या समाजमान्य वर्तन आणि अपेक्षा असे अपेक्षित असते. मात्र वास्तविक पाहता, लैंगिक ओळख ही जैविकदृष्ट्या अनुवंशिक आणि बाह्य शरीर वैशिष्ट्यांवर आधारित आहे. अशावेळी स्त्रीवादाच्या चर्चेची सुरवात करतांना व्ही. स्पाइक पीटरसन आणि ॲन सिसॉन रुनयान यांनी पाश्चात्य समाजातील दांभिकतेचा समाचार घेतला आहे. त्यांच्या मते, ‘पाश्चात्त्य संस्कृतीतील ‘पुरुषत्वा'ची भावना ही वर्चस्ववादी, तार्किकता आग्रही, महत्त्वाकांक्षा आणि शक्ती यांची निदर्शक आहे. जेव्हा स्त्रिया अशाप्रकारची आग्रही आणि महत्त्वाकांक्षी भुमिका स्विकारु लागतात तेव्हा त्यांना त्या 'पुरूषी' आहेत असे घोषित करण्यात येते. पुरुषांतील या गुणवैशिष्ट्यांकडे पाहताना त्यांना सकारात्मक आणि कौतुकास्पद मानले जाते तर स्त्रीयांना याच गुणवैशिष्ट्यांसाठी टिकेचे लक्ष्य बनवले जाते. हे सर्व विरोधाभास दर्शवणारे आहे. स्त्रीवादी अभ्यासिका ॲन टिकनर यांनी म्हटल्याप्रमाणे, 'सर्वमान्य श्रद्धेनुसार सैन्य आणि परराष्ट्र धोरणाची क्षेत्रे ही निर्णयनिर्धारणाची क्षेत्रे असून ही क्षेत्रे स्त्रियांसाठी नाहीत. याचे कारण, ताकद, सत्ता, स्वायत्तता, स्वातंत्र्य, तार्किकता या सर्व गुणवैशिष्ट्यांचा केवळ पुरुषत्वाशी संबंध असून ज्या व्यक्तीवर आपला विश्वास आहे आणि ज्यांनी परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याची गरज आहे अशाच लोकांना ही पदे दिली जातात'. आंतरराष्ट्रीय

संबंधातील शांतता चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांकडे हिन दृष्टीकोनातून पाहिले जाते व या स्त्रिया भित्रट आणि कमजोर असून राष्ट्रप्रेमी नाहीत असा युक्तिवाद केला जातो. पारंपरिक दृष्टीकोनातून पाहता, परराष्ट्रधोरणासारख्या क्षेत्राचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा सत्ता, राजकारण, क्षमता, ताकद यासारख्या तथाकथित पुरुष गुणांची पाठराखण केली जाते. आणि आपल्या डोळ्यांसमोर स्त्रिया या उपेक्षित राहतात. त्याशिवाय आपण असा विचार करतो की निर्णयप्रक्रिया समजावून सांगण्यात पुरुष हे अधिक वरचढ असतात. या पार्श्वभूमीवर ॲन टिकनर लिंगसंवेदनशील भुमिकेची (Gender sensitive role) मागणी करतात.

ॲन टिकनरच्या मते, लिंगसंवेदनशील दृष्टिकोणातून जेव्हा आपण जगाकडे पाहू लागतो तेव्हा आपल्या असे लक्षात येते की स्त्रीयांचे चित्रण हे जाणिवपुर्वक पक्षपाती आणि मलिन करण्यात आले आहे. पुरुषत्व (Masculinity) ही संकल्पना स्वतंत्र नसून स्त्रीवादी भावनेच्या निर्मितीस विरोध करणारी आहे. ॲन टिकनरने मांडलेला हा मुद्दा समजून घेतल्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आकलनाचे एक नवे चित्र आपल्यासमोर उभे राहते.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनामध्ये १९८० च्या दशकात सर्वप्रथम स्त्रीवादी दृष्टिकोनाचा उगम झाला. पारंपारिक विचारवंतांनी ( जसे कि, हॅन्स मॉर्गेन्थॉ आणि केनेथ वॉल्ट्झ ) आपल्या लेखनातून स्त्रीयांच्या उपस्थितीस जाणीवपुर्वक नाकारल्याबद्दल स्त्रीवादी विचारवंत नाराजी व्यक्त करतात. माणसे ही आक्रमक, सैन्य आणि स्पर्धात्मक वृत्तीमध्ये उभी राहणारी तर स्त्रिया या शांतताप्रेमी आणि सहकार्य करणाऱ्या असतात हा पारंपारिक युक्तिवाद या आंतरराष्ट्रीय संबंधांच्या वारंवार दिसून येतो यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाची पारंपरिक आकलन ही मलिन झाली आहे. अशावेळी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अध्ययनामध्ये लिंगभाव चर्चा (Gender discourse) नेमकी काय भूमिका बजावू शकतो? लिंगभावाच्या अध्ययनातून आंतरराष्ट्रीय संबंधाचे कोणत्या प्रकारचे विश्लेषण किंवा पूर्वानुमान आपण करू शकतो? असे प्रश्न उपस्थित करण्यात आले. यावर प्रत्युत्तर म्हणुन ॲन टिकनर आणि इतर स्त्रीवादी विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्त्रियांचे महत्व आणि उपस्थिती अधोरेखित करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे. त्यांनी निर्णयप्रक्रिया ही लिंगभावातून कशाप्रकारे बाधित झाली आहे आणि अशा प्रकारची बाधित निर्णयप्रक्रिया स्त्रिया आणि पुरुष यांना कशा प्रकारे अडचणीची ठरू शकते हे स्पष्ट केले आहे. या चर्चेतून विविध क्षेत्रातील महिलांनी बजावलेली भूमिका आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर कशाप्रकारे सकारात्मक परिणाम करू शकते याचीही चर्चा करण्यात आली आहे.

स्त्रीवादी दृष्टीकोन अभ्यासक ॲन टिकनर यांनी मांडलेल्या दृष्टिकोनाची चिकित्सा केल्यास असे लक्षात येते कि, आपण सर्वप्रथम आपल्या आकलनाच्या पारंपरिक विचारांना मागे टाकून जगाची रचना कशी आहे याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. पुढे जाण्याआधी आपण घट्ट करून ठेवलेल्या पुर्वकल्पना आणि गृहीतकांना बाजूला ठेवत स्त्रिया आणि लिंगभाव आंतरराष्ट्रीय राजकारणाची कसा अनुकूल होऊ शकतो याचा विचार करण्याची गरज आहे. केवळ आंतरराष्ट्रीय संबंधात स्त्रियांच्या भूमिका समजावून घेणे पुरेसे नसून स्त्रीवादी सिद्धांतांची निर्मिती होणे आणि त्याअनुषंगाने सत्ता, सार्वभौमत्व, सुरक्षा यांसारख्या कल्पनांची नव्याने मांडणी होणे गरजेचे आहे. केवळ पारंपारिक सिद्धांताचा वापर करून आपण आज समजून घेत असलेल्या सुरक्षेच्या प्रश्नांची नवीन उत्तरे शोधणे मांडणे हे काहीसे

असंयुक्तिक आहे. ॲन टिकनर आणि इतर स्त्रीवादी विचारवंत याठिकाणी स्त्रीवादी दृष्टिकोनाच्या उपायोजनाची (Application) मागणी करतात.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये गतीमानपणे बदल झाले असून काय आणि कसे घडत आहे? यासारख्या प्रश्नांची अधिकाधिक चर्चा आता होऊ लागली आहे. अशावेळी या नवीन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्त्रीवादी दृष्टीकोन फार महत्त्वाची भूमिका बजावेल असे मानले जात आहे. ॲन टिकनर यांनी आपले मत मांडत असताना महत्त्वपूर्ण उदाहरण दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, पारंपारिक दृष्टीकोनातून होणारा आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास हा युद्ध, युद्धाची कारणे, आणि त्याच्या समाप्तीचे मार्ग यांचे चर्चेपुरता सिमीत असतो. मात्र, स्त्रीवादी अभ्यासक युद्धादरम्यान काय घडते? त्याची कारणे काय आहेत? आणि ते कसे संपेल ? याची चर्चा करतात. युद्ध हा केवळ सैन्य कवायतीचा भाग नसून यामध्ये राज्य आणि सैन्याप्रमाणेच व्यक्ती, व्यक्तीगत सुरक्षा, स्त्रिया, लहान मुले यांचाही समावेश होत असतो. हे सर्व घटक युद्धात सर्वात जास्त झळ सहन करत असतात. उदारमतवादी आणि संरचनावादी दृष्टिकोनाप्रमाणे स्त्रीवादी दृष्टीकोन हा 'राज्य' संकल्पनेवर भर देत व्यक्ती सामाजिक रचनेत कशाप्रकारे भूमिका पार पाडतो? हे पाहतो. सामाजिक रचनेतील विषमतेचे स्त्रिया तसेच पुरुषांवर काय परिणाम होतात? आणि, ही विषमता कशाप्रकारे दूर केली जाऊ शकते? याचाही विचार स्त्रीवादी अभ्यासक करतात. पुरुषसत्ताक आणि स्तरीय रचनेमध्ये राजकीय व्यवस्थेमध्ये स्त्रियांचा आवाज कशाप्रकारे ऐकला जाईल हे पाहणे गरजेचे असते. आणि जर अशा वेळेस स्त्रियांचा आवाज हा अनुपस्थित असेल तर स्त्रियांसाठी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये मोठी पोकळी निर्माण राहते. अशावेळी केवळ 'शांतता' (Peace) हा फक्त स्त्रियांचा प्रश्न आहे हा पारंपरिक विचार मागे टाकून कोणतेही राज्याने आपल्या सर्व नागरिकांचे निर्णयप्रक्रियेत समावेशन केले पाहिजे.

## २.६ समारोप

या प्रकरणात आपण आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाशी निगडीत मार्क्सवादी, समीक्षात्मक आणि स्त्रीवादी या तीन दृष्टीकोनांची चर्चा केली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जेव्हा फ्रान्सिस फुकुयामासारख्या अमेरिकन विचारवंतांनी भांडवलशाहीचा विजय झाल्याचे सांगत उदारमतवाद हा एकमेव विचार आता उरला आहे असे मत मांडले तेव्हा त्यावर टिका होऊन इतर दृष्टीकोन सक्रियपणे पुढे येऊ लागले. या पर्यायी दृष्टीकोनांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात महत्वपुर्ण योगदान दिले आहे.

## २.७ सराव प्रश्न

१. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या मार्क्सवादी दृष्टीकोनाची चर्चा करा.

२. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या समीक्षात्मक दृष्टीकोनाची चर्चा करा

३. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्त्रीवादी दृष्टीकोनाची चर्चा करा

## २.८ संदर्भ

१. Introduction to International Relations: Theory and Practise - Joyce P. Kaufman Rowman & Littlefield Publishers

२. An Introduction to International Relations- Richard Devetak, Jim George, Sarah Percy Cambridge University Press

❄❄❄❄❄❄❄

# ३

# आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यस्था आणि जागतिकीकरण

**घटक रचना:**

३.१ उद्दिष्टये

३.२ आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यस्था संकल्पना

३.३ ब्रिटन वूड्स संस्थेचे मूल्यमापन

३.४ जागतिकरण संकल्पना व प्रभाव

३. ५ क्षेत्रीय संघटना व मुक्त व्यापार

३.६ सारांश

३.७ आपण काय शिकलो

३.८ संदर्भ सूची

## ३.१ उद्दिष्टये

आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्था आणि जागतिकीकरण हा समकालीन आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्वाचा अभ्यास विषय आहे. यादृष्टीनें आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यस्था या संकल्पनेचा आढावा घेऊन १९४० च्या दशकात निर्माण झालेल्या ब्रिटन वूड्स संस्थेचे जागतिकीकरण राजकारणातील मूल्यमापन करणे हे या घटकातील एक महत्वाचे उध्दिष्टये आहे. जागतिकीकरणाने जगातील सर्वच क्षेत्रांना सर्वाधिक प्रभावित केलेले दिसते. त्या जोडीस क्षेत्रीय संघटना व मुक्त व्यापार करारनी ही आंतर राष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. यादृष्टीने जागतिकीकरण या संकल्पनेची मांडणी करून आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवरील जागतिकीकरणाचा व प्रभाव अभ्यासणे त्याबरोबरीने क्षेत्रीय संघ संघटना व मुक्त व्यापार करारांचा ही यादृष्टीने अभ्यास करणे हे या घटकातील उध्दिष्टये आहे. या घटकाच्या आकलनातून आपली आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, मुक्त व्यापार करार व क्षेत्रीय संघ, संघटना याविषयीची समज आर्थिक प्रगल्भ होण्यास मदत होईल.

## ३.२ आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था संकल्पना

आंतरराष्ट्रीय व्यापार, व्यापारासाठी ठरविण्यात आलेले आंतरराष्ट्रीय नियम हे नियम अंमलात आणण्यासाठी कार्यरत असणाऱ्या संघटना बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धा व सहकार्य बाजारपेठ यासारख्या घटकांचा आंतर राष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था या घटकात समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था ही संकल्पना साधारणतः दोन वर्षांनी वापरली जाते. एका अर्थाने या संदभातील प्रश्नाचा घटकांचा अभ्यास करणारा एक विषय तर दुसरे म्हणजे

जागतिक राजकारण व अर्थकारण यासंबधी विचार करण्याची एक पद्धती त्यावरून आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था ही संकल्पना साधारणतः आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था हि मुख्यतः राजकारण वअर्थकारण यांच्यातील परस्पर संबंधा वर जोर देते.

**आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेची उद्दिष्टये :**

आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था या संकल्पनेचा अर्थ व स्वरूप आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेचा पुढील उद्दिष्ठांवरून अधिक स्पष्ट होऊ शकेल.

१) **परराष्ट्रीय धोरणाची उध्दिष्टये साध्य करणे:** आधुनिक काळातील परराष्ट्र धोरणाची उद्धिष्ठये साध्य करण्याचे महत्वाचे साधन म्हणून आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था या घटकाचा वापर होत असलेल्या प्रत्ययास येतो. उदा.दुसऱ्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण आर्थिक धोरणाद्वारे प्रभावित केले जातात. वा एखाद्या राष्ट्रास आर्थिक मदत न करण्याची धमकी देऊन ही त्यासंदर्भात राज्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला जातो. एकंदरीत आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आपले परराष्ट्रीय धोरणाची उद्धिष्ठये गाठण्याचा प्रभावी साधन म्हणून राज्य वापर करताना दिसतात.

२) **क्षमता निर्धारण :** आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये राज्यांची क्षमता हा घटक महत्वाचा ठरत असतो. यादृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था या घटकाच्या माध्यमातून राज्य आपली क्षमता वाढवण्यावर तसेच शत्रूराष्ट्राच्या क्षमता कमी करण्याकरिता प्रयत्नशील असतात. उदा. कच्च्या मालाचा उपलबद्ध सर्व साठा ताब्यात घेऊन शत्रूराष्ट्रांच्या औद्योगिक क्षमतेवर प्रभाव पडला जातो. अश्या पद्धतीने आर्थिक साधनांचा वापर करून जागतिक राजकारणाच्या दृष्टीने महत्वाच्या ठरणारा क्षमता निर्धारण हा घटक आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून प्राप्त केला जातो.

३) **आर्थिकदृष्ट्या संरक्षित राज्य निर्माण करणे:** आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यस्थेच्या माध्यमातून समकालीन काळात आर्थिकदृष्ट्या संरक्षित राज्य निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणात राज्याकडून प्राध्यान्य दिले जात असल्याचे दिसते. आर्थिक दृष्ट्या दुर्लभ राज्यांना आर्थिक मदत करून आर्थिक मदतीच्या प्रचंड ओझ्या खाली दाबून त्याना पूर्णपणे आपली आर्थिक दृष्ट्या पराधीन झालेली राज्ये नंतरच्या काळात त्याच्या पासून वेगळे होण्याची कल्पना ही करू शकत नाही.

**ब्रेटनवूड्स परिषद :**

१९३९-१९४५ याकालखंडात जगाला महायुद्धाचा सामना करावा लागला. दुसऱ्या जागतिक महायुद्धाचे परिणाम सर्वार्थाने संहारक होते. जागतिक अर्थव्यस्थेतही त्यास मोठा फटका बसला. दुसऱ्यामहायुद्धाने त्यावेळापर्यंत सर्वात विकसित असणाऱ्या युरोपास पार उद्ववस्त केले होते. युरोपची संपूर्ण अर्थव्यवस्था उध्वस्त झाली. युरोपियन राष्ट्रांच्या वसाहती सांभाण्या इतपत हि ताकद युरोपीय राष्ट्रांमध्ये राहिली नव्हती. त्यातून आर्थिक प्रश्नाचे दुष्टचक्र सुरु झाले. वसाहती गमावल्यामुळे त्याच्यापासून मिळणारे आर्थिक उत्पन्न थांबले हक्काच्या बाजारपेठा गमावल्या. सर्व पायाभूत सुविधा उद्धवस्त झाल्या होत्या. सर्व सामान्य

जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्ती होणे हि अशक्य झाले होते. यासाठी परत नव्याने पायभूत सुविधांची उभारणी करणे आवश्यक होते. परंतु कोणत्याही युरोपियन राज्यातून तेवढी आर्थिक ताकद राहिलेली नव्हती. अश्या परीस्थितीमध्ये सोव्हीएट रशिया युरोपियन राष्ट्रांना आर्थिक अमिश देऊन अंकित करण्याचा प्रयत्न करीत होता. अश्या परीस्थितीत सोव्हियेत रशिया युरोपियन राष्ट्रांची पुनर्बांधणी करणे व सोव्हियेत रशियाचा विस्तार रोखणेयासाठी अमेरिकापुढे आली. याचाच एक भाग म्हणून १९४५ साली अमेरिकेतील न्यूहॅमश्यार राज्य येथे दुसऱ्या महायुद्धातील पण मित्रराष्ट्रांची एक परिषद निर्माण झालेल्या आर्थिक प्रश्नाचा विचार करण्यासाठी व त्यावरील उपायाकरिता एक परिषद भरवण्यात आली. यालाच ब्रेटन काल परिषद असे म्हणतात. परंतु या परिषदेमध्ये आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरीका या खंडातील एक ही देशाला स्थान देण्यात आले नव्हते. याचा या परिषदेने जेव्हा राष्ट्रांच्या आर्थिक समस्यांचा केवळ विचार केला. जेत्या राष्ट्रांना पुन्हा उभे कारण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये कोणते बदल केले असता ते आपल्या हिताचे ठरतील ते निश्चित करण्यात आले. त्याप्रमाणे करार करून ही काही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आल्या. नंतर या काळात हे करार इतर देशांवर लादण्यात आले. यातून निर्माण झालेल्या संघटनां ब्रेटनवूड्स संघटना असे संबोधिले जाते.

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्था जागतिक विकासाकरिता स्थापन झालेल्या संस्था आहेत असा सर्वसाधारण समज आहे. वास्तवात मात्र या संख्या दोन 'महायुध्याच्या दरमान्यांच्या काळात निर्माण झालेल्या आर्थिक गोंधळाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झाली होती. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दुसऱ्या महायुद्धा नंतर १९९५ ते १९५० च्या दरम्यान स्थापन झाल्या गॅट कराराची जागा पुढे १९४५ साली जागतिक व्यापार संघटनेने घेतली या तीनही संघटना अमेरिकेच्या आग्रही पुढाकाराने स्थापन झाल्या होत्या. त्यास युरोपियन राष्ट्रांची सहमती होती. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस वेग देणे हा संस्था स्थापण्यामागील हेतू होता. आज जगातील बहुतांश राष्ट्रे या तीन संस्थेचे सभासद आहेत.

**जागतिक बँक :**

जगातून दारिद्र्य नष्ट करणे, गरीब देशामधील सर्वाधिक गरीब जनतेस मदत करणे, जगाने मान्य केलेले साहचक्र विकास उध्दिष्टये प्रत्क्षत आणण्यासाठी प्रयत्न करणे ही काही प्रमुख उध्दिष्टये जागतिक बँकेच्या स्थापने मागे होती. जागतिक बँकेची सदस्य संख्या जसजशी वाढत गेली त्याप्रमाणात जागतिक बँकेची उध्दिष्टये हि विस्तारत गेलेली दिसतात. कामाच्या स्वरूपात ही बदल होत गेलेला दिसतो. कामाची व्याप्ती या गुंतागुंत वाढल्यामुळे जागतिक बँकेने संलग्न अश्या चार संस्था स्थापन केल्या. सध्या या पाच संस्था एकत्रिपणे काम करतात. त्यांना मिळून जागतिक बँक असे संबोधिले जाते. या पाच संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

१ आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक (International Bank for Reconstruction and development (IBRD)) स्थापना १९४४

२. आंतर राष्ट्रीय विकास संघ (The International / Development Association) स्थापना - १९६०

३. आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ (The international / Finance Corporation)

४. बहुराष्ट्रीय गुंतवणूक संस्था (Multinational Investment Guarantee Agency)

५. आंतरराष्ट्रीय गुंतवणूक तंटा निवारण केंद्र (The International Centere for settlement of Investment disputes)

१९४६ साली जागतिक बँक ही संस्था ज्यावेळी कार्यान्वित झाली. त्यावेळी जागतिक बँकेची सभासद संस्था ही केवळ ३८ होती. सध्या ही सदस्य संख्या १९० पेक्षा अधिक आहे. जागतिक बँकचे मुख्यालय हे वाशिंग्टन येथे असून जगभरात १०० हुन अधिक राष्ट्रमंध्ये जागतिक बॅकचे कार्यालय कार्यरत आहेत.

**जागतिक बँक - रचना :**

जागतिक बँकेची रचना पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्प्ष्ट करता येईल.

**१. बॅकचे नियामक मंडळ:** जागतिक बॅकचे कार्य सरकारी संस्थेमध्ये चालवले जाते. सर्व सदस्य राष्ट्रेही बँकेचे भाग धारक मानले जातात. सर्व सभासद राष्ट्रे आपले प्रतिनिधी जागतिक बँकेत नियुक्त करतात. हे प्रतिनिधी शक्यतो त्या दोघांचे अर्थमंत्री केंद्रीय बॅकेचे प्रमुख असतात. सदस्य राष्ट्रे एका सदस्या बरोबर पर्यायी एक सदस्य ही नियुक्ती करतात. यावर्षी सभासद राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे मिळून एक नियामक मंडळ बनवले जाते. सर्व निर्णय या नियामक मंडळातच घेतले जातात. या नियामक मंडळाची बैठक वर्षातून एकदा घेतली जाते.

**२. संचालक मंडळ:** जागतिक बँकेत नियमित कामकाजा करिता एक कार्यकारी संचालक मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या कार्यकारी संचालक मंडळात २४ सदस्य असतात. यातील पाच सदस्य हे फ्रान्स, जर्मनी, जपान, ब्रिटन व अमेरिका यादेशांमधून प्रत्येकी एक प्रमाणे निवडले जातात. तर उर्वरित १९ सदस्य हे इतर सभासद राष्ट्रामधून निवडले जातात. जागतिक बँकचे अध्यक्ष हे संचालक मंडळाचे नेतृत्त्व करतात. या संचालक मंडळाची बैठक एका आठवड्यात किमान दोन वेळा होते.

**उपाध्यक्ष:** जागतिक बँकेचे अध्यक्ष यांना सहाय्य करण्याकरिता उपाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात येते. एकूण सहा उपाध्यक्ष निवडले जातात. आफ्रिका पूर्ण आशिया आणि पॅसिफिक युरोप आणि मध्य आशिया, दक्षिण अमेरिका आणि कोरियन देश, मध्य आणि पूर्व उत्तर उत्तर आफ्रिका आणि दक्षिण आशिया अशा सहा विभागासाठी हे सहा उपाध्यक्ष काम करतात. याशिवाय काही उपाध्यक्षांकडे मानवी विकास आणि दारिद्र्य निवारण यासारखे विषयही सोपवले जातात.

**जागतिक बँकेचे योगदान व कार्य:** दुसऱ्या महायुद्धामुळे मोडलेल्या अर्थव्यवस्थांना विशेषतः युरोपियन राष्ट्रांना सावरण्यात मदत करणे या प्रधान उद्दिष्टाने स्थापन झालेल्या जागतिक बँकेने आपल्या विस्ताराबरोबर उद्दिष्टांमध्ये ही वाढ केलेली दिसते. आज जगातील दारिद्र्य नाहीसे करण्याचे मोठे उद्दिष्ट जागतिक बँकेने पत्करलेले दिसते. जागतिक बँकेच्या उद्दिष्टांमध्ये १९६८ मध्ये तात्कालीन अध्यक्ष रॉबर्ट मॅक्नमास यानी मोठे बदल घडवून आणले. शाळा,

हॉस्पिटल, शेती सुधारणा, शिक्षण प्रसार यासारख्या बाबींना त्यांनी जागतिक बँकेच्या उद्दिष्टांमध्ये समाविष्ट केले शिवाय गरीब व विकसनशील राष्ट्रांना कर्ज देण्याची प्रक्रिया सोपी करून बँकेचे भांडवल वाढविण्याचे नवे मार्ग शोधण्यास ही प्राधान्य देण्यात आले.

जागतिक बँकेमध्ये धोरण मालक बदलाची प्रक्रिया अध्यक्ष ए. डब्ल्यू फ्लॉडसन यांच्या नेतृत्वाखाली १९८० च्या दशकात पार पाडली. १९८२ साली ॲनी क्रुगर यांची जागतिक बँकेत मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती झाल्यानंतर या धोरणात्मक बदलणाऱ्या या प्रक्रियेस खऱ्या अर्थाने वेग आला. मॅक्लन मास यांनी पुरस्कारलेला विकसनशील देशांना कर्ज फेडण्यासाठी कर्ज देण्याची योजना बंद करण्यात आली त्याऐवजी या विकसनशील राष्ट्रांनी आपल्या अर्थव्यवस्था यांचे प्रतिभान बदलावे याकरिता त्या राष्ट्रांवर दबाव वाढविण्यात आला. विकसनशील देशांनी कल्याणकारी योजना बंद करून तो पैसा अर्थव्यवस्था सुधारण्याकरिता वापरावा असा आग्रह जागतिक बँकेकडून करण्यात आला. त्यादृष्टीने विकसनशील देशांकरिता अर्थव्यवस्थामध्ये रचनात्मक बदल होण्याच्या दृष्टीने काही कार्यक्रम ही आखून देण्यात आले.

जागतिक बँकेने रचनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रामुख्याने मुक्त बाजारपेठेची अर्थव्यवस्था लादण्याचा प्रयत्न केला गेला. यामध्ये खाजगीकरण, उदारीकरण, व्यापारावरील व परदेशी गुंतवणुकीवरील इंधने दूर करणे या बाबींचा समावेश होता या दृष्टीने जागतिक बँकेने चलनाचे अवमूल्यन करावे किमतीवरील नियंत्रण संपवावे, सर्व प्रकारच्या सबबी ही बंद कराव्यात, परदेशी गुंतवणूकदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करावे. प्रशासकीय पारदर्शकता व सुधारणा घडवून भ्रष्टाचारास आळा घालावा. यांसारख्या अटींचा दबाव वाढविण्यात आला. जागतिक बँकेने केलेल्या या धोरणात्मक बदलांचा सर्वाधिक फटका आशिया, दक्षिण अमेरिका व आफ्रिकेमधील विकसनशील देशांना बसला. मदतीचे इतर पर्याय उपलब्ध नसल्यामुळे या विकसनशील राष्ट्रांना या अटी स्वीकारण्याशिवाय पर्याय राहिला नाही त्यामुळे त्या विकसनशील राष्ट्रां सारख्या अधिक गंभीर व गुंतागुंतीच्या बनल्या.

१९८९ च्या काळात जागतिक बँकेने आपल्या धोरणांमध्ये गुन्हा नसल्याने काही बदल केले. स्वयंसेवी संस्थांनी केलेली टीका या धोरणात्मक करिता प्रामुख्याने कारण ठरली १९८९ नंतर जागतिक बँकेने आपली धोरणे विकसोन्मुख करण्याचा प्रयत्न केला. आज बँक पुन्हा दारिद्र्य निवारण आणि पर्यावरण संरक्षण या विषयावर आपले लक्ष केंद्रित करत आहे. आज जागतिक बँक विकसनशील राष्ट्रांकरिता निधी व ज्ञान उपलब्ध करून देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून कार्यरत आहे. जागतिक बँक एक आर्थिक मदत देत नाही तर दिलेली मदत योग्य लोकांपर्यंत पोहचते आहे की नाही याचीही तपासणी करते. ज्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून दिलेला असेल त्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवते एकंदरीत जागतिक बँक जागतिकीकरणावर ही प्रक्रिया गतीमान करण्यात एक महत्त्वाची घटक संस्था म्हणून आज कार्यरत असलेली दिसते.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund):**

जागतिक बँकेच्या बरोबरीने १९४४ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेची ही स्थापना झाली परंतु १९४७ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. पंचेचाळीस राष्ट्रे या संस्थेची संस्थापक राष्ट्र होती. आज जगातील १९० पेक्षा अधिक राष्ट्र

या संस्थेची सदस्य असून या संस्थेत संयुक्त राष्ट्रांची विशेष संख्या म्हणून ही दर्जा प्राप्त झालेला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी चे मुख्यालय वॉशिंग्टन येथे आहे. १९२९ साली आलेल्या जागतिक महामंदीने जे आर्थिक पेचप्रसंग निर्माण केले होते त्या पद्धतीचा आर्थिक संकटांना रोखणे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी स्थापन करण्यामागील प्रधान हेतू होता.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टे:**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची काही प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडता येतील

१. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यस चालना देणे.

२. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा समतोल विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

३. चलन विनिमय दरांमध्ये स्थिरता राखण्याकरिता प्रयत्नशील राहणे.

४. आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचे व्यवहार सुलभ होणे करिता प्रयत्न करणे.

५. आर्थिक संकटे रोखण्याचा प्रयत्न करणे.

६. आर्थिक संकटात असणाऱ्या राष्ट्रांना मदत करणे.

७. आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था स्थिर राहण्याकरीता प्रयत्न करणे.

८. विकास प्रकल्पांना चालना देऊन दारिद्र्य निवारण करण्याचा प्रयत्न करणे.

९. राज्यांना समर्थ अर्थव्यवस्था निर्माण करण्याकरिता मदत देणे इत्यादी.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी रचना:**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेची रचना पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. बोर्ड ऑफ गव्हनर्स**: बोर्ड ऑफ गव्हनर्स ही आंतरराष्ट्रीय नाणे निधीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था मानली जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा एकूण सभासद राष्ट्रांचे मिळून एक बोर्ड ऑफ गव्हनर्स तयार होते. जागतिक बँकेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक राष्ट्रास आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्यत्व पत्करणे अनिवार्य आहे. बोर्ड ऑफ गव्हनर्स मध्ये प्रत्येक सभासद राष्ट्र आपले व आपल्या गटाचे प्रतिनिधित्व करणारा एक गव्हनर्स व एक पर्यायी गव्हर्नर नियुक्त करतात या बोर्ड ऑफ गव्हनर्स ची वर्षातून किमान एक बैठक होते.

**२. कार्यकारी मंडळ:** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बॉर्ड ऑफ गव्हर्नर सदस्य हे कार्यकारी मंडळातील सदस्यांची नियुक्ती करतात. त्यात सदस्य राष्ट्रांनी व राष्ट्रांच्या गटांनी नियुक्त केलेले. किंवा निवडून दिलेले २४ सदस्य असतात. अमेरिका, रशिया, सौदी अरेबिया यासारख्या मोठी अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांचे स्वतंत्र सदस्य असतात तर छोटी राष्ट्रीय गट करून सदस्य निवडून पाठवतात अशा पद्धतीचा सर्वात मोठा २४ राष्ट्रांचा एक गट कार्यरत आहे. हे कार्यकारी मंडळ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ते दैनंदिन कामकाज पाहते.

**३. व्यवस्थापकीय संचालक :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्यकारी मंडळ व्यवस्थापकीय संचालक यांची निवड करते, कोणत्याही कार्यकारी संचालक या

पदाकरिता आपले नामांकन करता येते. या पदाकरिता शक्यतो सहमतीच्या नावाने एक मताने निवड केली जाते. व्यवस्थापकीय संचालक आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे नेतृत्व करते. आंतरराष्ट्रीय नाणे निधीमध्ये १७ विविध खाती आहेत. या सर्व खात्यांमधील सर्व कर्मचाऱ्यांचा तो प्रमुख असतो व तोच निधीच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असतो. व्यवस्थापकीय संचालकांना त्यांच्या कार्यात मान राखण्याकरिता आणखीन तीन उपसंचालकांची निवड केली जाते. व्यवस्थापकीय संचालकांचा हा गट प्रामुख्याने सर्व कर्मचाऱ्यांच्या कार्यावर लक्ष ठेवणे. सदस्य राष्ट्रांच्या शासनाशी उच्च पातळीवरून संपर्क ठेवणे. प्रसार माध्यमे अशासकीय संघटना व अन्य संस्थांशी संपर्क राखणे यांसारखी कार्य पार पाडतात. व्यवस्थापकीय संचालक गटाची वर्षातून किमान एक वेळा बैठक होते.

४. **कोटा:** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी मधील सभासद राष्ट्राचे स्थान हे त्या राष्ट्राच्या आर्थिक सभेवर अवलंबून असते. प्रत्येक राष्ट्रास एक निश्चित कोटा दिलेला असतो. हा कोटा त्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या एकूण आकारावरून ठरतो उदाहरणार्थ अमेरिकेचा कोटा सर्वात म्हणजे १६.७७% इतका आहे तर पलाऊ या देशाचा कोटा सर्वात कमी म्हणजे ०.१ टक्के इतका आहे. कोटा म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून त्या राष्ट्रात मिळणारी कमाल मदत शिवाय जेवढा कोटा असतो तेवढीच वर्गणी त्या राष्ट्रास भरावी लागते. प्रत्येक राष्ट्रस सदस्यत्व स्वीकारल्यानंतर कोट्यास २५% भाग मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय चलनामध्ये व उरलेला २५% भाग हा स्वतःच्या चालनामध्ये करणे अपेक्षित असते. दर पाच वर्षांनी सर्वसाधारणपणे राष्ट्रांच्या कोट्यांचा आढावा घेतला जातो. कोट्यामध्ये कोणत्याही स्वरूपाचा बदल करण्यासाठी किमान ८५% मान्यता आवश्यक असते. प्रत्येक राष्ट्राची मते त्या राष्ट्राच्या कोटयाच्या आधारावर ठरवली जातात. प्रत्येक राष्ट्रात किमान २५० मते असतात. त्यावरील प्रत्येक लाख SDR वर एक मिळते.

**अर्थव्यवस्था**ः आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे सदस्य राष्ट्रांनी भरलेली वर्गणी होय. शिवाय गरीब देशांना सवलतीच्या दरात कर्ज देण्याकरिता आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून विशेष निधी उभारला जातो या निधीमध्ये विकसित राष्ट्रे आपले योगदान देतात.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य:** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी प्रामुख्याने तीन स्वरूपाशी कार्य पार पडते ते म्हणजे निरीक्षण तांत्रिक सहाय्य व कर्जपुरवठा शिवाय नाणेनिधी वर्षातून दोन वेळा world Economic Outlook या नावाने अहवाल प्रसिद्ध करते. त्यामधून जागतिक व प्रादेशिक घडामोडी चा आढावा घेऊन भविष्याचा वेधही मांडलेला असतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वतीने प्रत्येक सभासद राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करून त्यास वर्षातून किमान एकदा तरी सल्ला दिला जातो. सदस्य राष्ट्राना नाणेनिधी 'कडून मोफत तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या भगिनी संस्था मानल्या जातात. या दोन्ही संस्थांची निर्मिती ब्रेटनवूड येथे १९४४ साली झाली. आपल्या सभासद राष्ट्राची जीवनमान उंचावेल असे समान उद्दिष्ट या दोन्ही संस्था

आपल्या समोर ठेवताना दिसतात. या उद्दिष्टांकडे पाहण्याचा दृष्टीकोन ही परस्परपूरक आहे. जसे कि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेकरीता प्रयत्न करते तर जागतिक बँक व भविष्यातील आर्थिक विकास व दारिद्र्य निवारण याचा विचार करते. या दोन्ही संस्था वर्षातून दोन वेळा एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात एकत्रित बैठका घेतात.

या बँकांमध्ये दोन्ही संस्थांच्या आणि नियामक मंडळाचे सदस्य एकमेकांशी चर्चा करतात व जागतिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचे उपाय मांडताना दिसतात.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे बदलते स्वरूप :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची एकूण रचना हि विकसित बड्या राष्ट्रांना एक झुकते माप देणारी आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील राष्ट्रांचे स्थान लोकशाही तत्त्वाप्रमाणे समान दर्जा देणारे असून ते आर्थिक क्षमतेवर अवलंबलेले आहे. विकासनशील राष्ट्राने याविरोधात अलीकडच्या काळात आपला आवाज संघटित करावयास सुरुवात केलेली दिसते. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकांमधून काही निर्णय घेण्यात येत आहेत. तरीही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जाचक अटींमुळे सदस्य राष्ट्रे कर्ज मागण्यात धजावताना दिसत नाहीत तरीही दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या अजून पूर्व आर्थिक संकटांना तोंड देण्याचे व जागतिक अर्थव्यवस्थेत स्थिरावताना प्रदान करण्याचे मोठे कार्य आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ने पार पडलेले दिसते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या पुढाकाराने खऱ्या अर्थाने व्याज उदारीकरण आणि जागतिकीकरणची प्रक्रिया गतिमान झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**जागतिक व्यापार संघटना (WTO):** उरुग्वे कराराचा परिणाम म्हणून गॅटचे तात्पुरत्या करारातून औपचारिक संस्थेत रूपांतर झाले. या संस्थेस जागतिक व्यापार संघटना असे संबोधले जाते. गॅटच्या मर्राकेश करारानुसार १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटना ही संस्था स्थापन करण्यात आली.

जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करण्यात येतील.

१. बहुपक्षीय व्यापार पद्धतीचा विस्तार करणे.

२. आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धिंगत करणे.

३. रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

४. विकसनशील देशांना विकासासाठी सहाय्य करणे.

५. अत्यल्प विकसित देशांना विकासाची संधी मिळावी यासाठी सकारात्मक उपाय योजना करणे.

**जागतिक व्यापार संघटना रचना:**

जागतिक व्यापार संघटनेची रचना पुढील मुद्यांचा आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**१. मंत्रीपरिषद:** जागतिक व्यापार संघटनेतील सर्वोच्च पातळीवर कार्य करण्याची संस्था म्हणून मंत्री परिषद या व्यवस्थेची रचना केली गेली आहे. या मंत्री परिषद सदस्य राष्ट्राचे वाणिज्य मंत्री सदस्य म्हणून कार्यरत असतात.

२. **सर्व साधारण मंडळ (General Council):** जागतिक व्यापार संघटनेचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्याकरता विविध मंडळे कार्य करतात. त्यापैकी सर्वसाधारण मंडळ हे सर्वात महत्त्वाचे मानले जाते. या मंडळांतर्गत ही सर्वसाधारणपणे दोन मंडळी कार्यरत असतात. त्यातील एक मंडळ राष्ट्रां राष्ट्रांमधील व्यापारातून निर्माण झालेले वाद सोडवण्याचे कार्य पार पाडते तर दुसरे मंडळ हे व्यापार धोरणाचा आढावा घेण्याचे कार्य पार पाडत असते.

३. **वाद-विवाद निवाडा मंडळ (Dispute Settlement Body):** वाद विवाद निवाडा मंडळाच्या वतीने राष्ट्रां राष्ट्रांमधील वादाचे प्रश्न समनव्याच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयन्त केला जातो.

४. **व्यापार धोरण आढावा मंडळ:** जागतिक व्यापार संघटनेच्या सर्वसाधारण मंडळाकडून व्यापार धोरणाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने तीन महिन्या करिता समित्या नियुक्त्या केल्या जातात. त्यापैकी एक म्हणजे व्यापार व विकास समिती दुसरी व्यवहार तोलावर नियंत्रण ठेवणारी समिती व तिसरी म्हणजे अंदाजपत्रक वित्तव्यवहार व प्रशासन सांभाळणारी समिती या समित्या जागतिक व्यापार संघटना व सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतात.

५. **सचिवालय : (Secretariat of the WTO) :** जागतिक व्यापार संघटनेचे प्रशासन हे वास्तविकता प्रशासन सचिव पातळीवर मंडळाकडून राबवले जाते. सचिवालयाच्या या प्रमुख्यास डायरेक्टर जनरल असे म्हणतात. या डायरेक्टर जनरल ची नियुक्ती मंत्री पातळीवर परिषदेमार्फत केली जाते. याची मुदत चार वर्षाची असते. या डायरेक्टर जनरल ची मदत करण्याकरिता चार स्वतंत्र डेप्युटी डायरेक्टर नियुक्त केले जातात.

**जागतिक व्यापार संघटनेचे कार्य:**

जागतिक व्यापार संघटनेचे प्रमुख कार्य पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. बहुपक्षीय व्यापार संबंधितांच्या कराराचे प्रशासन आणि अंमलबजावणी करण्याचे कार्य WTO ने पार पाडलेले आहे.

२. व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्याकरता समन्वयक म्हणून WTO महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

३. आंतरराष्ट्रीय व्यापार व व्यवहारांमध्ये जे वाद वा तंटे निर्माण होतात त्यांचे शांततेच्या व समन्वययाच्या मार्गने निरसन करण्याचे WTO ने पार पाडले आहे.

४. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अडचणीच्या ठरणाऱ्या जकाती व व्यापारातील इतर निर्बंध पद्धती पासून सुटका करून देण्याचे महत्त्वाचे कार्य WTO ने पार पडलेले दिसते,

५. आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ होण्याच्या दृष्टीने नियमावली विकसित करण्याचे व त्यास जागतिक राष्ट्रांची मान्यता घेण्याचे कार्य WTO पार पडताना दिसते.

६. जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँके सारख्या संस्थांना सहकार्य करण्याचे कार्य WTO पार पडते.

एकंदरीत WTO एकमेव जागतिक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. जी राष्ट्रांच्या दरम्यान व्यापारा विषयी नियमांशी संबंधित आहे. WTO च्या ठरावांना जागतिक बहुतांश व्यापारी संस्था राष्ट्रांचे कायदेमंडळात मजुरी मिळते. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेकडून मांडण्यात येणारे ठराव सर्वसाधारण लांबलचक किचकट असतात कारण ती एक प्रकारे कायदेशीर संहिताच असते त्यात WTO आपल्या उपक्रमांचा विस्तृत पल्ला वर्णन करताना दिसतो.

**जागतिकीकरण ही संकल्पना व प्रभाव :** जागतिकरण हा समकालीन जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा व परवलीचा शब्द बनला आहे. जागतिकीकरण ही एक संज्ञा केवळ वर्णनात्मक नसून ती एक विशिष्ट विचार प्रणालीचे निर्देशक आहे. जागतिकरण संज्ञेस पर्यायी शब्द म्हणून सार्वत्रीकरण वा वैश्वीकरण यासारखा संज्ञा ही वापरल्या जातात. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर या तत्त्वज्ञानाला पूरक परिस्थिती निर्माण झाली. युरोपियन वसाहतवादातून स्वतंत्र झालेली राष्ट्रे आर्थिक दृष्ट्या दुर्लभ होती. परंतु त्यांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार जगातील बहुतांश राष्ट्रांचे तत्त्वज्ञान समान बदले त्यातून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस नवे परिणाम मिळाले. विचार प्रणालीच्या दृष्टीने जागतिकीकरण हे एक उपाययोजना मानवी लागेल. जागतिकीकरणाची विचारधारा प्रामुख्याने वर्तमानकालीन विचारांवर धोरणनिश्चितीवर व जागतिक व्यवहाराच्या वर्चस्व गाजवते जागतिकीकरणाची प्रक्रिया आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवल तंत्रज्ञान व माहिती यांच्या एकाच जागतिक बाजारपेठेत होणाऱ्या वाढत्या प्राप्ती व खोलीचे निर्देशन करते. जागतिकीकरणाच्या संकल्पनेने समकालीन जागतिक राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध विद्या शाखा प्रभावत केली आहे. यादृष्टीने संकल्पनेचा प्रभाव अभ्यासने आवश्यक ठरते.

**जागतिकीकरण अर्थ व व्याख्या :** जागतिकीकरण ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल

**१. एडवर्ड हर्मन:** "जागतिकीकरण ही उत्पादने भांडवल सेवा व आर्थिक संबंध यांचा सीमापार वाढता प्रभाव दर्शवणारी प्रक्रिया आहे.

**२. संयुक्त राष्ट्र :** "जागतिक सहकार्यामधून नवी राजकीय व्यवस्था स्थिर करून विकसित करणे. व त्या राष्ट्रांचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे जागतिकीकरण होय".

**३. जागतिक बँक :** "उपभोग्य वस्तूंवर सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध टप्प्याटप्प्याने रद्द करून आणि सार्वजनिक क्षेत्रातील खाजागीकरण करण म्हणजे जागतिकरण'

**कॉक्स आणि कॉटर्न :** जागतिक भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या असा त्यांचा प्रभाव करणारी आंतरराष्ट्रीय राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेत राष्ट्रांची भूमिका मर्यादित करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

वरील व्याख्यान मधून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक घटकांचे प्राबल्य अधिक असल्याचे प्रत्ययास येते. वास्तविक पाहता जागतिकीकरण हे केवळ आर्थिक प्रक्रिया • नसून ती विविध पैलू असणारी एक सर्वव्यापी प्रक्रिया आहे म्हणून जागतिकीकरण या संकल्पनेच्या

सर्वसाधारण पुढील प्रमाणे स्पष्ट केला जातो. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात व्यापक सखोल व वेगवान असे परस्पर संबंध प्रस्थापित करणारी उत्पादने सेवा व भांडवल लोकसेवा माहिती संस्कृती यांचे सीमापार वाढते प्रवाह निर्माण करणारी प्रक्रिया आहे."

**जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये:**

जागतिकीकरणाची संकल्पनांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. जागतिकीकरण ही विविध स्तरांवर लोकांची संबंध क्रिया-प्रक्रिया वृद्धिंगत करणारी प्रक्रिया आहे.

२. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही मुक्त जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीशी संबंधित प्रक्रिया आहे.

३. जागतिकीकरणाच्या एकूण प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका व प्रभाव निर्णायक स्वरूपाचा आहे.

४. आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय व्यवस्थेत बिगर शासकीय संघटनेची महत्त्वाची भूमिका आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे खास वैशिष्ट्ये आहे.

५. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विभागीय व्यापारी व आर्थिक संघटना यांची भूमिका ही महत्त्वाची ठरणारी आहे.

६. जागतिक स्तरावर व्यापार राजवटींच्या घडून आलेला उदय आणि विकास या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत एक वैशिष्ट्य मानले जाते.

**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्रराज्य व्यवस्थेतील प्रभाव पुढील मुद्द्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**१. राष्ट्र राज्य व्यवस्थेचा प्रभाव कमी झाला :** शीतयुद्धात काळात सोव्हिएत रशियाचे विघटन व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतिकारी बदल या दोन घटकांमुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक वेगवान झाली. इंटरनेट व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जगभरातील लोक एकमेकांशी जोडले गेले. त्याचबरोबर राष्ट्र राज्यांच्या सीमारेषा ही दूरवर बनलेल्या दिसतात. जागतिकारणाच्या प्रक्रियेमुळे राज्यातील नागरिकांच्या स्थलांतरावर मर्यादा टाकण्याची राज्याची क्षमता मर्यादित झालेली दिसते.

**२. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पदसोपान व्यवस्था नष्ट :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक प्रभाव म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारी राज्यांराज्यामधील पदसोपान व्यवस्था नष्ट होण्याची प्रक्रिया सुरू झाली. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे छोट्या राष्ट्रांचे व सर्वसामान्य जनतेचे सक्षमीकरण घडून येण्यास मदत झाली. या घटकांमध्ये सत्तेचे विवरण घडवून आणण्यात

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व प्रक्रियेत राज्यांची भूमिका केवळ एका उदासीन निरीक्षक असल्याचे दिसत

३. **राज्याच्या पारंपारिक मक्तेदारीचे संपुष्टिकरण**: राज्यांची काही क्षेत्रांमध्ये पारंपारिक दृष्ट्या एक प्रकारची मक्तेदारी प्रस्थापित झालेली होती. ही मक्तेदारी जागतिकरण व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीने संपुष्टात आणली. उदाहरणार्थ माहितीच्या स्तोत्रं वर राज्याचे पारंपारिक मक्तेदारी प्रस्थापित झालेली होती. मात्र इंटरनेटच्या माध्यमातून ही मक्तेदारी संपुष्टात आलेली दिसते.

४. **राज्याच्या आर्थिक क्षेत्रातील अधिकाऱ्यांवर मर्यादा:** जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने राज्याच्या आर्थिक क्षेत्रातील सार्वभौमत्वाचा बऱ्याच प्रमाणात भाग अंकित केलेले दिसते. आर्थिक क्षेत्रांमध्ये जागतिक अर्थव्यवस्था भांडवली बाजारपेठ व बहुराष्ट्रीय कंपन्या यांची भूमिका निर्णायक ठरताना दिसते आहे. उदाहरणार्थ राज्य बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हालचालींवर कोणतेही नियंत्रण प्रस्थापित करू शकत नाहीत. बहुराष्ट्रीय कंपन्यांना राज्य व राज्याचे हितसंबंध याच्याशी काहीही देणेघेणे नसते. बहुराष्ट्रीय कंपन्या परराष्ट्र क्षेत्रातील तसेच राज्यांतर्गत व्यवहारांवर निर्णय निर्मिती प्रक्रियेवर परिणाम घडवून आणतात.

५. **व्यापार संघ यांचे महत्त्व वाढले :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने एका बाजूने राज्याचे महत्त्व कमी केले तर दुसऱ्या बाजूने बहुराष्ट्रीय संघटना व व्यापार संघटना यांचे महत्त्व वाढलेले दिसते. आज जागतिक स्थरावर हे व्यापार संघ व संघटना एखाद्या राजवटी प्रमाणे कार्यरत असलेले दिसतात उदाहरणार्थ विश्व व्यापार संघटनेचे सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नियमांतर्गत जागतिक व्यापाराच्या ९६% व्यापार चालतो. या संघाने घेतलेले निर्णय सर्व सदस्य राष्ट्रांना मान्य करावे लागतात.

६. **आंतरराष्ट्रीय करारांना महत्त्व:** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय करार यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिलेले दिसते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून विविध क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय करार यांनी राज्याच्या अधिकाऱ्यांवर मर्यादा निर्माण केल्या आहेत उदाहरणार्थ मागील सहा दशकात मानवधिकार संदर्भात १०० हून अधिक लहान मोठे करार आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्यक्षात आले आहेत. यातील बहुतांश करार हे सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक असतात.

७. **अ राज्य घटकांना महत्त्व:** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने राज्य घटकांना एकूण जागतिक प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या बिगर शासकीय संस्था व संघटना बहुराष्ट्रीय कंपन्या आंतरराष्ट्रीय व क्षेत्रीय व्यापार संघ यांनी राज्याच्या पारंपारिक अधिकार क्षेत्रातही आवाहन दिलेले दिसते. एकूण निर्णय प्रक्रिया प्रभावित करण्याची क्षमता या राज्य घटकांना प्राप्त होताना दिसते. हा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक प्रभाव आहे.

८. **राष्ट्र राज्यावरील ताण व दबावात वाढ:** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत एकूण राष्ट्र राज्य व्यवस्थेवरील ताण वाढत जात असल्याचे निदर्शनास येते. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय करारांचे पालन राज्याकडून करून घेण्याकरिता सर्वकष स्वरूपाचा

दबाव वाढवत जात असल्याचे दिसते उदाहरणार्थ विश्व व्यापार संघटनेने कडून पारित करण्यात आलेल्या करारांचे पालन करण्यासाठी त्यास मान्यता व मंजुरी देण्यासाठी विश्व व्यापार संघटनेकडून छोट्या छोट्या राज्यांवर मोठ्या प्रमाणात दबाव टाकण्यात येतो याशिवाय पर्यावरण मानव अधिकार अण्वस्त्रांचा वापर या संबंधाचे जे विविध करार आहेत त्यांच्या अंमलबजावणी करिता ही सदस्य राष्ट्रांवर मोठ्या प्रमाणात दबाव वाढवला जातो या सर्व प्रक्रियेमुळे राज्यावरील ताण वाढताना दिसतो.

९. **राष्ट्रीय सार्वभौमत्वावर आक्रमणः** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राज्य संकल्पनेचा अपरिहार्य घटक असणाऱ्या सार्वभौमत्व या तत्त्वास प्रभावित केलेले आढळते. जागतिकीकरणच्या प्रक्रियेत अंतर्गत व परराष्ट्र धोरण विषयक प्रक्रिया राबवताना राज्यांकडे असणाऱ्या सार्वभौम शक्तीला एका बाजूने प्रभावित केले आहे तर दुसऱ्या बाजूने विविध आंतरराष्ट्रीय संघटनांच्या मार्फत राज्यांचे चौकशीचे पडताळणीचे प्रकार वाढवले गेले आहेत उदाहरणार्थ आंतरराष्ट्रीय अनुशक्ती संस्थेकडून अनेक राष्ट्रांवर दबाव वाढविला जातो. इराक, इराण, उत्तर कोरिया यांच्यावर केली गेलेली कार्यवाही ही त्या राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा वरील एका प्रकारचे आक्रमण होते.

सारांश जागतिकीकरणाची प्रक्रिया ही समकालीन जागतिक राजकारणात सर्वाधिक प्रभावित करणारी प्रक्रिया मानली जाते. जागतिकीकरण एकीकरण व परस्परावलंबत्वाची एक आंतर प्रक्रिया आहे जी व्यवहाराच्या सर्वच क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात येताना दिसते. माहिती तंत्रज्ञानातील क्रांती व भांडवली बाजारपेठांच्या वाढीपूढे एकूण जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झालेली दिसते.

**क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय संघटना:** आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये क्षेत्रीय संघ आंतरराष्ट्रीय संघटना व व्यापारी संघ यांचे महत्त्वाचे स्थान निर्माण झाले आहे आज जगभरातील कोणतेही राष्ट्र स्वतंत्रपणे आपले धोरण प्रक्रिया राबवू शकत नाहीत परस्पर सामंजस्य सहकार्य याशिवाय राष्ट्र राज्यांना पर्याय नाही दुसऱ्या महायुद्धानंतर च्या काळात या संदर्भातील जाणीव राष्ट्र राज्यांमध्ये आर्थिक वृद्धिंगत होत गेल्याचे दिसते जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने यादृष्टीने अधिक पोषक वातावरण निर्माण केलेले दिसते त्या दृष्टीने या संदर्भातील महत्त्वाच्या संघ व संघटनांचा भाग अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

**क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय संघटना:** आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये क्षेत्रीय संघ आंतरराष्ट्रीय संघटना व व्यापारी संघ यांचे महत्वाचे स्थान निर्माण झालेले आहे. आज जगातील कोणतेही राष्ट्र स्वतंत्रपणे आपली धोरण प्रक्रिया राबवू शकत नाहीत. परस्पर सामंजस्य, सहकार्य याशिवाय राष्ट्र राज्यांना पर्याय नाही. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात यासंदर्भातील जाणीव राष्ट्र राज्यामध्ये अधिक वृद्धिगत होत गेल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने यादृष्टीने अधिक पोषक वातावरण निर्माण केलेले दिसते. त्यादृष्टीने या संदर्भातील महत्वाच्या संघ व संघटनांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय संघटना अर्थ :** क्षेत्र हि भौगोलिकतेशी निगडित असणारी संकल्पना आहे. क्षेत्राची व्याख्या ही सतत बदलत असलेली आपणास दिसते त्याचप्रमाणे काळाप्रमाणे एखाद्याला विशिष्ट क्षेत्रात राज्यांच्या एकत्र राहण्याची कारणेही बदलू शकतात जसे की युद्धोत्तर काळात पूर्व युरोपमधील अनेक देशांना प्रामुख्याने पाश्चिमात्य असणाऱ्या युरोप एच

समूहात प्रवेश देण्यात आला आहे. त्यानुसार पश्चिम युरोपीय आत्मभान आतून वेगवेगळे युरोपीय आत्मभान विकसित होत असल्याचे दिसते त्याप्रमाणे पश्चिम युरोपीय क्षेत्राची व्याख्याही बदलताना दिसते हीच बाब आपणास आशियातील राष्ट्रांच्या आशियान या संघटने संदर्भात घडताना दिसते क्षेत्रीय एकत्र येण्याची कारणे व घटक बदलते असू शकतात. जसे की पश्चिम युरोप व आग्नेय आशिया मधील राष्ट्रांच्या क्षेत्रीय त्याच्या आधारावर एकत्र येण्यामागे एकेकाळी सुरक्षा हा घटक प्रभावी होता. आज या सुरक्षाच्या घटकाची जागा प्रामुख्याने आर्थिक हितसंबंधांना घेतलेली दिसते.

साधारणतः सुस्पष्ट अशा क्षेत्रांमध्ये क्षेत्रीयतेची प्रक्रिया सुरू होते. समान भौगोलिक सांस्कृतिक ओळख, सामायिक हितसंबंध असलेल्या क्षेत्रीय देशांमध्ये आर्थिक, राजकिय सुरक्षा विषय राजकीय सहकार्य वाढीस लागणे या क्षेत्रीय असे म्हणतात यावरून क्षेत्रीय संघटना क्षेत्रीय संघटनांची व्याख्या साधारणता पुढील शब्दात मांडता येऊ शकते. क्षेत्रीय किंवा प्रादेशिक संघटन म्हणजे समान देशांच्या किंवा गरजांच्या प्राप्तीकरिता राष्ट्रांच्या सभासदांनी एकत्र येऊन स्थापन केलेले संघटन होय.

**महत्त्वाच्या क्षेत्रीय / आंतरराष्ट्रीय संघटना:** जागतिक राजकारणात प्रभावित करणाऱ्या काही प्रमुख संघ व संघटनांची मांडणी पुढील प्रमाणे संक्षिप्त स्वरूपात करता येईल

**१. युरोपीय संघ (युरोपियन युनियन):** पश्चिम युरोप मधील राष्ट्रांनी दुसऱ्या महायुद्धानंतर परस्पर सहकार्याने आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी युरोपीय संघाची स्थापना केली. बेल्जियम जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्सझोबुर्ग व नेदरलँड सहा देश युरोपियन संघाचे संस्थापक राष्ट्र आहेत. १९९१च्या ऐतिहासिक मॅट्रीश करारातून युरोपियन महासंघाचा उदय झालेला असला तरी वास्तव १९५१ पासून युरोपीय महासंघाची पार्श्वभूमी तयार झाली त्यात १९५१ असा पॅरिस करार १९००-५७ चा करार १९८६ साली झालेला एकिकृत युरोपियन कायद्याविषयी करार व १९९१ चा मॅट्रीश करार यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

मॅट्रीश करार ९ नोव्हेंबर १९९३ रोजी अस्तित्वात आला व युरोपीय महासंघ अस्तित्वात आला सध्या युरोपियन महासंघाचे सदस्य संख्या ही पंधरा होती मात्र यातून अलीकडच्या काळात ब्रिटन ने बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला आहे

**युरोपियन महासंघाची उद्दिष्टे:**

१. सदस्य राष्ट्रांमधील आर्थिक व्यापारी सामाजिक व राजकीय पातळीवरील सहकार्य वाढविते

२. आर्थिक वित्तीय संघ स्थापन करणे

३. एक समान चलन व्यवस्था निर्यात करणे

४. युरोप सामूहिक संरक्षण आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न करणे

५. संपूर्ण युरोप करिता एका नागरिकाच्या निर्मिती करिता प्रयत्न करणे

२. **आशियानः** १९६७ साली आशियान या संस्थेची स्थापना झाली. दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांची सहकार्य संघटना म्हणून आज जागतिक राजकारणात अभियानाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. ८ ऑगस्ट १९६७ रोजी बँकॉक येथे आशियानची स्थापना झाली. इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन, सिंगापूर, थायलंड आणि हे आशियातले मूळ सभासद राष्ट्र आहेत. त्यानंतरच्या काळात १९८४ मध्ये ब्रुनेई १९४५ मध्ये व्हियेतनाम आणि १९९७ मध्ये मॅनमार व लाओस तर १९९९ मध्ये कंबोडीया हे देश आशियन मध्ये सामील झाले. राष्ट्रांच्या शासन प्रमुखांची शिखर परिषद ही अभियान निर्मित निर्णय प्रक्रियेतून सर्वोच्च परिषद आहे. आशियाई शिखर परिषद दरवर्षी भरते परराष्ट्र मंत्र्यांची परिषद ही दरवर्षी भरवली जाते अभियान म्हणजे पाच वर्षांच्या मुदतीत करता अभियानाच्या मुख्य सचिवांची नेमणूक केली जाते.

अभियानाच्या माध्यमातून काही महत्वाचे करार घेऊन आलेले आहेत. त्यात अभियानाचा प्रकार १९६७ मध्ये शांतता स्वतंत्र असलेल्या क्षेत्राच्या जाहीरनामा १९७१ चा शहराच्या दक्षिण चीन समुद्र विषयक जाहीरनामा १९९२ चा आग्नेय आशिया रहित विरहित क्षेत्राचा करार १९९७ अभियान विजन २०२० ते १९९७ हे महत्त्वाचे मानले जातात. क्षेत्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून १९९४मध्ये अभियान क्षेत्रातील व्यासपीठाची ( ARF - ASEAN REGIONAL FOURAM) ची स्थापना करण्यात आली आहे. या फोरममध्ये अभियानाच्या दहा सदस्य राष्ट्रांचे शिवाय ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चीन, युरोपियन संघ, भारत, जपान, उत्तर दक्षिण कोरिया, मंगोलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान, पापूआन्यूगिनी, रशिया-अमेरिका यांचा समावेश आहे. यांचा फोरम मध्ये क्षेत्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींवर चर्चा व वाटाघाटीने केल्या जातात. १९९२ पासून मुक्त व्यापार क्षेत्राची AFT- ASEAN free Trade Area) वाटचाली दमदारपणे सुरू आहे. आशियानने भविष्यतील दृष्टीकोनाने आर्थिक व वित्तीय क्षेत्रातील एकात्मीकरण आणि आशियान देशाना जोडणारी वाहतूक व्यवस्था हवाई वाहतुकीचे एकत्रीकरण आणि आशियानचे ऊर्जा नेटवर्क यांचे महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते.

**सार्क (SAARC - दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य परिषद):**

**पार्श्वभूमी:** दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना. या देशांनी एप्रील ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल ईर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली होती. या सर्व देशांनी त्या वेळी ऋषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लेकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृतिकार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रिल २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. सध्या ऑस्ट्रेलिया, चीन, इराण, जपान, मॉरिशस, म्यानमार, दक्षिण कोरिया, अमेरिका

हे आठ देश आणि युरोपियन युनियन ही संघटना यांना निरीक्षक देश म्हणून 'दर्जा देण्यात आला आहे.

म्यानमारला लवकरच पूर्ण सदस्यसत्व दिले जाईल, तर रशिया, दक्षिण आफ्रिका आणि टर्की हे देश निरीक्षक देशाचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नशील आहेत.

**रचना व कार्ये :** नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कच्या सरचिणीसाची नियुक्ती सदस्यदेशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्यदेशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद ( वर्षातून एकदा) देशांच्या नावाच्या आकारव्हिलेनुसार त्या-त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते. आणि त्या बैठकिला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख/पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगला देश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणाऱ्या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही. पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरूद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५ च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत.

**मूल्यमापन:** भारत आणि अन्य सदस्य देश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को - ऑपरेशन डायलॉग (ACD -३४ देश), साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को-ऑपरेशन (SASEC - ६ देश), मेकॉंग-गंगा को - ऑपरेशन (MGC - ६ देश), इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA -२१ देश), बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य (BBIN – ४ देश) आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद ( BIMSTEC – ७ देश) या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.

अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेश देताना सार्कच्या सदस्यदेशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणाला म्हणायचे, यावरून हा वाद निर्माण झाला होता.

सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय झाला आहे.

४. **ॲपेक ( Asia Pacific Economic Co-Operation - APEC):** आशिया पॅसिफिक आर्थिक सहकार्य या व्यापारी संघटनेची स्थापना १९८९ साली झाली. या व्यापारी संघाचे एकूण २१ सदस्य राष्ट्र आहे युरोपीय संघ व आशियन यासंख्या क्षेत्रीय संघटनांशी तुलना करता सार्कचे कार्य हे निराशाजनक वाटते. असहकार्य हे मागील संशोधकांना प्रत्ययास येते. भावनेचा प्रभाव आहे. व भीती मनात न ठेवता ॲपेक स्थापना १९८९ साली झाली. या संघटनेच्या स्थापनेत आस्ट्रेलियाचे तत्कालीन पंतप्रधान बॉब हॉक यांनी पुढाकार घेतला होता.

**ॲपेक ची उद्दिष्टे:**

**ॲपेकची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.**

१. सभासद राष्ट्रांमध्ये आर्थिक व्यापारी सहकार्य वाढीस लावणे.

२. सदस्य राष्ट्रांमधील व्यापारी अडथळे दूर करणे

३. मुक्त व्यापार व गुंतवणूक क्षेत्राची निर्मिती करणे

४. विविध क्षेत्रातील समान हितसंबंधाच्या बळकटी करिता सामूहिक प्रयत्न करणे

ॲपेक व्यापारी संघाची प्रथम परिषद १९९३ साली अमेरिकेतील सिएटल शहरात पार पडली, १९९६ साली अपेकने मनिला फिलिपाइन्स येथे मनिला ॲक्शन प्लॅन संमत केला. ही व्यापार व गुंतवणूक क्षेत्र निर्माण करण्याकरिता बनवलेली कृती योजना होती. या योजनेप्रमाणे ॲपेक संघटनेतील सदस्य राष्ट्रांकरिता मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याच्या दृष्टीने काही ध्येय निश्चित करण्यात आली. त्याप्रमाणे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रिलया, सारख्या राष्ट्रांनी २०२० पर्यंत तर चीन, मेसिको, चिली सारख्या राष्ट्रांनी २०२० पर्यंत हे ध्येय गाठावे असे निश्चित करण्यात आले. ॲपेक या संघटनेची परिषद दरवर्षी पार पडते. व्यापार संघातील ही एक महत्वाची संघटना होय.

## ३.६ सारांश

समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेत आंतरराष्ट्रीय शासकीय अर्थव्यवस्था या घटकाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. जागतिक राजकारण निर्धारित करणारा हा एक महत्त्वाचा घटक म्हणून सबंध जगाचे लक्ष या घटकाच्या अभ्यासाकडे वळले आहे. दुसऱ्या महायुद्धाने जागतिक राजकारणाचे परिणाम मोठ्या प्रमाणात प्रभावित केले. महासत्तांची फेरमांडणी होऊन विश्वाला एका बाजूने द्विधृविकरणाच्या दिशेने झुकलेली असतानाच संबंध जगावर प्रभाव राखणारा युरोप मात्र अस्तित्वासाठी संघर्ष करू लागला अश्या परिस्थितीत युरोपियन राष्ट्रे साम्यवादी सोविएत रशियाच्या छात्रछायेखाली जाण्याची भीती ओळखून अमेरिकेने पुढाकार घेऊन युरोपियन राष्ट्रांच्या पुनर्बाधणी करीता काही महत्वाकांक्षी योजना हाती

घेतल्या. ब्रेटन वूड्स परिषदेतून त्यास कृतिशीलता मिळाली त्यातूनच जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, गॅट व पुढे त्यातूनच निर्माण झालेली जागतिक व्यापार संघटना यांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान केली. जागतिकीकरणाचा प्रभाव हा जागावरील सर्वकंष स्वरूपाचा प्रभाव बनलेला आहे. जगातील कोणतेही राष्ट्र या प्रक्रियेतून स्वतःला अलिप्त राखू शकलेले नाही. व्यापारी संघ क्षेत्रीय संघाला व व्यापारी करारांनी जागतिकराजकारणात अ-राज्य घटकांचे प्राबल्य वाढवण्यास मदत केली असून जागतिक राजकारणात आपला प्रभाव राखण्याकरिता क्षेत्रीय सहकार्या शिवाय पर्याय नाही हा विचार आज स्वीकाहार्य झालेला दिसतो.

## ३.७ आपण काय शिकलो?

प्र.१ आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थ व्यवस्था या संकल्पनेवर निबंध लिहा.

प्र.२ ब्रेटन वूडस संस्थांचे मूल्यमापन करा.

प्र.३ जागतिक व्यापार संघटनेची भूमिका जागतिकीकारणाच्या प्रक्रियेत गतिमान करण्यास कशी कारणीभूत आहे हे सोदाहरण लिहा.

प्र.४ जागतिक बँकचे कार्य सविस्तर लिहा.

प्र.५ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या भूमिकेत टीकात्मक परिषद करा.

प्र.६ आंतरराष्ट्रीय संघटना व क्षेत्रीय संघ हि संकल्पना स्पष्ट करून महत्वाच्या क्षेत्रीय संघाच्या आढावा घ्या.

**टीप लिहा:**

१. आंतरराष्ट्रीय राजकीय अथवव्यस्था

२. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

३. जागतिक व्यापार संघटना

४. सार्क

५. आसियान

६. युरोपियन महासंघ

७. अपेक

## ३.८ संदर्भ सूची

१. तोडकर बी. डी . ' आंतरराष्ट्रीय संबंध, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१२

२. देवळाणकर शैलेन्द्र आंतरराष्ट्रीय संबंध विद्या बुक्स पुब्लिशर्स, औरंगाबाद जून २०१४.

३. रायपूरकर वसंत आंतरराष्ट्रीय संबंध मंगेश प्रकाशन नागपूर २००१

४. भागवत महेश, समकालीन राजकारणातील महत्वाचे प्रश्न शेठ पब्लिकेशन्स मुंबई - २००९.

५. पेंडसे अरुण 'आंतर राष्ट्रीय संबंध - शीत युधोत्तर जागतिकीकरणाचे राजकारण ओरिएंट लॉगमन प्रायव्हेट लिमिटेड

६. बीजेस जॉन्सन संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना डायमंड पब्लिकेशन पुणे २०११.

❉❉❉❉❉❉❉

# ४

# समकालीन जागतिक समस्या

**घटक रचना:**

४.१ विषय प्रवेश

४अ मानवी सुरक्षा

४ब हवामान बदल (Climate Change)

४क निःशस्त्रीकरण

४.२ संदर्भ

## ४.१ विषय प्रवेश

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या १९४५-१९९० असा ४५ वर्षांचा कालावधी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या इतिहासात शीतयुद्धाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. शीतयुद्धाचे राजकारण हे केवळ युरोप पुरतेच मर्यादित नव्हते, तर या शीतयुद्धकालीन राजकारणांनी आशिया, आफ्रिका खंडांनाही व्यापले होते. शीतयुद्धकालीन विश्वरचना ही ध्रुवीकरणाच्या तत्त्वावर आधारलेली होती. या विश्वरचनेत अमेरिका आणि सोवियत रशिया यांच्यातील दुसऱ्या महायुद्धानंतरचे शह-प्रतिशहाचे राजकारण, वैचारिक पातळीवरील संघर्ष, शस्त्रास्त्र स्पर्धा, परस्परांविषयीची भीती संशय यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोवियत रशिया यांच्यात जरी तीव्र संघर्ष असला तरी या संघर्षाचे रूपांतर प्रत्यक्ष युद्धात कधीच झाले नाही. युद्ध कोणत्याही राष्ट्राचे हित जोपासात नाही उलट विजयी आणि पराभूत राष्ट्राच्या प्रगतीला खिळ बसते हि विचारधारा समोर आली, तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेचे शांतता धोरण, सर्वात महत्वाचे म्हणजे दोन्ही महासत्तांकडे असलेल्या अण्वस्त्र क्षमतेतून विकसित झालेला दहशतीचा समतोल (Balance of Terror). पण भविष्यात हिरोशीमा नागासकी सारखी परिस्थिती ओढवली जाऊ नये म्हणून नि:शस्त्रीकरणाची संकल्पना समोर आली, याच संकल्पनेचे सविस्तर विवेचन एक समकालीन जागतिक समस्या म्हणून सदरील प्रकरणात करण्यात आले आहे.

सन १९९०-९१ यावर्षी सोवियत रशियाच्या विघटनामुळे शीतयुद्धाच्या ४५ वर्षे चाललेल्या राजकारणाचा अंत घडून आला. शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबरच ध्रुवीकरणावर आधारित शीतयुद्धकालीन विश्वरचना संपुष्टात आली आणि त्या जागी एक नवीन विश्वरचना आकाराला येत आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबर अमेरिका आणि रशिया यांच्यातील संघर्ष जरी संपुष्टात आला असला तरी त्यामुळे जागतिक पातळीवर शांतता आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असे नाही. शीतयुद्धाच्या राजकारणापासून आंतरराष्ट्रीय शांततेला जो धोका होता तो जरी शीतयुद्धानंतर दूर झाला असला तरी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेला आव्हान देणारे अनेक प्रश्न आणि समस्या निर्माण झाल्या आहेत. शीतयुद्धोत्तर काळात केवळ लष्करी कारणामुळेच नाही तर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत उत्पन्न झालेल्या अनेक

बिगरलष्करी प्रश्नांमुळेदेखील जागतिक शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यामध्ये मानवी सुरक्षा हि देखील एक जागतिक समस्या बनली आहे, केवळ युद्धापासून सुरक्षा महत्वाची नाही तर मानवी जीवन सुखकरमय पद्धतीने जगता आले पाहिजे यासाठी देखील मानवी सुरक्षा या विषयावर देखील सदरील प्रकारणात जागतिक परिपेक्षाच्या अनुषंगाने प्रकाश टाकण्यात आलेला आहे

विद्यमान जागतिक समस्येतील सर्वात महत्वाची समस्या म्हणजे ""हवामान बदल"" (Climate Change ) होय हि समस्या अन्य समस्यापेक्षा वेगळी आहे, हवामान बदल हि जागतिक समस्या मानवाच्या युद्धखोर प्रवृत्तीतुन निर्माण झाली नसून ती मानवाच्या अतिविलासी जीवन जगण्याच्या मानसिकतेतुन निर्माण झाली आहे, प्रगतीसाठी निसर्गाचा समतोल बिघडवून राष्ट्रा-राष्ट्रात स्पर्धा सुरु आहे पण या अनैसर्गिक प्रगतीमुळे हवामानात बदल होतो आहे त्याचे दुष्परिणाम केवळ प्रगत राष्ट्रालाच नाही तर जगातील सर्व राष्ट्राना भोगावे लागत आहेत, यामुळे संपूर्ण मानवजात आणि सर्व विकसित-अविकसित राष्ट्रे असुरक्षिततेच्या चिंतेत आहेत, सदरील प्रकरणात हवामान बदल एक जागतिक समस्या कशाप्रकारे आहे याची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे

# ४अ मानवी सुरक्षा

४अ.१ उद्दिष्टे

४अ.२ प्रस्तावना

४अ.३ मानवी सुरक्षेच्या विचाराचा इतिहास

४अ.४ मानवी सुरक्षिततेच्या संकल्पनेची उत्क्रांती

४अ.५ मानवी सुरक्षिततेची आधुनिक संकल्पना

४अ.६ मानवी सुरक्षेच्या व्याख्या

४अ.७ मानवी सुरक्षा आणि पारंपारिक सुरक्षा

४अ.८ आण्विक सुरक्षेपासून मानवी सुरक्षिततेकडे संक्रमण

४अ.९ मानवी सुरक्षिततेची व्याप्ती आणि महत्त्व

४अ.१० मानवी सुरक्षा संकल्पनेची टीका

४अ.११ मानवी सुरक्षेचे महत्वपूर्ण तथ्य

४अ.१२ सारांश

४अ.१३ निष्कर्ष

४अ.१४ आपली प्रगती तपासा

## ४अ.१ उद्दिष्टे

१. बदलत्या जागतिक राजकारणात मानवी सुरक्षेच्या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास करणे

२. मानवी सुरक्षेचे महत्व समजून घेऊन उपाययोजनेबाबत जागरूकता वाढवणे.

३. मानवी सुरक्षा संकल्पनेबाबतच्या इतिहासाचा आढावा घेणे

४. मानवी सुरक्षा एक जागतिक समस्या त्याबद्दल जाणून घेणे.

५. मानवी सुरक्षेचा इतिहास आणि संकल्पनेची उत्क्रांती समजून घेता येईल

६. मानवी सुरक्षेचा अर्थ आणि व्याख्या याबाबत सखोल विचारमंथन होईल.

७. मानवी सुरक्षा संकल्पना लागू करण्याच्या व्याप्तीचे परीक्षण करा.

८. समाजातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी संकल्पनेचे महत्त्व ओळखणे.

## ४अ.२ प्रस्तावना

मानवी सुरक्षा म्हणजे एखाद्या व्यक्तीची किंवा व्यक्तींच्या गटाची सुरक्षा. माणसाला जगण्यासाठी, काम करण्यासाठी आणि स्वतःला विकसित करण्यासाठी सुरक्षिततेची गरज असते. व्यक्ती आणि समुदाय यांच्यातील शक्ती आणि संबंध या संकल्पनेतून सुरक्षिततेची

संकल्पना विकसित झाली. इतरांच्या शारीरिक हल्ल्यांपासून समुदायासाठी सुरक्षितता निर्माण करणे ही कल्पना होती. राष्ट्र राज्याची उत्क्रांती विशिष्ट प्रदेशांशी संबंधित राज्य सुरक्षेच्या संकल्पनांच्या विकासाशी जुळली. एखाद्या व्यक्तीच्या सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी आणि त्याला याचिका करण्याचा आणि व्यक्तीचा अधिकार प्रदान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या हेबियस कॉर्पस (१६७९) आणि बिल ऑफ राइट्स (१६८९) पासून सर्वसाधारणपणे व्यक्तींना सुरक्षित करण्याची कल्पना बऱ्याच काळापासून अस्तित्वात आहे. राज्याच्या सुरक्षेच्या संकल्पनेत व्यक्तीच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. सुरक्षा संकल्पनेचा भाग म्हणून व्यक्तींना अधिक स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि अधिकार बहाल करण्याच्या प्रक्रियेत गेल्या काही दशकांतच बदल झाले आहेत.

शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबर अमेरिका आणि सोवियत रशिया यांच्यात ४५ वर्षे चाललेला संघर्ष जरी संपुष्टात आला असला तरी हिंसाचार आणि हिंसाचाराच्या माध्यमातून होणारी जीवितहानी आणि अस्थिरता कमी झालेली नाही. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता धोक्यात आणणारे अनेक नवीन घटक पुढे आले. शीतयुद्धोत्तर काळामध्ये मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवी सुरक्षा म्हणजे सर्व प्रकाराचा हिंसाचार, भीती आणि असुरक्षितेतपासून व्यक्तीची मुक्तता. शीतयुद्धकालीन तणाव, परस्पर अविश्वास, संशय आणि भीतीचे वातावरण यामुळे मानवी असुरक्षितेत वाढ होत गेली. शीतयुद्धोत्तर काळातही या परिस्थितीमध्ये फारसा बदल झाला नाही. शीतयुद्धोत्तर काळामध्ये विविध प्रकारच्या संघर्षामुळे मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सन १९९० च्या दशकामध्ये शंभरहून अधिक राष्ट्रा-राष्ट्रात लहान-मोठे सशस्त्र संघर्ष झाले. राजकीय कारणांमुळे अंतर्गत यादवी युद्धे, वांशिक संघर्षातून वाढणारा हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादी चळवळीचा उदय आणि प्रसार, आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांच्या थरकाप उडवणाऱ्या कारवाया, अण्वस्त्राचा प्रसार, अमली पदार्थाचा व्यापार इ. कारणामुळे मानवी असुरक्षितता वाढली आहे

## ४अ.३ मानवी सुरक्षेच्या विचाराचा इतिहास

हवा प्रदूषणात स्वयंचलित वाहनांमधून बाहेर टाकल्या जाणाऱ्या प्रदूषकांचा मोठा वाटा असतो. सुखसोयींचा, जलद प्रवास, माल वाहतूक यांसाठी तसेच रस्ते बांधणी धरणे, खाणी यांसाठी विविध प्रकारच्या स्वयंचलित वाहनांचा उपयोग होत असतो. अगदी मोपेडपासून अजस्त्र, अवजड डोंगर पोखरणाऱ्या एक्सेव्हेटर, बुलडोझर, ट्रॅक्टरसारख्या स्वयंचलित वाहनांमुळे मानवी कामे लौकर उरकली जात असली तरी त्यांच्यामुळे प्रदूषणाच्या अनेक गंभीर समस्या उत्पन्न झाल्या आहेत. रस्त्यावरून धावणारी अनेक त-हेची ही वाहने, चालविणाऱ्यांबरोबरच, बाकीच्यांना देखील विषारी धुरांनी हानी पोहचवत आहेत.

शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की मानवाच्या क्रियाकलापांमुळे हवामान बदलास हातभार लागतो कारण आपण आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी जीवाश्म इंधनांवर अवलंबून असतो (Riebeek). Wuebbles म्हणाले, "आम्ही जीवाश्म इंधन जाळत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर हवामान बदल घडतात आणि त्यामुळे वातावरणातील $CO_2$ , मिथेन आणि इतर काही वायूंचे प्रमाण वाढते" (फोन इंटरव्ह्यू). ऑस्ट्रेलियन ग्रीनहाऊस ऑफिसच्या मते, जग त्याच्या ८०% ऊर्जेच्या गरजांसाठी तेल, कोळसा आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर अवलंबून आहे. त्यामुळे, जीवाश्म इंधनापासून इतर कोणत्याही उर्जेवर स्विच करणे खूप कठीण होते कारण आपण मोठ्या प्रमाणात जीवाश्म इंधनांवर अवलंबून असतो. औद्योगिक क्रांतीपासून हरितगृह वायूंचे उत्सर्जन नाटकीयरित्या वाढले आहे, मुख्यतः ऊर्जा, शेती, औद्योगिक प्रक्रिया आणि वाहतूक (हवामान बदलाचे पर्यावरणीय प्रभाव) यासाठी जीवाश्म इंधनाच्या जाळण्यामुळे. पुढील आलेख दाखवतो की गेल्या २५० वर्षांत CO, आणि मिथेन किती वाढले.




**स्रोत:** (रॉबर्ट सिमॉन यांनी तयार केलेला "हवामान बदल" आलेख.)

बर्फाचा नमुना घेऊन आलेख तयार करण्यात आला आणि दुसरा नमुना वातावरणातून घेण्यात आला. बर्फाच्या नमुन्यासाठी, बर्फाच्या शीटमधून छिद्र पाडून आणि नमुन्यातील हवेच्या रेणूंकडे पाहून CO२ आणि मिथेन (चेझिंग बर्फ) चे प्रमाण निश्चित केले. १७५०-२००९ पासून कार्बन डाय ऑक्साईडची पातळी जवळपास ३८ टक्के वाढली आहे आणि मिथेनची पातळी १४८ टक्के वाढली आहे.

## ४ब.६ हवामान बदलाचे दुष्परिणाम?

हवामान बदलाचा लोकांवर आणि नैसर्गिक जगावर गंभीर परिणाम होतो. हवामान बदलाचे जे परिणाम आपण आधीच पाहत आहोत त्यात हे समाविष्ट आहे:

१. **तीव्र उष्णतेमध्ये बदल:** उच्च सरासरी तापमानाचा अर्थ उष्णतेच्या लाटा आता अधिक वारंवार होत आहेत - आणि जेव्हा ते उद्भवतात तेव्हा ते अधिक गरम होते. आता आपण पाहत असलेल्या काही अति उष्णतेच्या लाटा या ग्रहाच्या अलीकडील

तापमानवाढीशिवाय अत्यंत संभव नसत्या. वाढलेल्या तापमानामुळे ऑस्ट्रेलियात अलीकडेच होत असलेल्या जंगलातील आगीसारख्या घटना अधिक संभाव्य आणि अधिक तीव्र होतात. जगाच्या काही भागांमध्ये, जसे की भूमध्यसागरीय आणि मध्य आणि पश्चिम आफ्रिकेत, हवामान बदलामुळे अधिक वारंवार आणि अधिक तीव्र दुष्काळ दिसत आहेत.

२. **पावसाचे प्रमाण वाढले:** उबदार हवेत जास्त पाणी असते, ज्यामुळे तापमान वाढल्यामुळे मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असते. या वाढलेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती वाढू शकते, मालमत्तेचे नुकसान होऊ शकते आणि जीव धोक्यात येऊ शकतो. यूकेमध्ये, असे पुरावे आहेत की काही विशिष्ट हवामान घटना, जसे की २०१४/१५ च्या हिवाळ्यात अतिवृष्टी, हवामान बदलामुळे अधिक शक्यता निर्माण झाली आहे. [१] असेच परिणाम जगात इतरत्रही होत आहेत. २०१७ मध्ये हरिकेन हार्वे दरम्यान ह्यूस्टनवर पडलेल्या विक्रमी पावसामुळे ते १९०० पासून यूएसएला धडकणारे दुसरे सर्वात महाग चक्रीवादळ बनले. हवामान बदलामुळे अशाप्रकारे हानीकारक पावसाची शक्यता तिप्पट झाली आहे.

३. **अन्न आणि गोड्या पाण्याच्या उपलब्धतेत बदल:** बदलत्या हवामानाचा पीक उत्पादनावर परिणाम झाला आहे - गहू आणि मका यासारख्या पिकांचे प्रमाण जे जमिनीच्या क्षेत्रातून उत्पादित केले जाऊ शकते. जगाच्या काही भागात हवामान बदलामुळे उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे, परंतु हवामान बदलाच्या परिणामांशिवाय एकूणच उत्पन्न तितक्या वेगाने वाढले नाही.

काही ठिकाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी गोड्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम झाला आहे, विशेषत: युरोपियन आल्प्स सारख्या भागात वितळणाऱ्या हिमनद्यांमधून खाली येणाऱ्या प्रवाहावर. जागतिक लोकसंख्येच्या जवळजवळ एक तृतीयांश लोकांसाठी ग्लेशियर्स पिण्याच्या पाण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहेत.

### समुद्राची वाढती पातळी

हवेच्या उच्च तापमानामुळे अंटार्क्टिका आणि ग्रीनलँडमधील जमिनीवरील प्रचंड "बर्फाच्या चादरी' वितळण्यास कारणीभूत ठरत आहे, जे महासागरात वाहून जाते. तापमानवाढ ग्रहामुळे समुद्राच्या पाण्याचा विस्तार देखील होत आहे, त्याचे प्रमाण वाढत आहे- आतल्या द्रवाप्रमाणेच थर्मामीटर गरम झाल्यावर त्याचा विस्तार होतो.

या दोन्ही घटकांमुळे जागतिक समुद्र पातळीत वाढ होत आहे. २० व्या शतकाच्या सुरूवातीपासून जागतिक समुद्राची पातळी सुमारे २० सेमीने वाढली आहे. यामुळे वादळाची लाट निर्माण झाली आहे-तीव्र वादळांच्या वेळी समुद्राच्या पातळीत होणारी वाढ-अस्तित्वात असलेल्या सागरी संरक्षणापेक्षा जास्त आणि पूर येण्याची शक्यता जास्त आहे. जगभरातील अनेक दाट शहरे सखल किनाऱ्याच्या प्रदेशात असल्याने, हा धोका मोठ्या प्रमाणात लोकांना प्रभावित करू शकतो. बांग्लादेश सारख्या विकसनशील देशांमध्ये हे विशेषतः खरे आहे, परंतु व्हेनिस आणि मियामी सारखी शहरे देखील कमी आहेत आणि त्यांचाही परिणाम होईल. यूकेमध्ये, समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे वेल्श किनाऱ्यावरील फेअरबर्न गावासारख्या किनारपट्टीचे क्षेत्र सोडून देण्याच्या अलीकडील निर्णयांना हातभार लागला आहे.

**जैवविविधता आणि निसर्गाची हानी**

महासागरात, पाण्याचे तापमान वाढल्याने सागरी जीवनावर दबाव पडत आहे. ग्रेट बॅरियर रीफ, जेथे कोरल लोकसंख्या उथळ पाण्यात आहे, अलीकडे ५०% पर्यंत कमी झाली आहे. २०१६ मध्ये महासागरातील उष्णतेमुळे ग्रेट बॅरियर रीफचे मोठे नुकसान झाले होते, जे सुमारे २०० वर्षांपूर्वी औद्योगिक क्रांतीच्या काळापूर्वी फारच अशक्य होते, परंतु आता आजच्या हवामानात सरासरी दर ३ वर्षांत १ च्या आसपास होण्याची शक्यता आहे. किमान गेल्या ६५ दशलक्ष वर्षांत सध्याची महासागर परिस्थिती अस्तित्वात नाही. तापमानवाढीमुळे वनस्पती आणि प्राण्यांच्या अनेक प्रजाती नवीन भागात स्थलांतरित झाल्यामुळे हवामान बदलाचा जमिनीवरील निसर्गावर परिणाम होत असल्याचा पुरावा देखील आहे.

**हवामान बदलाच्या भविष्यातील परिणामांचे काय?**

आपण आधीच उत्सर्जित केलेला बराचसा कार्बन डाय ऑक्साईड शतकानुशतके वातावरणात राहील-काही हजारो वर्षांपर्यंत. जसजसे आपण त्यात भर घालत राहू, तसतसे कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत जाईल आणि ग्रह आणखी गरम होईल.

जसजसे जग गरम होत आहे तसतसे हवामान बदलाचे परिणाम अधिक मजबूत आणि स्पष्ट होत आहेत: अधिक वारंवार उष्णतेच्या लाटा, आज आधीच कोरड्या असलेल्या प्रदेशांमध्ये पाण्याची घटती उपलब्धता, आज जगभरातील प्राणी आणि वनस्पतींच्या विविधतेसाठी महत्त्वपूर्ण जोखीम.

या प्रभावांचे परिणाम, आणि त्यांच्यापासून वाचण्यासाठी जगभरातील लोकांचे जास्त स्थलांतर होण्याची शक्यता,

(१) हवामान बदल हवामान बदलाचे प्रमुख कारण हरितगृह वायूंचे उत्सर्जन हे आहे. यामुळे दुष्काळ, वणवे, उष्णतेच्या लाटा आणि पूर यांसारख्या तीव्र वातावरणीय समस्या उद्भवतील.

(२) प्रदूषण : हवेचे प्रदूषण आणि हवामान बदल यांच्यात निकटचा संबंध आहे. हरितगृह वायूंमुळे पृथ्वीची उष्णता तर वाढतेच; त्याशिवाय महानगरांमध्ये दाट धुक्यासारखे प्रक्षण वाढून लोकांच्या आरोग्यास हानी पोहोचते.

(३) जंगलतोडीतून उद्भवणाऱ्या समस्या जंगले कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, जो एरवी पर्यावरणात मिसळून जागतिक तापमानवाढीत भर घालतो. जंगलतोड झाल्यामुळे जंगलांवर अवलंबून असणारे प्राणी आणि मानवाच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

(४) पाण्याची कमतरता लोकसंख्यावाढ आणि हवामान बदलामुळे निर्माण होणारी दुष्काळी परिस्थिती यांमुळे पाण्याची कमतरता हा आज मोठा प्रश्न उभा राहिला आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळवणे ही लोकांसमोरील मोठी समस्या आहे.

(५) जैवविविधतेचा ऱ्हास हवामान बदल हेही जैवविविधतेच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे. जैवविविधतेच्या ऱ्हासामुळे अन्नसुरक्षेचा आणि लोकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहतो

**जगभरात हवामान बदलाचे काय परिणाम होतील?**

प्रचंड पावसाच्या परिस्थितीमुळे इंग्लंडमध्ये पूरपरिस्थिती आवाक्याबाहेर जाईल.

पॅसिफिक क्षेत्रातील सखल भागात असलेले बेटांवरील काही देश पाण्याखाली किंवा समुद्राखाली जाऊ शकतात.

आफ्रिकेतील बहुतांश देशांमध्ये दुष्काळ आणि अन्नाच्या तुटवड्याची समस्या निर्माण होऊ शकते.

उत्तर अमेरिकेतही दुष्काळाची गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते. तशीच स्थिती पश्चिम अमेरिकेतही असेल. तर इतर भागांत पावसाचं प्रमाण वाढेल आणि वादळांचं प्रमाण वाढेल.

ऑस्ट्रेलियात तीव्र दुष्काळ आणि प्रचंड उष्णता अशा समस्या उद्भवतील

## ४ब.७ हवामान बदलाबाबत उपाययोजना व जागतिक पातळीवरील प्रयत्न

हवामान बदलाचं आव्हान सगळ्यांनी एकत्र येऊन हाताळता येईल, यावर जगभरातल्या देशांचं एकमत झालेलं आहे. पॅरिसमध्ये २०१५ झालेल्या महत्त्वाच्या कराराद्वारे ग्लोबल वॉर्मिंग १.५ सेल्शियससपर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट ठरवण्यात आलं.

नोव्हेंबर २०२१ मध्ये युकेमध्ये जगभरातल्या देशाच्यां नेत्यांची ग्लासगो क्लायमेट कॉन्फरन्स होत असून यामध्ये जगभरातले देश २०३० पर्यंत कार्बन उत्सर्जन कमी कसं करायचं यासाठीची आखणी करतील.

या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे २०५० पर्यंत हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाचं प्रमाण कमी करून ते शून्यावर आणण्याचं विविध देशांना लक्ष्य ठेवलं आहे.

म्हणजे कोणत्याही प्रकारच्या वायू उत्सर्जनाच्या प्रमाणात ते वायू शोषले जातील असं समतोल राखला जाईल, अशा उपाययोजना केल्या जातील. उदाहरण द्यायचं झाल्यास, झाडं लावून हे प्रमाण कमी केलं जाईल. या माध्यमातून तापमानात झपाट्यानं होणारी वाढ थांबवून, हवामान बदलाचे गंभीर दुष्परिणाम टाळता येऊ शकतील.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था किंवा सायकलचा वापर वाढवून वाहनांचा वापर कमी करावा.

घरं इन्सुलेट (उष्णतेपासून बचावासाठी विशिष्ट गोष्टीचा थर देणे) करा

विमानांचा वापर कमीत कमी करा,

मांस आणि दुग्धजन्य पदार्थांचं सेवन कमी करा. पशुसंवर्धन काळाची गरज आहे.

औद्योगिकीकरणाचे विकेंद्रिकरण करणे आवश्यक आहे, एकाच ठिकाणी कारखाने निर्माण करू नये

औद्योगिक क्षेत्रात हरितपट्टा निर्माण करणे यामुळे हवा प्रदूषित होणार नाही.

पाण्याचा बेसुमार वापर टाळावा तसेच पाणी दूषित होईल असे कोणतेही कृत्य करू नये

युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंजची २७ वी बैठक इजिप्तमधील शर्म-अल शेख येथे ही बैठक झाली.

वास्तविक ही बैठक २०२१ मध्ये होणार होती मात्र कोरोना साथीमुळे ती आता २०२२ मध्ये होत आहे.

**'नेट-शून्य' म्हणजे काय? (हवामान बदल उपाययोजना**)

जेव्हा आपण 'नेट-शून्य' कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनावर पोहोचतो तेव्हाच ग्रह तापमानवाढ थांबवेल. निव्वळ-शून्य साध्य करणे म्हणजे जागतिक हरितगृह वायूचे उत्सर्जन आजच्या पेक्षा खूपच कमी पातळीपर्यंत कमी करणे - आणि उर्वरित उत्सर्जनाचे समान प्रमाण वातावरणातून पुन्हा शोषून घेऊन संतुलित करणे. हरितगृह वायू वाढत्या झाडे आणि वनस्पतींद्वारे तसेच तांत्रिक प्रक्रियेद्वारे शोषले जाऊ शकतात जे हवेतून कार्बन डायऑक्साइड काढून टाकू शकतात, परंतु अद्याप मोठ्या प्रमाणावर वापरले गेले नाहीत.

जागतिक हरितगृह वायूंचे उत्सर्जन वेगाने कमी करणे आणि निव्वळ शून्यावर जाण्याच्या मार्गावर शक्य तितके कमी उत्सर्जन करणे देखील हवामानातील पुढील बदल कमी करण्यास मदत करेल. क्लायमेट असेंब्ली यूके काय विचार करणार आहे?

हवामान बदलाच्या जोखमीच्या प्रमाणात जागतिक हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय करार झाला आहे. याला पॅरिस करार म्हणतात. सुमारे २०० वर्षांपूर्वी, औद्योगिक क्रांतीपूर्वी ग्लोबल वार्मिंग तापमानापेक्षा २ डिग्री सेल्सिअसच्या खाली ठेवणे आणि ते १.५ डिग्री सेल्सिअसच्या खाली ठेवण्यासाठी प्रयत्न करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. सध्या जगातील प्रत्येक देशाने पॅरिस करारावर स्वाक्षरी केली आहे. तथापि, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्देशानुसार, युनायटेड स्टेट्सने या वर्षाच्या शेवटी पॅरिस करारातून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहेत. या जागतिक प्रयत्नात आमच्या योगदानाचा एक भाग म्हणून यूकेसह जगभरातील अनेक देशांनी निव्वळ शून्य हरितगृह वायू उत्सर्जनाच्या राष्ट्रीय उद्दिष्टासाठी साइन अप केले आहे. जून २०१९ मध्ये, यूके सरकार आणि संसदेने यूकेला २०५० पर्यंत निव्वळ-शून्य हरितगृह वायू उत्सर्जनापर्यंत पोहोचण्यासाठी वचनबद्ध कायद्यावर सहमती दर्शवली. यूकेच्या हवामान संमेलनात तुम्ही ज्या विषयावर चर्चा करणार आहात तो हा आहे की हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी यूकेने काय केले पाहिजे आणि कसे ते केले पाहिजे.

## ४ब.८ हवामान बदलाचा सामना करण्यासाठी भारताचे प्रयत्न

भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि पाचव्या क्रमांकाचा हरितगृह वायू (GHG) उत्सर्जन करणारा देश आहे, जो जागतिक उत्सर्जनाच्या सुमारे ५% आहे. भारताचे उत्सर्जन १९९० ते २००५ दरम्यान ६५% वाढले आणि २०२० पर्यंत आणखी ७०% वाढण्याचा अंदाज आहे.

इतर उपायांनुसार, इतर प्रमुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारताचे उत्सर्जन कमी आहे. १८५० पासून एकत्रित ऊर्जा-संबंधित उत्सर्जनात भारताचा वाटा फक्त २% आहे. दरडोई

आधारावर, भारताचे उत्सर्जन जागतिक सरासरीपेक्षा ७०% कमी आणि युनायटेड स्टेट्सच्या उत्सर्जनापेक्षा ९३% कमी आहे. हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी भारतही आघाडीवर आहे. बदलणारे पावसाचे स्वरूप, वारंवार येणारे पूर, तीव्र चक्रीवादळे आणि दुष्काळ किंवा मातीची धूप यामुळे दारिद्र्य निर्मूलनाचे आव्हान वाढले आहे आणि मानवी जीवनाची हानी रोखण्यासाठी दुर्मिळ राष्ट्रीय संसाधनांचे वाटप करणे आवश्यक आहे. संसाधनांची कमतरता असूनही, भारत आपल्या आर्थिक वाढीच्या ऊर्जेची तीव्रता पूर्णपणे कमी करणे, सर्व क्षेत्रांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे आणि नूतनीकरणक्षमतेचा अधिकाधिक वापर यासह अनुकूलन आणि कमी करण्याच्या कृती करण्यासाठी महत्त्वाकांक्षी कृती करत आहे.

भारताने कोळशावरील स्वच्छ ऊर्जा उपकर दुप्पट केला आहे, जो फारच कमी देशांकडे आहे आणि स्वच्छ ऊर्जा निधीकडे आधीपासूनच ३ अब्ज अमेरिकन डॉलर्स स्वच्छ तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी वापरण्यात आले आहेत. भारताच्या राष्ट्रीय सौर मोहिमेची क्षमता २०,००० मेगावॅटवरून १००,००० मेगावॅटपर्यंत पाच पटीने वाढवली जात आहे. याचा अर्थ १०० अब्ज डॉलर्सची अतिरिक्त गुंतवणूक आणि दरवर्षी सुमारे १६५ दशलक्ष टन CO२ उत्सर्जनाची बचत होईल.

भारताने 'राष्ट्रीय अनुकूलन निधी', अल्ट्रा मेगा सोलर प्रोजेक्ट्सची स्थापना, अल्ट्रा-मॉडर्न सुपर क्रिटिकल कोळसा आधारित थर्मल पॉवर तंत्रज्ञान आणि कालव्यांवर सौर उद्यानांच्या विकासासाठी सुमारे २०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची तरतूद केली आहे. आणखी एक उपक्रम म्हणजे "१०० स्मार्ट शहरे" ही एकात्मिक धोरणे असलेली अनुकूलन आणि कमी करण्यासाठी शहरी भागांची हवामान बदलाची असुरक्षा आणि संपर्क कमी करण्यासाठी आणि त्यांची ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी ज्यासाठी १.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सची तरतूद करण्यात आली आहे. भारताने सिमेंट उद्योगासाठी कठोर नियम लागू केले आहेत. जगातील सर्वात लांब नद्यांपैकी एक असलेल्या गंगा नदीच्या स्वच्छतेसाठीचा आमचा कृती आराखडा प्रदूषण कमी आणि हवामान अनुकूलतेचे अनेक फायदे देईल. आम्ही किनारपट्टी, हिमालयीन आणि वनक्षेत्राच्या संरक्षणासाठीही पुढाकार घेतला आहे. भारताने राष्ट्रीय वायु गुणवत्ता निर्देशांक विकसित करण्याची तयारी सुरू केली आहे आणि राष्ट्रीय वायु गुणवत्ता योजना सुरू केली आहे.

नवीकरणीय ऊर्जेला चालना देण्यासाठी तामिळनाडू, राजस्थान, गुजरात, आंध्र प्रदेश आणि लडाखमध्ये अल्ट्रा मेगा सौर प्रकल्पांची स्थापना केली.

## ४ब.९ सारांश

हवामान बदलामुळे जागतिक राजकारण हे एका वेगळ्या टप्प्यावर येऊन पोहचले आहे. हवामान बदल आणि त्यामुळे निर्माण झालेले संकट केवळ विकसित राष्ट्रापुरते मर्यादित नसून जगातील सर्व राष्ट्राना त्याची झळ पोहचत आहे.मुख्यतः साम्राज्यवादी विकसित राष्ट्रांनी वसाहतीच्या शोषणातून पर्यावरण प्रदूषणाला चालना दिली. वैज्ञानिक शोधामुळे गॅस, वीज, कारखाने, अण्वस्त्रे, जैविक व रासायनिक अस्त्रे, वाहतूकसाधनांची प्रचंड वाढ, ग्रीन गैस उत्सर्जन आदीचा परिणाम पर्यावरणाच्या प्रदूषणात झालेला आहे. आजही ही स्पर्धा चालूच असल्यामुळे ही समस्या उग्र रूप धारण करत आहे

विकसनशील राष्ट्र लोकसंख्या नियंत्रणाबाबत फारशी कठोर व निर्णयात्मक भूमिका घेताना दिसत नाहीत. उदा. भारतात धर्माच्या व राजकारणाच्या नावे लोकसंख्या वाढीवर नियंत्रणात्मक कायद्यांची निर्मिती व कठोर अंमलबजावणी होताना दिसत नाही; म्हणून भारत हा जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश होऊ पाहत आहे. विकासासाठी औद्योगिकीकरणाचा पाया जो साम्राजवादी राष्ट्रांनी वसाहतींमध्ये घातला त्यात वाढच होत गेली; परंतु पर्यावरणीय दृष्टीने तो विकास होत आहे काय? किंवा सुरक्षित विकास होत आहे काय? याकडे प्रामुख्याने दुर्लक्ष झाले. उदा. भारतातच सरकारने उद्योगधंद्यांसाठी केलेल्या पर्यावरणविषयक कायद्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. वाहनांद्वारे होणाऱ्या प्रदूषणावरदेखील नियंत्रण करायला सरकार इच्छुक नाही; म्हणूनच न्यायालयांना न्यायिक सक्रियतेद्वारे (Judicial Initiative) दिल्लीमध्ये डिझेल ऐवजी सीएनजीवर वाहने चालविण्याचा आदेश देणे, तसेंच भारतातील अन्य मोठया शहरात देखील सिएनजी, इलेक्ट्रिक सार्वजनिक वाहने वाढवून प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न होतो आहे पण याचा वेग वाढवणे आवश्यक आहे. ताजमहालाच्या आसपासच्या कारखान्यांना स्थानांतरित करणे व अन्य अनेक पर्यावरणविषयक महत्त्वपूर्ण निर्णय देऊन पुढाकार घ्यावा लागला. ही प्रशंसनीय गोष्ट असली तरी हे कार्य सरकारद्वारे होणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणीय संरक्षणाचा विचार केल्यास, प्रत्येक राष्ट्राला आपले राष्ट्रीय हित हे जागतिक अखिल मानवजातीच्या हितापेक्षा श्रेष्ठ वाटते. संकुचित स्वार्थापोटी औद्योगिकीकरणासाठी पर्यावरणाचा बळी हा त्यांना स्वस्त पर्याय वाटतो. म्हणून पर्यावरणाकरिता होणाऱ्या कार्यात अनेक अडचणी येतात. असे असले तरी आज पर्यावरणीय प्रदूषणाचे परिणाम जाणवायला लागले आहेत. या परिणामांचा भविष्यकालीन विस्तारित आढावा घेतल्यास अतिशय गंभीर चित्र डोळ्यासमोर उभे राहते. याच पद्धतीने व वेगाने पर्यावरणाचा हास होत राहिल्यास

हि सृष्टी मानवास जगण्यास योग्य राहणार नाही व यास मानव स्वतः जबाबदार असेल.

ही जाणीव ठेवून आज शासकीय, गैरशासकीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य घडवून प्रयत्न होताना दिसतात, ही खरोखरच अतिशय समाधान देणारी बाब आहे

## ४ब.१० खालील प्रश्नाआधारे आपली प्रगती तपासा

१ हवामान बदल हि एक जागतिक समस्या आहे यावर भाष्य करा?

२ हवामान बदलाचा अर्थ स्पष्ट करून हवामान बदलास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांची चर्चा करा?

३ हवामान बदलामुळे होणारे दुष्परिणाम विषद करा?

४ हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी जागतिक पातळीवर कोणकोणत्या उपाययोजना राबविल्या जातात याचा आढावा घ्या.

५ ग्लोबल वॉर्मिंग वर थोडक्यात माहिती लिहा.

# ४क निःशस्त्रीकरण

४क.१ उद्दिष्टे

४क.२ प्रास्ताविक

४क.३ निःशस्त्रीकरणाचा इतिहास

४क.४ निःशस्त्रीकरण अर्थ व्याख्या

४क.५ निःशस्त्रीकरण प्रकार व करार

४क.६ निःशस्त्रीकरणाचे फायदे आवश्यकता

४क.७ निःशस्त्रीकरणाच्या मर्यादा अडथळे

४क.८ निःशस्त्रीकरणाबाबत भारताचे धोरण

४क.९ सारांश

४क.१० प्रश्न

## ४क.१ उद्दिष्टे

१. निःशस्त्रीकरणाचा ऐतहासिक घटनाक्रम जाणून घेणे.

२. निःशस्त्रीकरण संकल्पना हि व्यक्ती, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय जगतासाठी किती महत्वपूर्ण आहे, याबाबत जाणीव निर्माण करणे

३. निःशस्त्रीकरणाचे महत्व, आवश्यकता आणि निःशस्त्रीकरण करण्यातील अडचणीबाबत जागरूकता वृद्धिंगत करणे.

## ४क.२ प्रास्ताविक

दोन महायुद्धांच्या भयानक आणि विनाशकारी परिणामातून मानवाची स्वार्थी वृत्ती, त्याचा रानटीपणा स्पष्ट झाला. हिटलर, मुसेलिनीच्या कर अत्याचाराबरोबरच दोस्त राष्टांनी केलेल्या अण्वस्त्रांच्या वापरामुळे मानवचं मानवाचा शत्रु बनला. अण्वस्त्रातून मानवाच्या आणि संपणे जगाच्यार अस्तित्वाला मोठे आव्हान निर्माण झाले. त्यातूनच निःशस्त्रीकरण आणि शख नियंत्रणाची गरज निर्माण झाली. युद्धामुळे जगातील सर्वच लोकांची मने अनिश्चित, अस्रक्षित व अस्वस्थ झाली. म्हणूनच युद्ध टाळण्यासाठी एक प्रभावी उपाय म्हणून निःशस्त्रीकरण व शस्त्र नियंत्रणाचा विचार होऊ लागला

आजच्या काळात बहुराष्ट्रराज्याची व्यवस्था स्थिर झाली आहे. प्रत्येक लागला. राष्ट्राच्या अस्तित्वाला मान्यता मिळाली आहे. प्रत्येक राष्ट्र आत्मसंरक्षणासाठी स्वतःच्या सामर्थ्यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रराज्याचे संरक्षण करू शकणारी सक्षम अशी व्यवस्था, यंत्रणा व संघटना आजही नाही. सर्व राष्ट्रराज्याच्या संरक्षणाची जबाबदारी संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) संघटनेवर सोपविण्यात

आली आहे; परंतु त्यासंबंधीचे सर्व वास्तविक अधिकार या संघटनेकडे सोपविण्यात आले नाहीत. त्यामुळे राष्ट्र स्वसंरक्षणासाठी शक्ती स्पर्धेमध्ये उतरली आहेत. शस्त्रास्त्रांचे उत्पादन, त्यातील स्पर्धा, शस्त्रास्त्रांचा साठा आणि त्याचा वापर इत्यादींमुळे युद्धाला पोषक अशी परिस्थिती निर्माण होत आहे. विसावे शतक अणुयुग समजले जाते. अणुबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब अशी अतिसंहारक शस्त्रे तयार करण्याची स्पर्धा जगातील राष्ट्रांमध्ये सुरू आहे. गेल्या काही वर्षांपासून तारका युद्धाचं (Star War) भीती निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सत्ता समतोल राखण्यासाठी युद्ध हे साधन मानले जाते. तिसरे महायुद्ध झाल्यास ते आण्विक युद्धच होईल व त्यातून सर्व जग बेचिराख होईल. युद्ध टाळणेच आवश्यक आहे. त्यासाठीच निःशस्त्रीकरण आणि शस्त्र नियंत्रणाची कल्पना पुढे आली

शीतयुद्धाच्या काळात एकीकडे महासत्तांमधील शस्त्रास्त्र स्पर्धा, संरक्षण खर्च, अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रांची संख्या वाढत होती, तर दुसरीकडे निःशस्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र स्पर्धे वरील नियंत्रणाची जाणीव मूळ धरत होती. निःशस्त्रीकरणाच्या जाणीवेला वैश्विक रूप देण्याच श्रेय जाते संयुक्त राष्ट्र संघटनेला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने सन १९६५ साली संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा ठराव बहुमताने पास केला.शस्त्रास्त्रांमुळे युद्धे होतात. त्यामुळे शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर नियंत्रण आवश्यक आहे ही जाणीव पहिल्या महायुद्धानंतर जोर धरायला लागली. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रसंघामार्फत निःशस्त्रीकरणाच्या दिशेने काही प्रयत्न झाले पण ते फारसे परिणामकारक ठरले महीत. दुसऱ्या महायुद्धात घडून आलेल्या प्रचंड विध्वंसानंतर निःशस्त्रीकरणाच्या प्रश्नाकडे गांभीयनि पाहायला सुरुवात झाली. आता पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्यामुळे निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले आहे

## ४क.३ निःशस्त्रीकरणाचा संक्षिप्त इतिहास

सतराव्या शतकात राष्ट्रराज्य संकल्पनेचा उदय आणि विकासाबरोबरच निःशस्त्रीकरणाचा उदय आणि विकास घडून आला. सन १६४८ च्या प्रसिद्ध वेस्टफालिया करारात निःशस्त्रीकरणाशी संबंधित काही महत्त्वाच्या तरतुदी होत्या. सन १८१६ मध्ये रशिया आणि इंग्लंडमध्ये शस्त्रास्त्रांमध्ये कपात करण्याविषयी एक महत्त्वपूर्ण करार झाला. रशियाच्या झारने इंग्लंडसमोर सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांमध्ये कपात करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यावर आधारित हा करार करण्यात आला होता. यापूर्वीच आपण पाहिल्याप्रमाणे सन १८१७ चा इंग्लंड आणि अमेरिका मधील रशबगॉट करार हा एक महत्त्वाचा निःशस्त्रीकरण करार होता. हा करार अमेरिका आणि कॅनडा यांच्या सीमारेषावरील संघर्षाशी संबंधित होता. अशाच प्रकारचे प्रस्ताव सन १८६० च्या दशकात फ्रान्सकडून मांडले गेले होते. एकोणिसाव्या शतकातील बहुतांश निःशस्त्रीकरण करार हे द्विपक्षपातळीवर झाले होते आणि युरोपियन वसाहतवादी महासत्तांमधील परस्पर भीती आणि संशयाच्या वातावरणामुळे या करारांना फारसे यश आले नाही.

निःशस्त्रीकरणासाठी बहुपक्षपातळीवरील पहिला प्रयत्न सन १८९८ मध्ये झाला. सन १८९८ मध्ये झालेल्या हेग शांततां परिषदेत एक सर्वसमावेशक शस्त्रास्त्रकपात योजना बनविण्यावर चर्चा केली गेली. या परिषदेत २८ राष्ट्रांनी भाग घेतला होता. या परिषदेत निःशस्त्रीकरणयोजना बनविण्यासाठी संरक्षण तज्ज्ञांची एक समिती स्थापली गेली. दुसरी हेग

शांतता परिषद सन १९०७ मध्ये झाली. यात ४४ राष्ट्रांनी भाग घेतला होता. या परिषदेत संरक्षण खर्च आणि शस्त्रास्त्रांच्या संख्येत कपातीविषयी तसेच शस्त्रास्त्र नियंत्रणासंबंधी एका व्यापक प्रस्तावावर चर्चा झाली. हेग शांतता परिषदांमधून निःशस्त्रीकरणासाठी झालेले प्रयत्न महासत्तांच्या असहकारामुळे यशस्वी होऊ शकले नाहीत, असे असले तरी या रिषदांनी निःशस्त्रीकरणाची गरज युरोपियन राष्ट्रांना पटवून देण्यात महत्वाचे योगदान दिले. पुढे राष्ट्रसंघाकडून बहुपक्षीय पातळीवर निःशस्त्रीकरणासाठी जे प्रयत्न झाले त्याचा पाया हेग शांतता परिषदांनी घातला होता.

## ४क.४ निःशस्त्रीकरण अर्थ आणि व्याख्या

शस्त्रनियंत्रण (Arms Control) आणि निशस्त्रीकरण (Disarmament) या संकल्पना अनेकदा समान अर्थाने वापरल्या जातात. प्रत्यक्षात या संकल्पना परस्पर सुसंगत असूनही कमालीच्या भिन्न आहेत. सर्वप्रथम निशस्त्रीकरण ही संकल्पना आपण समजून घेऊयात. निशस्त्रीकरण या संकल्पनेमध्ये शस्त्रास्त्रांच्या संख्येमध्ये कपात आणि व्यापक नियंत्रण घडवून आणणे अभिप्रेत असते

निःशस्त्रीकरण म्हणजे अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रांवर नियंत्रण, त्यांच्यात कपात किंवा त्यांना पूर्णपणे नष्ट करणे या गोष्टीचा समावेश असणारी एक व्यापक योजना होय. नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत शस्त्रास्त्रे, युद्ध साहित्य, उपकरणे, शस्त्रास्त्र कारखाने, लकरी शिक्षण केंद्रे, लष्करी तळ, संरक्षण खर्च इ. गोष्टीमध्ये मोठी कपात, त्यांच्यावर नियंत्रण किंवा पूर्णपणे नष्ट करणे (Total elimination) अपेक्षित आहे. अनेक विचारवंतांनी निःशस्त्रीकरणाचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मॉर्गेन्थ्यू** :- शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करण्यासाठी काही किंवा सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांमध्ये कपात किंवा त्यांना नष्ट करणे म्हणजे निःशस्त्रीकरण.

**श्नैश्वर** :- दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये झालेल्या कराराद्वारे शस्त्रास्त्रांमध्ये, कपात, त्यांच्यावर नियंत्रण किंवा त्यांना पूर्णतः नष्ट करणे म्हणजे निःशस्त्रीकरण.

**टी. व्ही. डायेक** :- लष्करी सामर्थ्यांशी निगडित कोणतीही कपात किंवा नियंत्रण म्हणजे निःशस्त्रीकरण.

निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत एका अशा जागतिक व्यवस्थेची कल्पना केली जाते की, ज्यात शस्त्रास्त्रांचे अस्तित्व नसेल. ही संकल्पना शस्त्रास्त्रांचा संपूर्ण नाश किंवा त्यांच्या पूर्ण त्यागावर आधारलेली आहे. शस्त्रास्त्रांमुळे युद्धे होतात. त्यामुळे युद्धाचा धोका टाळून जागतिक शांतता आणि सुरक्षितता निर्माण करायची असेल तर शस्त्रास्त्रे नष्ट होणे आवश्यक आहे. हे निःशस्त्रीकरणाचे आधारभूत तत्त्व आहे. यावरून निःशस्त्रीकरणाची संकल्पना ही अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रांवर नियंत्रण, त्यांच्यात कपात किंवा त्यांचा समूळ नाश करण्याशी संबंधित आहे. मॉर्गन्थ्यूच्या मताप्रमाणे "निःशस्त्रीकरणम्हणजे सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांची स्पर्धा कमी करणे किंवा नष्ट करणे होय." निःशस्त्रीकरणाची संकल्पना हो एक व्यापक प्रक्रिया असून यांचा संबंध केवळ अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रांमध्ये रुपात किंवा त्यांच्या निर्मितीवर बंधने आणण्याशीच नसून युद्ध साहित्य, उपकरणे, युद्ध साहित्य बनवणारे कारखाने, लष्करी

प्रशिक्षण केंद्रे, लष्करी तळ, संरक्षण खर्च यांच्यातही रुपात किंवा नियंत्रण अपेक्षित आहे. अशा प्रकारे निःशस्त्रीकरण ही एक सर्वसमावेशक संकल्पना आहे.

## ४क.५ नि:शस्त्रीकरणाचे प्रकार

निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रानंतर नियंत्रण, त्यांच्यात कपात किंवा त्यांचा समूळ नाश करण्याशी संबंधित आहे. युद्ध साहित्यात कपात झाल्यामुळे किंवा त्यावर नियंत्रण ठेवल्यामुळे युद्धाचा धोका टाळता येईल ही यामागची भावना आहे. यावरून निःशस्त्री करणाचे चार प्रमुख प्रकार पडतात, ते पुढीलप्रमाणे आहेत.

### गुणात्मक निःशस्त्रीकरण

ही प्रक्रिया विशिष्ट प्रकारची शस्त्रास्त्रे किंवा युद्ध साहित्याच्या कपातीशी किंवा त्यांना नष्ट करण्याशी संबंधित आहे. काही शखाखे ही संरक्षण आणि डावपेचात्मक दृष्टिकोनातून महत्त्वाची असतात. उदा. रासायनिक शस्त्रास्त्रे, अण्वस्त्रे इ. त्यांच्यात कपात करण्यासाठी किंवा त्यांना नष्ट करण्यासाठी विशेष करार केले जातात. सन १९७२ आणि १९७९ मध्ये अमेरिका आणि सोविएत रशियामध्ये डावपेचात्मकदृष्ट्या महत्त्वाची क्षेपणास्त्रे नष्ट करण्यासाठी "**साल्ट-१**" आणि "**साल्ट-२**'" हे करार झाले. याशिवाय आंशिक अणुचाचणी बंदी करार (Partial Test Ban Treaty) तसेच अण्वस्त्रप्रसार बंदी करार (Nuclear Nonproliferation Treaty-NPT) हे गुणात्मक निःशस्त्रीकरणाशी निगडित आहेत.

### संख्यात्मक निःशस्त्रीकरण -

ही प्रक्रिया सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांमधील (armaments of all types) कपात किंवा त्यांना नष्ट करण्याशी निगडित आहे. सन १९५५ साली जिनेव्हा येथे झालेल्या विश्वनिःशस्त्रीकरणपरिषदेत सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांमध्ये कपात घडवून आणण्याविषयी प्रस्ताव मांडण्यात आला होता.

### सर्वसामान्य निःशस्त्रीकरण

निःशस्त्रीकरणाच्या या प्रक्रियेत सर्व लहान मोठी राष्ट्र सहभागी होत असली तरी निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेशी ती बांधील नसतात, शस्त्रास्त्रांमध्ये कपात केलीच पाहिजे असा कोणताही दबाव त्यांच्यावर नसतो. निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया तत्त्वतः मान्य केली जाते.

### सर्वसमावेशक निःशस्त्रीकरण

निःशस्त्रीकरणाची ही सर्वात शेवटची आणि आदर्श अवस्था आहे. ह्या प्रक्रियेत अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रांचा समूळ नाश अपेक्षित आहे. निःशस्त्रीकरणाचा प्रमुख उद्देश अशा प्रकारची विश्वव्यवस्था निर्माण करायची की ज्यात कोणत्याही प्रकारची शस्त्रे, युद्ध साहित्य अस्तित्वात नसेल. एवढेच नाही तर युद्ध प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, राष्ट्रांचे संरक्षण विभाग, शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखानेदेखील बंद करावयाचे. परंतु अशी अवस्था येणे अवघड आहे. प्रबळ आंतरराष्ट्रीय राजकीय इच्छाशक्तीतूनच सर्वसमावेशक निःशस्त्रीकरण साधले जाणार आहे.

## निःशस्त्रीकरणा संदर्भात जागतिक स्तरावर केलेले प्रयत्न

### १. अण्वस्त्र प्रसारबंदी करार (NPT)

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत १९ नोव्हेंबर १९६५ रोजी सर्वानुमते निःशस्त्रीकरणाचा आणि अण्वस्त्रांच्या समूळ उच्चाटनाचा निर्णय मंजूर केला गेला. ह्या निर्णयाच्या आधारावर सन १९६८ साली अण्वस्त्र प्रसारबंदी करार (Nuclear Non- Proliferation Treaty) करण्यात आला. या करारानुसार असे ठरवण्यात आले की, ज्या देशांनी सन १९६८ पर्यंत अण्वस्व संपन्नता प्राप्त केलेली आहे केवळ त्यांनाच अण्वस्त्र बाळगता येतील. इतर ताप्ने अण्वस्त्रांचा विकास करू शकणार नाहीत. सन १९६८ पर्यंत राष्ट्रांकडे अण्वस्त्र संपन्नता होती. या राष्ट्रांमध्ये अमेरिका, सोविएट रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन यांचा समावेश होता. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १९६५ साली जो संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा ठराव मंजूर केला होता तो ह्या करारामुळे पूर्ण होणार नव्हता. हा करार पक्षपाती स्वरूपाचा होता. यामुळे काही विशिष्ट राष्ट्रांची अण्वस्त्र हुकूमशाही निर्माण होणार होती. ह्या करारातील इतर काही तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

(१) अण्वस्त्रे किंवा अणुतंत्र ज्ञानाचे हस्तांतरण न करणे.

(२) आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्थेने अणुशक्तीच्या सुरक्षित वापरासाठी आणि व्यवस्थापनासाठी जे नियम सांगण्यात आले आहेत, त्यांचे पालन करणे.

(३) आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्थेकडून अणुशक्ती प्रकल्पांची तपासणी बंधनकारक करण्यात आली.

ह्या कराराच्या पक्षपाती स्वरूपामुळे केवळ ४३ राष्ट्रांनीच हा करार मान्य केला, अण्वस्त्र प्रसारबंदी करार ५ मार्च १९७० रोजी अस्तित्वात आला. ह्या कराराची मुदत २५ वर्ष ठेवण्यात आलेली होती. सन १९९५ साली ही २५ वर्ष पूर्ण होणार असल्यामुळे ह्या कराराला अनिश्चित काळासाठी मुदतवाढ देण्याचा प्रयत्न अमेरिका आणि इतर पाच बड्या अण्वस्त्रधारी राष्ट्रांकडून झाला. सन १९९५ साली १७० राष्ट्रांनी स्वाक्षरी करून ह्या कराराला अनिश्चित काळासाठी मुदतवाढ दिली. ह्या करारावर भारतासह पाकिस्तान, इस्त्रायल आणि क्युबा ह्या राष्ट्रांनी स्वाक्षरी केलेली नाही. भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरीसाठी दोन पूर्व अटी ठेवल्या होत्या.

(अ) अण्वस्त्रांच्या सुमळ उच्चाटनाचे वेळापत्रक ठरवणे.

(आ) अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रांनी अण्वस्त्र प्रसारबंदी करारामधला पक्षपातीपणा दूर करून संपूर्ण निःशस्त्रीकरणाच्या दिशेने प्रयत्न करणे.

ह्या दोन्ही अटी पूर्ण न झाल्यामुळे भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी केली नाही

### २. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार (CTBT)

अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या पाच बड्या अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रांची अण्वस्त्रांवरील मक्तेदारी कायम ठेवून इतर राष्ट्रांना ही क्षमता प्राप्त करण्यापासून दूर

ठेवण्यासाठी केलेला आणखी एक प्रयत्न म्हणजे सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार. हा करार १९९५ साली करण्यात आला. ह्या करारानुसार, ह्या करार जेव्हा अस्तित्वात येईल तेव्हापासून कोणत्याही राष्ट्राला अणुचाचणी करता येणार नाही. ह्या करारामध्ये अमेरिका, रशिया, फ्रान्स, इंग्लंड आणि चीनकडे अस्तित्वात असणाऱ्या अण्वस्त्रांना नष्ट करण्यासाठी कोणतीही तरतूद नव्हती. दुसरे म्हणजे हा करार सर्वसमावेशक नव्हता. कारण प्रयोगशाळांमध्ये संगणकाद्वारे करण्यात येणाऱ्या अणुचाचणीच्या बंदीविषयी यांत कोणतीही तरतूद नव्हती. तिसरे म्हणजे जी राष्ट्र हा करार मान्य करणार नाहीत त्यांच्यावर बळाचा प्रयोग केला जाईल, अशी तरतूद ह्या करारात होती. त्या तीन पक्षपाती गोष्टीमुळे भारत ह्या करारापासून दूर राहिला.

### ३. सामरिक शस्त्रास्त्र कपात करार (Strategic Arms Limitation Treaty, १९७२)

निःशस्त्रीकरणाच्या दृष्टीने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल होते. अमेरिका आणि सोविएट रशिया यांच्यात जिनिव्हा येथे शस्त्रास्त्र कपातीसंबंधी व्यापक चर्चा होऊन, हेलसिंकी इथे शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करून शांततामय सहजीवनाचे वातावरण निर्माण करण्याची अमेरिका आणि सोविएट रशिया यांनी दाखविलेली राजकीय इच्छाशक्ती निःशस्त्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. ह्या करारांतर्गत करण्यात येणारी चर्चा संपूर्ण १९७० च्या दशकभर चालली आणि दोन महत्त्वपूर्ण करारांवर अमेरिका आणि रशियाच्या स्वाक्षऱ्या झाल्या.

(अ) साल्ट १ (SALT १): १९७२ या नुसार अमेरिका आणि रशियाने क्षेपणास्त्राच्या संख्येत कपात करण्याचे मान्य केले.

(आ) साल्ट २ (SALT २): १९७९ यानुसार अण्वस्त्रांच्या संख्येत २२५० ने घट करण्याचे मान्य करण्यात आले.

### ४. स्टार्ट (Strategic Arms Reduction Treaty)

विध्वंसक क्षेपणास्त्रांच्या संख्येत घट करून महासत्तांमधील शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित करण्यासाठी उचलण्यात आलेले स्टार्ट हे १९८० च्या दशकातील महत्त्वाचे पाऊल आहे. ह्या करारांतर्गत केवळ शीतयुद्धाच्या काळातच नाही तर शीतयुद्धेतर काळातदेखील अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यान शस्त्रास्त्र कपातसंबंधी चर्चा चालू होती. सन १९९१ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश सिनीयर यांनी स्टार्ट - १ अंतर्गत रशियापुढे क्षेपणास्त्रांच्या संख्येत ३०% कपात करण्याचा प्रस्ताव ठेवला. स्टार्टअंतर्गत चर्चेची दुसरी फेरी सन १९९४ साली ज्यात क्षेपणास्त्रांची संख्या २००० ते २५०० ने कमी करण्याचे मान्य करण्यात आले. स्टार्टअंतर्गत चर्चेची तिसरी फेरी हेलसिंकी येथे सन १९९७ साली सुरू झाली. ज्यात क्षेपणास्त्रांची संख्या ३००० ते ३५०० ने कमी करण्याचे मान्य करण्यात आले.

### ५. विध्वंसक शस्त्रास्त्र प्रसारबंदी करार- १९९२ (Accord to Prevent Spread of Weapons of Mass Destruction)

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांनी (अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, चीन आणि रशिया) विध्वंसक आण्विक, रासायनिक आणि जैविक शस्त्रास्त्रांच्या

प्रसारबंदीविषयी एक महत्त्वपूर्ण करार केला. ह्या करारानुसार ही पाच राष्ट्र इतर कोणत्याही राष्ट्राला अशी शस्त्रास्त्रे बनवण्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे मदत करणार नाहीत असे ठरवण्यात आले.

## ४क.६ निःशस्त्रीकरणाचे फायदे-आवश्यकता

(१) सत्तासमतोल, सामूहिक सुरक्षितता, आंतर- राष्ट्रीय कायदा, नीतिमत्ता ह्या सर्वांचा प्रमुख उद्देश प्रस्थापित आंतरराष्ट्रीय रचना किंवा व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा असला तरी शस्त्राख स्पर्धा कमी करून युद्धाचा धोका टाळण्याची प्रत्यक्ष तरतूद ह्या व्यवस्थांमध्ये नाही. निःशस्त्रीकरणाचा प्रत्यक्ष संबंध शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करण्याशी आहे. परिणामी युद्धाचा धोका टाळण्यासाठी इतर व्यवस्थांपेक्षा निःशस्त्री- करणाची प्रक्रिया अधिक उपयुक्त आहे असे ह्या प्रक्रियेच्या पुरस्कर्त्यांचे मत आहे.

(२) निःशस्त्रीकरणाचा दुसरा महत्त्वाचा फायदा राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्याचा आहे. निःशस्त्रीकरणामुळे शस्त्रास्त्र स्पर्धेवर नियंत्रण प्रस्थापित होऊन शस्त्रास्त्रांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर कपात केली जाते. परिणामी शस्त्राखांच्या खरेदीवर, संरक्षणावर होणाऱ्या प्रचंड खर्चात बचत होते. हा पैसा विकासात्मक कार्यात गुंतवता येतो. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रांचा संरक्षणावरचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. भारत आणि पाकिस्तान ही दोन्ही विकसनशील राष्ट्र आहेत. या दोन्ही राष्ट्रांमध्ये विविध मुद्यांवरून असलेल्या तणावांमुळे, परस्परसंशय, असुरक्षितता यांमुळे दोन्ही राष्ट्र संरक्षणावर प्रचंड खर्च करत आहेत. ज्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे.

(३) युद्ध ही नैतिक चूक आहे. कारण युद्धातून मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी होते असे मत अनेक अभ्यासकांनी वर्तवले आहे. निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेद्वारे युद्ध टाळण्याचे प्रयत्न होत असल्यामुळे ही प्रक्रिया मानवतेसाठी वरदान आहे. निःशस्त्रीकरणामागचा हा नैतिक आधार महत्त्वाचा आहे.

(४) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्यासाठी निःशस्त्रीकरण राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी प्रत्येक राष्ट्राला जरी शस्त्रास्त्रे बाळगण्याचा अधिकार असला तरी- हेच शस्त्रीकरण (armament) राष्ट्राराष्ट्रांमध्ये भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण करीत. यामुळे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका पोहोचून सहकार्यामध्ये अडथळा निर्माण होतो. शस्त्रीकरणामुळे अनेक राजकीय संघर्ष चिघळले आहेत. भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीरचा प्रश्न वादग्रस्त आहे. दोन्ही राष्ट्रांमधील शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे हा प्रश्न अधिकच चिघळला आहे. दोन्ही राष्ट्रांमधील तणाव आणि संशय वाढला असल्यामुळे दक्षिण आशियात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी निर्माण करण्यात आलेले सार्कचे व्यासपीठ अपयशी ठरत आहे. दोन्ही राष्ट्र आता अण्वस्त्र संपन्न बनल्यामुळे दक्षिण आशियातील तणाव अधिक वाढला आाहे. निःशस्त्रीकरणामुळे राष्ट्राराष्ट्रांमधील भीती आणि तणावाचे वातावरण कमी होऊन परस्पर विश्वास वाढीस लागतो. आंतरराष्ट्रीय प्रश्न शस्त्रांच्या माध्यमातून नाही तर परस्पर सहकार्य आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी राष्ट्रे प्रवृत्त होतात. राष्ट्रांमधील युद्धपिपासू वृत्ती कमी होऊन आंतरराष्ट्रीय कायद्याविषयी आदर वाढतो.

## ४क.७ निःशस्त्रीकरणाच्या मार्गातील अडचणी किंवा मर्यादा :

आजच्या राष्ट्रराज्याच्या काळात प्रत्येक राष्ट्राच्या अस्तित्वाला मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतःच्या शक्तीमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करते. कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणारी सक्षम अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्था किंवा यंत्रणा आजही अस्तित्वात नाही. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र शक्ती स्पर्धेमध्ये उतरलेले आहे. म्हणूनच निःशस्त्रीकरणाला हवे तेवढे यश मिळालेले नाही.

संपूर्ण निःशस्त्रीकरणाची कल्पना किती आकर्षक असली तरीही ती प्रत्यक्षात उतरणे अशक्य आहे. कारण निःशस्त्रीकरणाच्या मार्गात अनेक अडचणी आहेत. राष्ट्राराष्ट्रांमध्ये असणारे मतभेद शांततेच्या मार्गाने व विचारविनीमयाद्वारे मिटविले जाऊ शकतात. त्यासाठी राष्ट्रांचा एकदुसऱ्यावर विश्वास असणे आवश्यक आहे. थोडक्यात, निःशस्त्रीकरणाचे यश जागतिक परिस्थितीवर अवलंबून आहे. निःशस्त्रीकरणाचे तत्त्व आणि प्रत्यक्ष व्यवहार यावर ज्या अनेक मर्यादा आहेत त्या पुढीलप्रमाणे -

१. **राष्ट्राचे संरक्षण** : राष्ट्रीय संरक्षणाचा प्रश्न हा प्रत्येक राष्ट्रालाअग्रक्रमाचा प्रश्न वाटतो. म्हणून प्रत्येक राष्ट्र स्वहिताचाच आणि संरक्षणाचाच जास्तीत जास्त विचार करते. दुसरे राष्ट्र आपल्यावर आक्रमण करेल अशी भीती प्रत्येक राष्ट्राला वाटत असते. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या सामर्थ्यात वाढ करण्याचा प्रयत्न करीत असते. त्यासाठी शस्त्रास्त्रांची निर्मिती व लष्करी करार करण्यावर ते भर देते. त्यातून आंतरराष्ट्रीय तणाव वाढतो. युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत निःशस्त्रीकरणाची कल्पना साकार करणे अशक्य आहे. थोडक्यात, राष्ट्रीय सुरक्षेसाठी परिणामकारक सामूहिक सुरक्षा व्यवस्था निःशस्त्रीकरणाच्या यशासाठी पूर्वअट आहे

२. निःशस्त्रीकरणासाठी राष्ट्रांमध्ये राजकीय इच्छाशक्तीचा अभाव.

३. निःशस्त्रीकरणामुळे युद्धाला प्रोत्साहन मिळणार आहे असा उलटा मतप्रवाह जोर धरत आहे. शस्त्रास्त्रांची संख्या कमी झाली तर आक्रमक राष्ट्र युद्धाचे धाडस करू शकतात. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे सत्तासमतोलाची व्यवस्था टिकून राहते. राष्ट्रीय सामर्थ्यावर मर्यादा येतात. आपल्या आक्रमणाचा प्रतिकार केला जाईल याची भीती असल्यामुळे राष्ट्र युद्धाचा धोका पत्करत नाहीत. पण जेव्हा शस्त्रच नसतील तेव्हा अशा राष्ट्रांवर वचक ठेवता येणार नाही.

४. निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया अयशस्वी ठरण्यामागचे महत्त्वाचे कारण मोठ्या राष्ट्रांचे राजकारण हे आहे. अमेरिका, रशिया यांसारख्या राष्ट्रांनी शेकडो अणुचाचण्या केल्या आहेत. इंग्लंड, फ्रान्स, चीनसारख्या राष्ट्रांनीदेखील अनेक अणुचाचण्या केल्या आहेत. आपल्या अणुचाचण्या किंवा अण्वस्त्र विकासाच्या कार्यक्रमाला ते स्वरक्षण आणि जागतिक सुरक्षिततेसाठी आवश्यक मानतात. याउलट भारत, पाकिस्तान, इस्त्रायलसारख्या राष्ट्रांचा अण्वस्त्र कार्यक्रम त्यांना जागतिक शांततेसाठी धोकादायक वाटतो. एनपीटी किंवा सीटीबीटी सारख्या करारांवर स्वाक्षरी करण्यासाठी मोठा दबाव अमेरिका तसेच पश्चिम युरोपीय राष्ट्रांकडून भारतावर टाकण्यात आला. पण भारत

आपल्या भूमिकेवर ठाम राहिला.

५. मोठ्या राष्ट्रांमध्ये शह-प्रतिशहाच्या राजकारणाचा भाग म्हणून शस्त्रास्त्र स्पर्धा अद्याप चालू आहे.

६. **निःशस्त्रीकरणाची स्पष्ट व्याख्या नाही :** निःशस्त्रीकरण कल्पना ही संदिग्ध स्वरूपाची आहे. युनोच्या सनदेच्या कोणत्याही कलमात किंवा उद्देशपत्रिकेत निःशस्त्रीकरणाची व्याख्या करण्यात आलेली नाही. त्यामुळे निःशस्त्रीकरणाची योजना तयार करून ती राबवता येत नाही. प्रत्येक राष्ट्र निःशस्त्रीकरणाचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावत असते. त्याचप्रमाणे युनोच्या सनदेत निःशस्त्रीकरणासंबंधीची तत्त्वे अस्पष्ट व परस्परविरोधी आहेत. एकीकडे उद्देशपत्रिकेत जाहीर करण्यात आले की, सर्व राष्ट्र स्वतंत्र व सार्वभौम आहेत. युनो कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही तर दुसरीकडे युनोच्या कलम ४३ व ४५ मध्ये सामूहिक सुरक्षिततेसाठी राष्ट्रांनी युनोच्या साहाय्यासाठी सैन्य व शस्त्रे पाठविण्याचे बंधन आहे.

७. **सार्वभौमत्व आणि प्रभूता :** निःशस्त्रीकरणाच्या मार्गातील सर्वातमोठी अडचण म्हणजे राष्ट्रवाद व सार्वभौमत्वाची लालसा होय. राष्ट्र आपल्या अस्तित्वासाठी तसेच अधिक चांगले जीवन जगण्याच्या इच्छेतून शस्त्रास्त्रे निर्माण करीत आहेत व त्यासाठी शस्त्रसाठे बाळगून आहेत. जोपर्यंत राष्ट्र आपली शस्त्रास्त्र भांडारे आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली आणीत नाहीत तोपर्यंत निःशस्त्रीकरणाचा प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाही.

८. शस्त्रास्त्र स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेला अपयश आले आहे.

## ४क.८ निःशस्त्रीकरणाबाबत भारताचे धोरण

नि:शस्त्रीकरण आणि जागतिक शांतता वाढवणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहेत. सध्या जगासमोरील सर्वात मोठे संकट अणुयुद्धाचा धोका आहे. नि:शस्त्रीकरण, विशेषत: आण्विक नि:शस्त्रीकरण हा भारतासाठी नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. अण्वस्त्रांची उपस्थिती आणि शस्त्रास्त्रांची शर्यत सुरू राहणे हे मानवतेच्या अस्तित्वाला धोका आहे. अण्वस्त्रे ही युद्धाची शस्त्रे नाहीत किंवा त्यांना शांततेसाठी सहाय्यक म्हणून सन्मान दिला जाऊ नये. नि:शस्त्रीकरणाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकृत उद्दिष्टे आणि तत्त्वांमधील दृष्टी, दिशा आणि संकल्पना यांचे पूर्णपणे पालन केले पाहिजे, अन्यथा जागतिक समुदाय नि:शस्त्रीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यात कधीही यशस्वी होणार नाही, असे भारताचे नेहमीच मत आहे. अण्वस्त्रांच्या क्षेत्रात भारताने शस्त्रास्त्रांची शर्यत संपवण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. प्रस्ताव मांडले आहेत. भारताचा अणुऊर्जा कार्यक्रम शांततापूर्ण उद्देशांसाठी आण्विक उर्जेचा वापर करण्यास वचनबद्ध आहे. या दिशेने केलेले काही प्रयत्न पुढीलप्रमाणे आहेत.

१. १९५४ मध्ये, भारताने असे सुचवले की सर्वसमावेशक अण्वस्त्र चाचणी बंदीचे उद्दिष्ट साध्य होईपर्यंत अण्वस्त्रांची सर्व चाचणी पुढे ढकलण्यात यावी.

२. १९६४ मध्ये, भारताने सुचवले की अण्वस्त्रांच्या प्रसाराची समस्या सोडवण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कराराच्या व्यवस्थेनुसार शस्त्रांचा विकास आणि विस्तार एकाच वेळी थांबवावा.

३. १९७४ मध्ये, भारताने अण्वस्त्रांच्या वापरावर किंवा वापराच्या धमकीवर पूर्ण बंदी घालण्याची मागणी केली कारण असा कोणताही वापर संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे उल्लंघन आणि मानवतेविरुद्ध गुन्हा आहे.

४. १९८२ मध्ये, भारताने काही ठोस कार्यक्रम प्रस्तावित केले

(अ) निःशस्त्रीकरणावर आयोजित विशेष सत्रात, अण्वस्त्रांचा वापर न करण्याचा करार सर्वांसाठी अनिवार्य मानला जावा,

(ब) सध्याचा शस्त्रसाठा कमी करण्यासाठी पहिली पायरी, अण्वस्त्रांच्या निर्मितीवर बंदी घालण्यात यावी आणि भविष्यात त्याचे उत्पादन पूर्णपणे बंद केले जावे,

(क) सर्व अण्वस्त्र चाचण्या ताबडतोब स्थगित करण्यात याव्यात,

(ड) विहित मुदतीत सर्वसाधारण आणि संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचा करार करण्यात यावा. साठी वाटाघाटी केली जा आणि

(ई) संयुक्त राष्ट्रांनी अण्वस्त्रांच्या धोक्यांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण केली पाहिजे

५. १९८४ मध्ये, अर्जेंटिना, मेक्सिको, स्वीडन, ग्रीस आणि टांझानियासह भारताने पाच खंडातील सहा देशांमध्ये शांतता मोहीम राबवली. या मोहिमेअंतर्गत अणुऊर्जा असलेल्या देशांना अण्वस्त्रांची चाचणी, उत्पादन आणि तैनाती थांबवून शस्त्रे कमी करून पूर्ण नि:शस्त्रीकरणाकडे वाटचाल करण्याचे आवाहन करण्यात आले.

६. भारताने १९२५ च्या जिनिव्हा करारावर, १९६३ च्या आंशिक चाचणी बंदी करारावर, १९६७ च्या बाह्य अवकाश करारावर, १९७१ च्या समुद्रतळावरील करारावर, १९७२ च्या जैविक शस्त्रे करारावर आणि १९९३ च्या रासायनिक शस्त्रांच्या करारावर स्वाक्षरी केली.

कोणत्याही आंतरराष्ट्रीय निःशस्त्रीकरण कराराबाबत भारताच्या दृष्टिकोनाचा आधार ही मूलभूत कल्पना आहे की केवळ न्याय्य आणि भेदभावरहित करारांमुळे तणाव आणि शांतता कमी होते आणि नि:शस्त्रीकरणाच्या उद्दिष्टाच्या प्रगतीत मदत होते. अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी करण्यास भारताचा नकार या दृष्टिकोनातून प्रेरित आहे. ज्या देशांकडे अणुशक्ती नाही त्यांनीही या करारावर टीका केली होती. त्यांनी हा भेदभाव करणारा करार मानला. त्याच्या टीकेचे मुद्दे हे होते

(अ) संधिच्या तरतुदींचे असमान स्वरूप जे केवळ अण्वस्त्र नसलेल्या राज्यांना संरक्षण उपाय लागू करतात,

(ब) शस्त्रास्त्र देशांना शांततापूर्ण हेतूंसाठी चाचण्या घेण्याचा अधिकार देऊन त्यांचे आर्थिक हितसंबंध

(सी) अण्वस्त्रधारी देशांच्या वचनबद्धतेत अस्पष्टता; आणि

(डी) अण्वस्त्रे नसलेल्या देशांच्या कायदेशीर सुरक्षेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे.

सर्वसमावेशक अणु-चाचणी-बंदी करार (१९९६) म्हणजे CTBT. अण्वस्त्रांचा विकास आणि प्रसार रोखण्यासाठी हे एक अतिशय महत्त्वाचे साधन मानले जात असे. असा दावा करण्यात आला की सर्व स्फोटांवर बंदी (अ) अण्वस्त्रांचा विकास आणि सुधारणा रोखेल, (ब) प्रगत अण्वस्त्रांच्या नवीन टप्प्यांच्या विकासास प्रतिबंध करेल, (क) अण्वस्त्रांचा प्रसार आणि अण्वस्त्रे रोखण्यास मदत करेल नि:शस्त्रीकरण प्रक्रिया; आणि (d) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा मजबूत केली जाईल. भारताने CTBT स्वीकारला आहे. स्वाक्षरीला कालबद्ध नि:शस्त्रीकरण कार्यक्रमाशी जोडले. भारताने म्हटले की, अण्वस्त्र प्रसारबंदी करार जगातील अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाच्या मुद्द्याला सामोरे जाण्यात अपयशी ठरला आहे. या कराराच्या संभाव्यतेच्या अंतर्निहित मर्यादांमुळे, ते अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाचे उद्दिष्ट पुढे नेण्यास सक्षम असेल असे दिसत नाही. अण्वस्त्रे पूर्णपणे नष्ट करण्यासाठी पाच अण्वस्त्र देशांनी कालबद्ध कार्यक्रमावर सहमती दर्शवली तरच ते स्वीकारू शकेल, असे भारताने म्हटले आहे.

## ४क.९ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाच्या राजकारणाचा भाग म्हणून अमेरिका आणि रशिया या दोन्ही महासत्तांनी अनेक लष्करी करार केले. युद्धात परस्परविरोधी धोरण असलेला एक गट संघटित शक्तीचा वापर करून दुसऱ्या गटावर आपले धोरण लादण्याचा प्रयत्न करतो ह्या लष्करी करारांचा प्रमुख उद्देश मित्रराष्ट्रांचा युती प्रस्थापित करण्याचा होता. हे करार द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय पातळीवर करण्यात आले. नाटो, वॉर्सा, सिएटो आणि सेन्टो यांसारखे अमेरिका आणि रशिया पुरस्कृत लष्करी करार सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वावर आधारित होते. या करारांतर्गत सदस्य राष्ट्रांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि लष्करी मदत पुरवण्यात आली. ह्या करारांनी शीतयुद्धांचे राजकारण अधिक तीव्र करून परस्परसंशय आणि असुरक्षितता वाढवली.

शीतयुद्धाच्या काळापासूनच निःशस्त्रीकरण, शस्त्रास्त्रामध्ये कपात घडवून आणण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार द्विपक्ष आणि बहुपक्ष पातळीवर करण्यात आले. साल्ट, स्टार्ट हे द्विपक्षपातळीवर करण्यात आलेले करार होते. तर अण्वस्त्र प्रसारबंदी करार, सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी कतर हे बहुपक्षीय पातळीवर करण्यात आलेले करार होते. ह्या करारांनी शीतयुद्धाची तीव्रता कमी होण्यास मदत झाली. अर्थात यातील बहुतांश करार हे पक्षपाती स्वरूपाचे होते आणि त्यातून काही मूठभर राष्ट्रांनी आण्विक मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. ह्या करारांच्या पक्षपाती स्वरूपामुळे भारत काही महत्त्वाच्या करारांपासून दूर राहिला.

## ४क.१० खालील प्रश्नाआधारे आपली प्रगती तपासा.

१. निःशस्त्रीकरण म्हणजे काय ते सांगून निःशस्त्रीकरणाचे प्रकार विषद करा.

२. निःशस्त्रीकरणाची आवश्यकता आणि फायदे सांगा

३. निःशस्त्रीकरणाबाबत भारताची भूमिका स्पष्ट करा.

४. निःशस्त्रीकरणाच्या मार्गातील अडथळे आणि मर्यादा सविस्तरपणे मांडा.

५. निःशस्त्रीकरणासाठी जागतिक पातळीवर झालेले प्रयत्न सविस्तरपणे स्पष्ट करा.

**अधिक वाचनासाठी ग्रंथसंपदा**

## ४.२ संदर्भ


१) हेडली बूल, १९६१, द कन्ट्रोल ऑफ आर्म्स रेस, लंडन.

२) पामर आणि पार्किन्स, इंटरनॅशनल रिलेशन्स सीबीएस पब्लिशर्स. , दिल्ली,

३) महेंद्रकुमार, थेरॉटिकल अस्पेक्टस् ऑफ इंटरनॅशनल पॉलिटिक्स, शिवलाल अग्रवाल ॲन्ड कंपनी. दिल्ली,

४) फडिया बी एल, इंटरनॅशनल पॉलिटिक्स: थेअरी अँड कंटेम्पोररी पोलिटिकल ईशु, साहित्य भवन 2011 आग्रा,

५) Juan Somavia., People's Security-Globlalising Social Progress, 1999.

६) Mahbub-ul-Haq., Reflections on Human Development, Oxford University Press, 1999.

७) Prabhu R.K., and Rao U.K., The Mind of Mahatma Gandhi, Navjivan Press, Ahmedabad, 1967.

८) Sabina Alkire., A Conceptual Framework for Human security, (CRISE), working Paper 2, London, University of Oxford, 2003 (online).

९) Anne Hammerstad, "Whose Security? UNHCR, Refugee Protection and State Security after Cold War." Security Dialogue 31.4 (2000): 395.

१०) Barry Buzan, People, States and Fear: An Agenda for International Security Studies in the Post Cold War Era (London Massachusetts Institute of Technology 1995)

११) Barry Buzan, Ole Weaver and Jalap de Wilde, Security: A New Framework for Analysis (London: Lynen Rienner, 1998).

१२) David T. Graham, and Nana K. Poku, Migration, Globalisation and Human Security, London: Routledge, 2000.

१३) Hans Van Ginkel, and Edward Newman, "In Quest of Human Security" Japan Review of International Affairs 14.1 (2000): 79,

१४) Kanti Bajpai, "The Idea of a Human Security Audit", Joan B. Kroc Institute Report, No. 19. Fall 2000, p. 1-4

१५) Lincoln Chen, "Human Security: Concepts and Approaches", Common Security in Asia New Concepts of Human Security in Tatsuro Matsumae and Lincoln C. Chen. Tokyo: (Eds.) Tokai University Press, 1995.

१६) Berbesi, L.A., et al. "Methane Leakage from Evolving Petroleum Systems: Masses, Rates and Inferences for Climate Feedback." Earth and Planetary Science Letters 387. (2014): 219-228. Science Direct.

१७) "Causes of Climate Change." Causes of Climate Change. Environmental Protection Agency U.S., n.d. Web. 06 May 2016.

१८) Ecological Impacts of Climate Change. N.p.: n.p., n.d. The National Academies of Science, 2009.

१९) "Energy–Efficient Buildings." Energy-Efficient Buildings. Environmental Protection Agency U.S., n.d. Web.

२०) "Global Climate Change: Effects." NASA Global Climate Change and Global Warming: Vital Signs of the Planet. Jet Propulsion Laboratory / National Aeronautics and Space Administration, 15 June 2008.

❄❄❄❄❄❄❄